म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय ओ. ओ.
दा. क्र. ५२२९२

IRBK-0105292
IRBK-0105292

# सरदार भगतसिंग

लेखक

कृष्णातनय

किंमत दहा आणे

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

# दोन शब्द

या पुस्तकाचें मूळ हस्तलिखित १९४५ मध्यें तयार केलें होतें. त्या काळांत क्रांतिकारक वाङ्मयावर बंदी होती. अशा कांहीं जप्त पुस्तकांच्या आधारें हें चरित्र त्या वेळीं लिहिलें होतें. वस्तुतः यांत मूळ लेखनापेक्षां संकलनाचा भाग अधिक आहे हें इथें प्रांजळपणें कबूल करीत आहें. या चरित्रलेखना-साठीं ज्या ज्या पुस्तकांची मदत झाली आहे त्या पुस्तकांच्या लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहें.

हें पुस्तक १५ ऑगस्ट १९५५ रोजीं म्हणजे भारताच्या नव्या स्वातंत्र्यदिनीं प्रकाशित करण्याबद्दल प्रकाशकांस धन्यवाद! तसेंच पुस्तक लिहिण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल माझे प्रिय मित्र माधव आचवल, श्री वा. रा. पाटणकर, प्रिन्सिपल यूनियन हायस्कूल मुंबई, ग. पां. परचुरे, श्री. अविनाश गोडबोले व शामराव वैद्य यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच.

ता. १५-८-५५

—कृष्णतनय

गोवा विमोचकांस
सादर अर्पण

कृष्णतनय

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ५२९२ नों. दि ..............
वि. ...................... क्र. ......................

# अनुक्रमणिका


| अ. नं | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | हुतात्म्यांचें पुण्यस्मरण ! | ... | १ |
| २ | देशप्रेमी घराण्याचा कुलदीपक | ... | ३ |
| ३ | राजकीय जीवनांत प्रवेश | ... | ७ |
| ४ | रिपब्लिकन आर्मीची स्थापना | ... | १० |
| ५ | सांडर्सची हत्या | ... | १३ |
| ६ | पलायनाचा चमत्कार ! | ... | १६ |
| ७ | रिपब्लिकन आर्मीचें कार्य | | १८ |
| ८ | असेंब्लींत बॉंबफेक | ... | २० |
| ९ | जन्मठेप ! | ... | २२ |
| १० | लाहोर कटाचा खटला | ... | २५ |
| ११ | ऐतिहासिक उपोषण | ... | २७ |
| १२ | उपोषणाचें यश | ... | २९ |
| १३ | यतिंद्राचें बलिदान | ... | ३२ |
| १४ | खटला परत चालू होतो | ... | ३६ |
| १५ | व्यक्ति व विचारदर्शन | ... | ४२ |
| १६ | चंद्रशेखरचें आत्मसमर्पण | ... | ४७ |
| १७ | सरदारास फांशीची शिक्षा | ... | ५४ |
| १८ | भारतमातेचे अश्रू | ... | ६२ |
| १९ | उपसंहार | ... | ६६ |

IRBK-0105292

विभाग ........
क्रमांक ........
नों. दि. ........

# सरदार भगतसिंग

## : १ : हुतात्म्यांचें पुण्यस्मरण !

१५ ऑगस्ट १९४७ ! या दिवशीं आपला देश स्वतंत्र झाला ! १८५७ च्या स्वातंत्र्यसमरापासून या दिवसापर्यंत भारतीय पुढाऱ्यांनीं, देशभक्तांनीं, क्रांतिवीरांनीं अन् हुतात्म्यांनीं सशस्त्र उठावापासून सनदशीर मार्गांनीं, सनदशीर मार्गांपासून क्रांतिकारकांच्या चळवळींनीं, क्रांतिचळवळींपासून जनताजागृतीच्या अहिंसात्मक लढ्यांनीं,–आणि अखेरीस देशगौरव सुभाषचंद्रांच्या रूपानें अवतरलेल्या श्रीकृष्णांनीं आझाद हिंद फौजेच्या सुदर्शनचक्रानें शंभर अपराध भरलेल्या ब्रिटिश साम्राज्यशाहीचा वध केल्यावर आपला देश स्वतंत्र झाला !

स्वातंत्र्यमंदिराच्या उत्तुंग शिखरावर जाऊन तेथें कर्तव्य, त्याग, ध्येयनिष्ठा, व अंतिम बलिदानाचें प्रतीक असलेला भारतीय ध्वज फडकविण्याचा प्रवास प्रदीर्घ व कष्टाचा होता; हा मार्ग खरोखरी कांट्याकुट्यांनीं, संकटांनीं तसेंच अनेक मोहांनीं भरलेला होता.

मंगल पांडे, तात्या टोपे, नानासाहेब, झांशीची राणी लक्ष्मीबाई, बहादूरशहा यांनीं केलेला १८५७ चा सशस्त्र उठाव; गोखले, आगरकर, फिरोझशहा मेथा, सुरेंद्रनाथ बानर्जी यांचें सनदशीर राजकारण, वासुदेव बळवंतांचा प्रयत्न, स्वातंत्र्यवीर सावरकरांची अभिनव भारताची चळवळ, प्रत्यक्ष शत्रूकडूनहि ‘ Father of Indian Unrest ’ – ‘ भारतीय असंतोषाचे जनक’ अशी गौरवपर पदवी प्राप्त करून घेणाऱ्या व ‘ स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच’ अशी धीरगंभीर वाणी उच्चारणाऱ्या लोकमान्य टिळकांचा सनदशीर परंतु ज्वालाग्राही स्फोटक लढा, स्वदेशीची चळवळ, वंगभंगाची चळवळ, अमेरिकेंत शीख देशभक्तांनीं केलेली गदरची

उठावणी, स्वातंत्र्याचें लोण देशांतील लक्षावधि खेड्यांत नेऊन पोहोंचविणाऱ्या महात्माजींच्या सत्य–अहिंसेच्या असहकारितेच्या चळवळी, वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ, बेचाळीसचा अभूतपूर्व संग्राम, आणि अखेरीस 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळालें ?' हें स्वातंत्र्ययुद्धाचें सूक्त सिद्ध करणाऱ्या आझाद हिंद फौजेचा लढा—हे आपल्या स्वातंत्र्ययुद्धाचे टप्पे आहेत.

या स्वातंत्र्ययुद्धांत महाराष्ट्र, बंगाल व पंजाब हे तीन प्रांत आघाडीवर असत. या प्रांतांतील शूरवीर तेजस्वी तरुणांनीं अेक-दोन नव्हे तर शेंकडों-हजारों ज्ञात व अज्ञात तरुणांनीं प्रक्षुब्ध झालेल्या रणचंडिकेला प्रसन्न करण्यासाठीं स्वातंत्र्याच्या बलिवेदीवर आत्माहुति दिली,–अन् अखेरीस आपण स्वतंत्र झालों !

माउंट अेव्हरेस्ट, ताजमहाल, कुतुबमिनार अित्यादींसाठीं आपल्या देशाची प्रसिद्धि आहे. हीं गौरवस्थानें तुम्हीं आम्हीं पाहिलीं व अैकलीं असतील. परंतु तें.पहा !–या सर्वांपेक्षा श्रेष्ठ असें भारताचें 'हुतात्मा-उद्यान !' याचें दर्शन कधीं तुम्हांस घडलें आहे काय ? मंगल पांडे, खुदिराम, कन्हैयालाल यांच्या कोंवळ्या जीवनवेली तुम्हांस तेथें दिसतात का ? आणि तो अभिनव भारताचा प्रचंड वटवृक्ष ! ! वासुदेव बळवंत, कान्हेरे, चाफेकर बंधू, रानडे, मदनलाल धिंग्रा, विष्णु गणेश पिंगळे, बागी कर्तारसिंग, नलिनी बाकची, सरदार भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरु, सुखदेव, बटुकिशोर दत्त, यतिंद्रनाथ, सचिंद्रनाथ, रामप्रसाद बिस्मिल, मल्लापा धनशेट्टी, बाबू गेनू, सरदार उधमसिंग यांसारख्या शेंकडों ज्ञात–अज्ञात असीम त्यागी देशभक्तांनीं, सावरकर बंधू, रासबिहारी, लाला हरदयाळ, भाई परमानंद, देशगौरव सुभाष यांसारख्या क्रांतिनेत्यांनीं हें रमणीय उद्यान निर्माण केलें आहे ! यांपैकीं एकेकाचें चारित्र म्हणजे प्रखर देशभक्तीचा, कठोर ध्येयनिष्ठेचा, अचाट अन् अद्‌भुत साहसांचा, असीम बलिदानाचा, शुद्ध–पवित्र जीवनाचा साक्षात्कार घडविणारा अत्यंत रोमहर्षक इतिहास आहे. आजच्या दुर्बल, निःसत्त्व, उदासीन आणि निष्क्रियच नव्हे तर सुखलोलुप, आळशी, भोगवादी, आणि अनेक प्रसंगीं उच्छृंखल, स्वैराचारी तरुण वर्गास याच उद्यानांत नवप्रकाश, नवचैतन्य दिसेल. महात्माजींची असहकारितेची

चळवळ अयशस्वी होऊन भारताच्या स्वातंत्र्यलढ्यावर पराभवाचे, विफलतेचें, औदासिन्याचे दाट, कृष्णमेघ जमत असतांनाच ब्रिटिश साम्राज्यशाहीचें सिंहासन गदगदां हालवून सोडणाऱ्या भगतसिंगाच्या अन् त्याच्या सहकाऱ्यांच्या पराक्रमाच्या, साहसाच्या, त्यागाच्या विद्युल्लहरींनीं सारें आकाश तेजाळलें, दीप्तिमान् झालें, आणि आपण फिरून एकदां स्वातंत्र्यमंदिराची वाटचाल करूं लागलों.

त्या हुतात्मा सरदार भगतसिंगाचें चरित्र येथें कथन करण्यांत येत आहे !

♠

## : २ : देशप्रेमी घराण्याचा कुलदीपक !

तराजू, तलवार व तक्त या कुटिल राजनीतीनें व्यापाराच्या मिषानें आलेले ब्रिटिश, भारतीय स्वातंत्र्याचे बुरूज भराभर ढांसळून पाडीत असतां उत्तरेंत पंजाबमध्यें १८२० ते १८३९ या कालांत या परचक्राशीं टक्कर देणाऱ्या रणझुंझार राणा रणजितसिंहाच्या पदरीं ' खालसा ' सरदार म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका शीख घराण्याची ज्योत सरदार भगतसिंगानें फुलविली. आपल्या पवित्र व पूज्य मातृभूमीस दास्यशृंखलेंतून मुक्त करून स्वातंत्र्याच्या पुष्पमालांनीं मंडित करण्यासाठीं काया-वाचा-मनसा प्रयत्न करणाऱ्या व प्रसंगीं प्रेमार्पणापासून प्राणार्पणापर्यंत पडेल तो त्याग करण्यास सदैव सिद्ध असणाऱ्या लहान किंवा थोर प्रसिद्ध वा अप्रसिद्ध व्यक्ती कोठल्याहि देशांत विरळाच असतात. त्यांतून सारें कुटुंबच्या कुटुंब स्वदेशसेवेस सर्वस्वीं सुपूर्द करण्याचें महत् भाग्य किती कुटुंबांस लाभलें असेल ? सावरकर, चाफेकर, पटेल, नेहरू या बोटावर मोजतां येण्यासारख्या देशप्रेमी कुटुंबांबरोबरच सरदार भगतसिंगाच्या कुटुंबासही स्थान द्यावें लागेल.

भगतसिंगाच्या आजोबांचें नांव सरदार अर्जुनसिंह. त्यांस किसनसिंह, अजितसिंह व सुवर्णसिंह असे तीन पुत्र होते. सर्वांत श्रेष्ठ सरदार किसनसिंह

हे सरदारांचें वडील. स्वातंत्र्यलढ्यांत त्यांनीं अनेक वेळां तुरुंगवास भोगला होता. कुप्रसिद्ध १८१८ रेग्युलेशन ३ चा बडगा पंजाबांत प्रथम मिळणाऱ्या मानकऱ्यांत ते होते. आणि म्हणून सुटल्यानंतर त्यांनीं अंधारांत राहून क्रांतिकारी संघटनास पैसा व सल्ला देण्याची कामगिरी पत्करिली. 'India as I knew' या सर मायकेल ओडवायरच्या पुस्तकांत असा स्पष्ट उल्लेखहि आहे. स. अजितसिंहासहि देशभक्तीच्या घोर अपराधाबद्दल देशांतर करावें लागलें; इराक, इराण, तुर्कस्थान इत्यादि देशांत फिरत, मागावर असलेल्या ब्रिटिश हेरांस चुकवीत अखेरीस आयुष्याच्या उतारावर असतांना ब्राझील देशांत फर्निचर विकण्याचा धंदा या चाळीस कोटी देशबांधव असलेल्या देशभक्तास करावा लागला. सरदारांचे सर्वांत धाकटे चुलते स. सुवर्णसिंह यांसहि १९०७-८ मध्यें राजद्रोहाच्या आरोपावरून कठोर कारागृहवासाची शिक्षा होऊन तुरुंगांतच त्यांना देह ठेवावा लागला. Indeed he died in harness ! स. किसनसिंहाची धर्मपत्नी व सरदारांची माता श्रीमती जयकौर ही एक वीर-महिला होती. जिजामातेनें बालशिवाजीस जसें राष्ट्रप्रेमाचें शिक्षण दिलें होतें त्याचप्रमाणें तिनेंहि भगतसिंगास लहानपणींच देशभक्तीचे धडे दिले होते.

## जन्म

अशा थोर कुटुंबांत लायलपूर जिल्ह्यांतील बांगा या गांवीं इ. स. १९०७ च्या ऑक्टोबरमध्यें आश्विन शु. त्रयोदशीस शनिवारीं सकाळीं ९ वाजतां सरदार भगतसिंगाचा जन्म झाला. भगतसिंग असें त्याचें नांव ठेवण्यामागेंहि इतिहास आहेच. त्याच्या जन्मदिवशींच त्याचे वडील नेपाळहून सुखरूप घरीं परतले होते. मोठे काका स. अजितसिंह हद्दपारीची मुदत संपून मायदेशीं परतत असल्याची बातमी त्याच दिवशीं आली, आणि त्याचे धाकटे काका स. सुवर्णसिंहहि तुरुंगांतून पहिली शिक्षा भोगून त्याच दिवशीं मुक्त झाले होते. तेव्हां या कुटुंबास हा दिवस मोठा भाग्याचा वाटून सरदारांस तीं माणसें 'भागोंवाला' म्हणजे भाग्यवान् असें म्हणूं लागलीं, व त्याचेंच पुढें भगतसिंह असें रूपान्तर झालें. भगतसिंगास यापूर्वीं जगत्सिंह

या नांवाचा एक भाऊ झाला होता, व नंतर त्यास तीन भाऊ व तीन बहिणी झाल्या.

वयाच्या तिसऱ्या वर्षींच त्यास गायत्री मंत्र येऊं लागला. बालगोपाल जमवावेत, त्यांच्या दोन तुकड्या करून लढाईचा खेळ खेळावा, असा त्याचा लहानपणींचा नित्याचा आवडता कार्यक्रम असे. एकदां लाला पिंडीदास नांवाच्या गृहस्थांनीं त्यास सहज गमतीनें 'तूं मोठा झाल्यावर काय करणार ?' असा प्रश्न विचारतांच या बालराजानें आपल्या बोबड्या पंजाबी भाषेंत 'मी बंदुकी कलनाल !' असा जबाब दिला. असाच एकदां तो आपल्या काकांच्या मांडीवर खेळत असतां एक युरोपियन गृहस्थ त्यांस भेटावयास आले. सरदार त्या साहेबाच्या चेहऱ्याचें निरीक्षण करूं लागला, व एकाएकीं त्यानें काकांच्या मांडीवरून उठून त्याची टोपी भिरकावून दिली. क्षणार्धांत झालेल्या या प्रकारानें सर्द झालेल्या काकांनीं पृच्छा करतांच वंदे मातरम्ची गर्जना करीत 'हा गोरासाहेब आमच्याकडे 'कशाला आला ?' असा रोकडा सवाल त्यानें केला.

## शिक्षणास प्रारंभ

सरदार आतां मोठा होत होता. शीख पंथाची एक शाळा गांवांत होती; परंतु ती अतिशय राजनिष्ठ असल्यानें स. किसनसिंहांनीं त्यास व मोठा भाऊ जगत्सिंहास बांगा येथील प्राथमिक शाळेंत घातलें. ११ व्या वर्षींच जगत्सिंह वारला, व कोंवळ्या सरदारास त्याचें अतोनात दुःख झालें. तदनंतर तो लाहोर येथील सुप्रसिद्ध दयानंद अँग्लो वैदिक हायस्कुलांतून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. याच सुमारास जालियनवाला बागेचें भीषण हत्याकांड झालें. मानव्य व सुसंस्कृतता यांना काळोखी फासणाऱ्या या पाशवी कृत्यानें सर्व देश खवळून उठला व त्यांतूनच पुढें १९२१ ची असहकारितेची चळवळ सुरू झाली तेव्हां तावडतोब डी. ए. व्ही. कॉलेज सोडून तो आपल्या मित्रांसह लाला लजपतराय यांनीं स्थापन केलेल्या नॅशनल कॉलेजांत दाखल झाला.

## विद्यालयीन शिक्षण

याच विद्यालयांतून त्यानें १९२३ मध्यें बी. ए. ची परीक्षा दिली.

नॅशनल कॉलेज त्या वेळीं लाहोरच्या 'ब्रॅडला हॉल' येथें भरत असे. देवतास्वरूप भाई परमानंद व जयचंद विद्यासागर यांसारखे विद्वान् प्राध्यापक त्या ठिकाणीं शिकवीत असत. सरदाराला वाचनाचा दांडगा व्यासंग होता. त्या वेळीं त्यानें आपल्या आतेष्ट मित्रांकडे धूळ खात पडलेलीं अनेक पुस्तकें जमविलीं, अनेक नवीं घेतलीं, व दुर्मिळ ग्रंथांसाठीं अनेक ग्रंथालयें पालथीं घातलीं. इतिहास, राजकारणशास्त्र, अर्थशास्त्र यांचा सखोल शास्त्रशुद्ध अभ्यास केला. अनेक स्वतंत्र, परतंत्र देशांचे राष्ट्रीय व राजकीय इतिहास मुखोद्गत केले. साम्यवादाचें तत्त्वज्ञान व रशियन राज्यक्रांतीचीं गूढें आत्मसात् केलीं. दिल्ली बॉंब केसमध्यें "**We humbly beg to state that we are students of History**" असें त्यानें मोठ्या अभिमानानें सांगितलें तें उगीच नव्हे. सुखदेव, भगवतीचरण, व त्याचे इतर कांहीं मित्रहि या विषयांचा अभ्यास करीत, व त्यांच्या सहकार्यानें सरदारानें एक अभ्यासमंडळहि चालू केलें. सरदार म्हणजे एक जिवंत व हृद्य ग्रंथालयच होतें !

अभ्यासांत तो अग्रेसर होता, तसाच विद्यालयाच्या चळवळींचाहि तो अध्वर्यू होता. धर्माभिलाषी व हरदयाळ या आपल्या दोन सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें 'राष्ट्रीय नाटक समाज' या नांवाची एक संस्था स्थापन केली. नाट्यकलेंत मनोरंजनाबरोबर मनोबोधनाचेहि धडे देण्याची शक्ति आहे असें त्यास वाटत असे. त्यास ऐतिहासिक नाटकांची विशेष आवड होती. महाभारत या नाटकांत अर्जुनाची व सरदार लालसिंह या नाटकांत सेनापतीची भूमिका करण्यांत त्याचा हातखंडा होता. 'नवजवान भारत सभा' अशी दुसरी एक संस्था त्यानें स्थापन केली होती. लाहोर विद्यार्थी संघाचाहि तोच प्रवर्तक होता. तरुणांत देशभक्तीची भावना निर्माण करणें असा या संस्थांचा हेतु होता. विद्यालयांत शिक्षण घेत असतांनाच त्याचा सुखदेव, यशपाल, भगवतीचरण प्रभृतींशीं परिचय होऊन त्याच्या राजकीय जीवनांतहि ते सहभागी झाले.

अशा रीतीनें सरदाराचें विद्यालयीन जीवन संपून तो भावी खडतर आयुष्याच्या सीमारेषेवर उभा राहिला.

# : ३ : राजकीय जीवनांत प्रवेश

केवळ राजकीय कार्य करण्याचीच नव्हे तर भारतमातेसाठीं बलिदानहि करण्याची त्याची मनीषा होती. त्याच्या स्वप्नांचें तें एक स्वप्न होतें. विद्यार्थी-जीवन, अभ्यास, परीक्षा इत्यादि भानगडी आतां संपून तो राजकीय कार्यांत उडी घेण्यास पूर्णपणें मोकळा होता ! मनोनिग्रहाइतकीच आवश्यक उंच भरदार बांधेसूद शरीरयष्टि, चलाख व तरतरीत चेहरा, सतेज नेत्र इत्यादि गुण त्याच्यांत प्रकर्षानें दिसत होते.

त्या वेळची राजकीय परिस्थिति कशी होती ? सनदशीर मार्गांनीं भारत स्वतंत्र होणार नाहीं हें जाणून राष्ट्रसभेला लढाऊ स्वरूप देण्याच्या प्रयत्नांत असतांनाच १९२० मध्यें लोकमान्यांचें देहावसान झालें होतें. त्यानंतर महात्माजींची असहकारितेची १९२१ ची चळवळहि अखेरीस अपेशी ठरली होती. सर्वत्र निराशा पसरली होता. निःशस्त्र चळवळींतील वैफल्य त्यास दिसून आलें होतें. या विझलेल्या यज्ञकुंडांतून ज्वाला उफाळण्याची अपेक्षा करणें व्यर्थ आहे अशी त्याची मनोमय खात्री झाली; आणि लहानपणीं घडलेले सशस्त्र क्रांतीचे संस्कार पुनश्च उफाळून वर येऊं लागले.

वयाच्या चौदाव्या वर्षींच त्याचा ‘ बब्बर अकाली ’ या पंजाबांतील एका क्रांतिकारी संघटनेशीं संबंध आला होता. जालंदर जिल्ह्यांतील वारिंग गांवचा किशनसिंह या चळवळीचा सूत्रधार होता. या संघटनेचा प्रभाव आणि निःशस्त्र असहकारितेच्या चळवळींतील वैफल्य यांमुळें सशस्त्र क्रांतीनेंच आपलें ध्येय साध्य होईल अशी त्याची खात्री झाली, व तो त्याच उद्योगास लागला.

## *गृहत्याग*

तथापि याच वेळीं त्याच्या विवाहाच्या गोष्टी सुरू झाल्या. पंजाबांतील एका खानदानी घराण्यांतील एक तरुणी भावी वधू म्हणून ठरविण्यांत आली. सरदार मातृदेवतेच्या पायांतील पारतंत्र्याच्या शृंखला तोडण्यासाठीं एका हातांत घण व दुसऱ्या हातांत जीवित घेऊन निघाला होता; प्रेम-

देवतेच्या पाशांत बद्ध होण्यासाठीं एका हातांत हृदय व दुसऱ्या हातांत प्रणय घेऊन निघालेला तरुण नव्हता ! आणि म्हणून एके दिवशीं अचानकपणेंच तो घराबाहेर पडला.

बाहेर पडल्यानंतर चरितार्थासाठीं कांहीं उद्योग करणें भाग होतें. म्हणून तो प्रथमत: १९२८ च्या कानपूरच्या दंग्यांत मुसलमानांच्या भेकड हल्ल्याला बळी पडलेले कॉंग्रेसचे व देशाचे एक सच्चे सेवक श्री. गणेश शंकर विद्यार्थी यांजकडे गेला. त्या वेळीं ते 'प्रताप' नांवाचें एक हिंदी साप्ताहिक चालवीत असत या पत्रांत 'बलवंत' या टोपण नांवाखालीं तो लिखाण करूं लागला; तसेंच कानपूरजवळच्या एका राष्ट्रीय शाळेंत तो प्रमुख शिक्षकहि होता. त्यावेळीं गंगायमुनेच्या महापुराचे आपत्तींत सांपडलेल्यांना त्यानें जिवापाड साह्य केलें. येथेंच त्याचा बटु किशोर दत्तांशीं परिचय झाला. नंतर कांहीं दिवसांनीं राजकीय परिस्थितीचें निरीक्षण करण्यासाठीं तो दिल्लीस जाऊन आला.

## *हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनची स्थापना*

१९२१ ची असहकारितेची चळवळ फसल्यामुळें देशप्रेमी तरुणवर्ग आतां गुप्त क्रांतिकारी चळवळीकडे वळला. पंजाब, संयुक्त प्रांतांत ठिक-ठिकाणीं गुप्त दलें स्थापन होऊं लागलीं. परंतु या गुप्त मंडळ्यांत एकसूत्रता नव्हती. म्हणून १९२३ च्या सुमारास संयुक्त प्रांत व पंजाब प्रांतांतील क्रांतिकारकांनीं अलाहाबाद येथें एकत्र येऊन 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन' या नांवाची एक गुप्त संघटना स्थापन केली. बंगाल्यांतील अनुशीलन समितीचे अध्वर्यु या संघटनेचे प्रमुख होते. साम्राज्यशाहीचें निर्दालन करून देशांत किसान कामगारांचें राज्य स्थापन करणें असें या संघटनेचें ध्येय होतें. संघटनेच्या कामासाठीं योगेशचंद्रांनीं तयार केलेली योजना पुढें काकोरी खटल्यांत चांगलीच गाजली गेली. संघटनेंत तरुण, विश्वासू कार्यकर्त्यांची भरती करणें, त्यांचे छोटे छोटे गट पाडून त्यांच्या कुवती-नुसार त्यांस निरनिराळीं कामें देणें, त्यांच्या बौद्धिक तयारीसाठीं अभ्यास-मंडळें चालविणें, शारीरिक तयारीसाठीं आखाडे चालविणें, शस्त्रास्त्रें व स्फोटक पदार्थांचा संग्रह करणें, व संघटनेचें संपूर्ण वेळ काम करणाऱ्यांच्या चरितार्था-

साठीं व इतर कामासाठीं निधि उभारणें, इत्यादि कामें या संघटनेपुढें होतीं. या संघटनेस उघडपणें वावरतां येत नसे, त्याचप्रमाणें वाटेल त्याकडे जाऊन पैसाहि मागतां येत नसे म्हणून पैशाभावीं जेव्हां जवळजवळ सर्वच कामें अडूं लागलीं तेव्हां या क्रांतिकारकांना राजकीय दरोडे घालण्याचें तंत्र स्वीकारावें लागलें.

## काकोरीचा कट

पक्षसंघटनेच्या कामास पैशाची जरूरी होती; यासाठीं या संघटनेंतील प्रमुख पुढाऱ्यांची एक बैठक होऊन लखनौजवळील काकोरी स्टेशनपासून गाडी दूर गेल्यावर सांखळी ओढून ती थांबवावी, सर्व लोकांस पिस्तुलाच्या धाकानें रोखून धरावें, व गाडींतील सर्व खजिना लुटावा अशी एक योजना या बैठकींत आंखण्यांत आली. ही योजना अगदीं तंतोतंतपणें दि. ९ ऑगस्ट १९२५ ला पार पडली व साऱ्या देशाला त्यामुळें एक प्रचंड हादरा बसला, सरकार खवळून गेलें, गुप्त पोलीस खात्याचीं चक्रें जोरानें फिरूं लागलीं. असहकारितेची चळवळ फसली असली तरी तरुणवर्ग निराश न होतां उलट गुप्त क्रांतिकारी दलें स्थापूं लागल्याची सरकारची खात्री झाली. धरपकडीचें सत्र सुरू झालें. दि. २६ सप्टेंबर १९२५ ला पोलिसांनीं शहाजहानपूर, बनारस, अलाहाबाद, लखनौ इत्यादि ठिकाणीं एकाच वेळीं झडत्या घेऊन सुरेशचंद्र भट्टाचार्य, राजेंद्रनाथ लाहिरी, पंडित रामप्रसाद बिस्मिल, अशफाअउल्लाखां, मन्मथनाथ गुप्ता प्रभृति प्रमुख कार्यकर्त्यांस अटक केली. या धरपकडीमुळें या संघटनेवर एक जबरदस्त प्रहार झाला.

कांहीं दिवस अज्ञातवासांत घालवून भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, बटु-किशोर दत्त, सुखदेव यांनीं वाताहात झालेल्या या संघटनेची घडी परत बसविण्याचे प्रयत्न सुरू केले., याच कालांत फणींद्रनाथ घोष, मनमोहन बॅनर्जी, कमलनाथ तिवारी इत्यादि कार्यकर्ते त्यांस मिळाले. परंतु हे सर्व प्रयत्न सरदारास अपुरेच वाटत. संघटनेचें काम वाढविण्यासाठीं, पकडल्या गेलेल्या आपल्या सहकाऱ्यांची मुक्तता प्रथम आपण घडवून आणली पाहिजे असें त्यास वाटत असल्यानें त्यानें तसे प्रयत्न सुरूहि केले. लखनौ तुरुंगांत ठेवलेल्या आपल्या सहकाऱ्यांशीं त्यानें गुप्तपणें संबंध जोडले. दोन वेळां तो

जिवावरच्या संकटांतून बचावला. परंतु अखेरीस हा नाद त्यास सोडावा लागला. तेव्हां लखनौहून तो परत कानपुरास आला. तेथें विजयकुमार-सिंह, सुखदेव व भगवतीचरण यांच्याशीं विचारविनिमय करून लाहोर केंद्राचें काम करण्यासाठीं लाहोरला आला असतां एके दिवशीं एका अन-पेक्षित घटनेमुळें त्यास अटक झाली !

सरदारचा हा पहिलाच सरकारी पाहुणचार होता !

## : ४ : रिपब्लिकन आर्मीची स्थापना

ऑक्टोबर १९२६ च्या रामलीलेच्या वेळीं लाहोर शहरांत एक प्रचंड मिरवणूक निघाली असतां एका अज्ञात इसमानें या मिरवणुकीवर बाँब टाकला. काकोरी कटापासून भयभीत झालेल्या सरकारला कोठलाही अनु-चित प्रकार झाला कीं क्रांतिकारकांचाच संशय येत असे. त्यामुळें या प्रकरणींही पोलिसांनीं लाहोरांत एखाद्या क्रांतिकारकासाठीं शोधाशोध सुरूं करतां त्यांस भगतसिंग सांपडला ! बोस्टल तुरुंगांत त्याची रवानगी करण्यांत येऊन तेथें अनेक दिवस अंधारकोठडींत त्यास डांबण्यांत आलें. परंतु अखेरीस त्यावर कोठलाही आरोप सिद्ध न झाल्यामुळें साठ हजार रु. च्या जामिनावर, तसेंच अनेक बंधनें घालून त्याची मुक्तता करण्यांत आली. अर्थातच त्याच्या क्रांतिकार्यांत यामुळें फार मोठा व्यत्यय आला.

क्रांतिकार्यांत व्यत्यय आला म्हणून त्यानें सनदशीर असें राजकीय कार्य सुरूं केलें; नवजवान भारत सभेची त्यानें संघटना केली. काकोरीच्या आरो-पींना फांशी दिल्याबद्दल प्रचंड प्रमाणावर निदर्शनें त्यानें लाहोरांत घडवून आणलीं. या हुतात्म्यांच्या **Lantern Slides** दाखवून व्याख्यानांच्याद्वारें जागृतीचें कार्य त्यानें सुरूं केलें. लाहोरच्या सुप्रसिद्ध 'ब्रॅडलॉ हॉल' मध्यें

प्रचंड जनसंमर्दापुढें त्याचें अत्यंत आवेशपूर्ण, प्रभावी भाषण झालें. तेव्हां सरकारनें साठ हजार रु. च्या जामिनकीची त्यास परत आठवण करून दिली. तेव्हां त्याचेऐवजीं भगवतीचरण व्याख्यानें देऊं लागला. पंजाब सरकारनें या भाषणावरहि बंदी घातली. कांहीं दिवसांनीं वातावरण निवळल्यावर सरदारावरील निर्बंधही काढण्यांत आले, आणि तो फिरून आपल्या ध्येयाची वाटचाल करूं लागला.

सरदारावरील बंधनांमुळें ' हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन,च्या गाड्यास चांगलीच खीळ बसली होती. १९२६, २७ व २८ ह्या तीन वर्षांत क्रांतिकारकांची चळवळ थंडावल्याचें दिसून येतें. सरदाराची मनःस्थितीही चमत्कारिक झाली होती. यासंबंधीं श्री. सचिंद्रनाथ सन्याल यांनीं The Life of Bhagat Singh या पुस्तकांत The years 1926, 27 & 28 may be regarded as depicting a wandring and restless spirit of young Bhagat Singh असें म्हटलें आहे. परंतु परत जोमानें कामास सुरुवात झाली. बिहारांतून फणींद्रनाथ घोष, मनमोहन बॅनर्जी, कंबलनाथ तिवारी, संयुक्त प्रांताचे शिववर्मा व विजयकुमारसिंह, गयाप्रसाद, ललितकुमार मुकर्जी, अभयकुमार घोष, जतिंद्रनाथ सन्याल, लाहोरहून सरदार सुखदेव, जयगोपाल, भगवतीचरण, हंसराज वोहरा, झांशीहून चंद्रशेखर आझाद व कुंदनलाल या प्रमुख कार्यकर्त्यांचा आपापसांत विचारविनिमय सुरू झाला, व त्यांतील कांहीं प्रमुख कार्यकर्त्यांनीं डिसेंबर १९२८ मध्यें दिल्लीला बैठक घेतली.

या बैठकींत हिं. सो. रि असोसिएशनचें नांव बदलून तें ' हिं. सो. रि. आर्मी ' असें करण्यांत आलें. सशस्त्र सेना निर्माण करून भारतांत समाजसत्तावाद आणण्याचें ध्येय ठरलें, व प्रत्यक्ष कृतीसाटीं एका मध्यवर्ती समितीची स्थापना झाली.

या समितींत सरदार, सुखदेव, विजयकुमारसिंह, शिववर्मा, फणींद्रनाथ घोष, कुंदनलाल व चंद्रशेखर असे सात सदस्य होते. संघटनेची मुख्य कचेरी झांशी येथें राहणार होती. सुखदेवास संयुक्त प्रांताचें व फणिंद्रास बिहारचें काम देण्यांत आलें. चंद्रशेखर आझाद सरसेनापति झाला. सरचिटणिसाचें

काम कुंदनलालकडे दिलें. नवीन संबंध जोडून भरती करण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम विजयकुमारसिंह व सरदाराकडे देण्यांत आलें. प्रत्यक्ष कार्य-पद्धतीसंबंधींहि कांहीं नियम ठरविण्यांत आले. प्रांतीय बाबतींत मध्यवर्ती समितीनें हस्तक्षेप करूं नये, तथापि प्रांतांतही डाके घालणें, हत्या करणें यांसारखीं कामें मध्यवर्ती समितीच्या अनुज्ञेशिवाय करूं नये असेंहि ठरलें. शस्त्रास्त्रें व निधि जमविण्याचीं कामें सर्वस्वीं मध्यवर्ती केंद्राकडेच ठेवण्यांत आलीं. यानंतर पुढील कार्यक्रम निश्चित झाला. काकोरी कटांतील बंदिस्त योगेशचंद्र चतर्जी व सचींद्रनाथ सन्याल यांची सुटका करावी, सायमन कमिशनला घेऊन जाणारी गाडी उडवून द्यावी, काकोरी कटांतील माफीच्या माक्षीदारांची हत्या करावी, आणि कामें नेमून दिलेल्या सभासदांशिवाय बाकीच्या सर्वांनीं एकत्र राहावें असें ठरलें.

त्यानुसार ही सर्व मंडळी आग्रा येथें राहूं लागली. सगळ्यांचीच आर्थिक परिस्थिति विकट होती. आग्ऱ्याच्या त्या कडक थंडींत केवळ तीनचार घोंगड्यांवर आठदहा जणांस भागवून घ्यावें लागे. तथापि सरदाराच्या सहवासांत राहण्याचें भाग्य त्यांना लाभत होतें म्हणून सर्वच जण उत्साही असत. सरदार त्यांचें मूर्तिमंत चैतन्य होता. त्याची प्रभावी बुद्धिमत्ता, संभाषणांत दुसऱ्यावर छाप पाडण्याची विलक्षण हातोटी कांहीं और होती. आवेशानें, तळमळीनें व भावनांनीं भारून गेल्याप्रमाणें तो बोलत असे. या सहकाऱ्यांचे आपापसांत अनेक वेळां मतभेद होत, कित्येक बैठकींतून चांगली खडाजंगीहि जुंपत असे. सरदार आग्रही व तापट होता. चंद्रशेखरच्या ठिकाणीं असलेली निश्चलता व थंडपणा त्याकडे नव्हता. कधीं कधीं संतापानें तो डळमळणाऱ्या सहकाऱ्यांवर तुटून पडत असे. परंतु तो बुद्ध्याच कोणाचाहि अपमान करीत नसे; व असें आपल्या हातून झाल्याचें वाटतांच तो ताबडतोब इतक्या मनमोकळेपणानें व आर्जवानें क्षमा मागे कीं, त्याच्याबद्दल कोणाच्याहि मनांत अढी रहात नसे. अशा रीतीनें रात्रभर ही मंडळी बोलत असत आणि तांबडें फुटण्याच्या सुमारास ते जेव्हां बाहेर पडत त्या वेळीं आपल्या प्रयत्नांमुळें जणूं नव्या युगाची प्रभात फांकत आहे असें त्यांस वाटे; आपल्या ध्येयसिद्धीचा साक्षात्कारहि त्यांस त्यावेळीं होई.

अशा रीतीनें काल जात असतांनाच सायमन कमिशन हिंदुस्थानांत आलें आणि या प्रकरणांतूनच पुढें सॉंडर्सची हत्या झाली.

## : ५ : सांडर्सची हत्या

मॉंटेग्यू-चेल्मसफोर्ड् सुधारणांनुसार केलेल्या कायद्यान्वयें स्वराज्याच्या ( ! ) ' दुसऱ्या हप्त्यांत ' ( ! ! ) भारताला कोणते अधिकार कशा रीतीनें दिले जावेत तें ठरविण्यासाठीं सायमन यांच्या नेतृत्वाखालीं सात सदस्यांचें एक मंडळ ३ फेब्रुवारी १९२८ रोजीं इंग्लंडहून मुंबईस आलें. तथापि या मंडळांत एकहि भारतीय नसल्यानें कॉंग्रेसनें त्यावर बहिष्कार घालण्याचा आदेश दिला. परिणामीं देशभर सर्वत्र प्रचंड हरताळ, निदर्शनें, काळीं निशाणें इत्यादि प्रकार ' सायमन, परत जा ' इ. घोषणा दुमदुमूं लागल्या. यामुळें चिडून सरकारनेंही निदर्शकांवर लाठीहल्ले इत्यादि अत्याचार सुरू केले. मुंबईच्या कामगारांनीं एक दिवसाचा दणदणीत संप केला. देशांत परत एकदां चैतन्य खेळूं लागलें.

३० ऑक्टोबरला हें कमिशन लाहोरला येणार होतें. देशांत इतरत्र झालेलीं निदर्शनें पाहून लाहोर जिल्हा मॅजिस्ट्रेटनें शहरांत १४४ वें कलम पुकारून मिरवणुकीस व स्टेशनकडे जमाव करण्यास बंदी केली. १६ ऑक्टोबरला ५० हजारांच्या विराट् सभेंत या हुकुमाचा भंग करून त्या दिवशीं प्रचंड मिरवणुकी, निदर्शनें, घोषणा इत्यादि करण्याचा कार्यक्रम ठरला. त्यानुसार ३० ऑक्टोबरला प्रचंड मिरवणूक स्टेशनच्या दिशेनें निघाली. या मिरवणुकीचें नेतृत्व पंजाब केसरी लाला लजपतराय यांजकडे होतें. कांहीं वेळ शांततेचें वातावरण होतें, आणि इतक्यांत पोलीसांनीं निःशस्त्र व शांत असलेल्या जनतेवर निर्दय लाठीहल्ला सुरू केला. मोठमोठ्या पोलीस अधिकाऱ्यांनींहि या वेळीं खुद्द लालाजींच्या छातीवर लाठ्या बडविण्यास सुरवात केली. आपल्या प्रिय नेत्यास होत असलेली अमानुष मारपीट जनतेनें शांतपणें

पाहिली ! लाहोरचे पोलीस सुपरिंटेंडेंट श्री. स्कॉट व असिस्टंट पो. सु. श्री. सॉंडर्स आपल्या पराक्रमावर बेहद्द खुष होते !

आणि १७ नोव्हेंबरला या निर्घृण लाठीमारामुळें लालाजींचें देहावसान झालें. नव्हे तो एक पूर्वनियोजित खूनच होता ! ही बातमी देशभर पसरतांच सर्वत्र संतापाची लाट उसळली; सारा देश दुःखसागरांत बुडून गेला. दुःखापेक्षांहि संताप, त्वेष आणि त्याचबरोबर सर्वसामान्य जनतेच्या असहायतेचें विदारक दर्शन घडलें. दिवसाढवळ्या, हजारों लोकांसमक्ष एका वयोवृद्ध आदरणीय पुढाऱ्यावर खुनी हल्ला व्हावा, आणि असला भेकड अत्याचार करणारांचें पारिपत्य आपणांस करतां येऊं नये ही गोष्ट जनतेच्या जिव्हारीं लागली. लालाजींनीं मार बसल्यानंतर एक पत्रक काढून सरकारला स्पष्टपणें असें बजाविलें कीं, "हा लाठीमार मजवर नसून ब्रिटिश साम्राज्यावरच आहे. अधिकाऱ्यांच्या असल्या अत्याचारांनीं उद्यां आमचा तरुणवर्गावरील ताबा सुटून जर तो क्रांतीच्या मार्गाकडे वळला तर त्याची सर्व जबाबदारी सरकारवर राहील !"

## मोजंग हाउसवरील बैठक

आणि लालाजींना जणूं याचा साक्षात्कारच झाला होता. हिं. सो. रि. आर्मीनें लालाजींच्या हत्येचा सूड घेण्याचें ठरविलें. त्यानुसार ९ व १० डिसेंबर रोजीं मोजंग हाउसवर चंद्रशेखर, सरदार, सुखदेव, किशोरीलाल, राजगुरु, महावीरसिंग व जयगोपाळ ही तरुणमंडळी जमली. पुढील सर्व योजना सरसेनापति चंद्रशेखरनें आंखली. सुरवातीला जयगोपाळ यास पोलीस अधिकाऱ्यांवर नजर ठेवून त्यांच्या हालचाली माहीत करून घेण्याचें काम देण्यांत आलें. त्यानुसार दि. ११ पासून १५ पर्यंत तो कांहीं ना कांहीं काम काढून पोलीस ठाण्यावर जात-येत होता. ही माहिती मिळाल्यावर दि. १७ ला दुपारीं २ वाजतां परत त्यांची दुसरी बैठक झाली. या बैठकींत हत्या कशी करावी तें ठरलें. जयगोपाळनें आपली कामगिरी पुढें चालवून फक्त 'सावजा' कडे बोट दाखवावें असें ठरलें. संशय येऊन त्यास अटक झाली तर तो निर्दोष सुटावा म्हणून त्याकडे कोठलेंही शस्त्र देण्यांत आलें नाहीं.

अशा रीतीनें या नाटकाची नांदी सुरू झाली ! नंतर चंद्रशेखरनें आपलें

मौजेर पिस्तुल सज्ज केलें. या सरसेनापतीस पकडण्यास ब्रिटिश सरकारनें आज जवळजवळ पांच वर्षें जंगजंग पछाडले होते. कमींत कमी पांच सहा राजकीय कटांतील तो एक फरारी आरोपी होता. काम कितीहि अवघड असो, निश्चल व शांत मनानें तें तो पार पाडीत असे. सरदारानेंहि आपलें ऑटोमॅटिक पिस्तूल काढलें. आणि तो पहा शस्त्रसज्ज राजगुरु ! भारतमातेला एकदां प्रणाम करून बाहेर पडत आहे ! ते तिघे वीर 'भोजंग हाउस' बाहेर निघाले. महावीरसिंहानें त्यास निरोप दिला. शिवराम राजगुरु पायींच पोलिस ठाण्याकडे निघाला. शेखर, सरदार, व जयगोपाळ ह्यांनीं ती पहा सायकलवर टांग मारली !

आतां चार वाजण्याची वेळ होत आली. सकाळींच कामावर आलेला अॅ. सु. पो. सॉंडर्स हेड कॉन्स्टेबल चाननसिंहाबरोबर बाहेर पडत आहे. मोटर सायकलवर बसून तो आतां सडकेवर येत आहे !

जयगोपाळानें खूण केली ! आणि क्षणार्धांत शिवराम राजगुरूनें आपलें रिव्हॉल्वर सरसावून गोळी झाडली ! सॉंडर्स जखमी होऊन खालीं पडला. त्यानें उठण्याचा प्रयत्न केला, परंतु मोटार सायकलसकट परत तो खालीं कोसळला; त्याचा एक पाय मोटर सायकलखालीं सांपडला ! आणि इतक्यांत सरदार पुढें धांवत धांवत आला ऑटोमॅटिकनें आपलें काम केलें. तीन गोळ्या त्यानें झाडल्या ! नेम अचूक होता ! आणि गोळ्यांनींही आपली कामगिरी बजाविली ! रक्ताच्या थारोळ्यांत सॉंडर्सचा मृत देह रस्त्यावर अस्ताव्यस्त पडला. लालाजींवर भेकड हल्ला करून मानव्याला लाथाडणाऱ्या सॉंडर्सला न्याय मिळाला ! स्वर्गींचे हुतात्मे हा सारा प्रकार गंभीरपणें पहात होते; आणि त्यांनीं आतां आनंदभरानें सरदारावर पुष्पवृष्टि केली !

इन्किलाब झिंदाबाद ! सरदार भगतसिंग झिंदाबाद ! !

# : ६ : पलायनाचा चमत्कार !

सरदारास तेथेंच सशस्त्र युद्ध करून बलिदान करावयाचें होतें. तथापि अपेक्षेप्रमाणें घडलें नाहीं. पोलीस धांवून आले नाहींत. म्हणून सरदार, राजगुरु व जयगोपाळ कोर्ट स्ट्रीटवरून निसटले. हा सारा प्रकार पाहून हेड कॉ. चाननसिंह व ट्रॅफिक इन्स्पेक्टर फर्न अगदीं दिङ्मूढ होऊन गेले; प्रतिकाराचें भानहि त्यांस उरलें नाहीं. थोड्या वेळानें ते शुद्धीवर आले व त्यांनीं या तिघांचा पाठलाग सुरू केला. सरदारानें मागें वळून एक गोळी झाडली; व फर्न जखमी होऊन रस्त्यावर आडवे झाले ! त्या तरुणांनीं आतां आपल्या सायकलींचा वेग कमालीचा वाढविला. कोर्ट स्ट्रीटवरून ते दयानंद आ. कॉलेज वसतिगृहाच्या छोट्या दरवाजांतून आंत घुसले. चंद्रशेखर तेथें सज्ज होता. आतां चाननसिंहानें पाठलाग चालू ठेवला होता. त्यास पाठलाग न करण्याची विनंती त्यांनीं केली तरीहि त्यानें ऐकलें नाहीं. तेव्हां चंद्रशेखरनें चाननसिंहावर गोळी झाडली, व एका तासानें तो मेयो हॉस्पिटलमध्यें मरण पावला. साम्राज्याचें रक्षण करतांना मृत्यु पावलेल्या सॉंडर्सवर ब्रिटिश फुलें उधळतील, परंतु देशभक्तांच्या मागें राहू-केतूप्रमाणें लागणाऱ्या चाननसिंहासारख्या देशद्रोह्यास असेंच शासन मिळणें योग्य नव्हतें काय ?

चाननसिंहाचें पारिपत्य करून ते सर्वजण वसतिगृहाबाहेर पडतात तोंच सशस्त्र पोलिसांनीं चारी बाजूंनीं त्या ठिकाणास वेढा दिला. जाण्यायेण्याचे सर्व मार्ग त्यांनीं रोखून धरले. वसतिगृहाची कसून झडती घेतली. परंतु त्यांस काय सांपडलें ! आयुष्यभर इंग्रजांची नेकीनें सेवा करणाऱ्या चाननसिंहाचा अर्धवट धुगधुगी असलेला देह !

या अनपेक्षित फटफजितीनें पोलीस खातें खवळून उठलें, तर अगदीं योग्य वेळीं व मोठ्या धाडसानें केलेल्या या कामगिरीमुळें जनतेचें दुःख कांहींसें हलकें झालें. पोलिसांनीं अर्थातच या प्रकरणाचा छडा लावण्याचें ठरविलें. लाहोरबाहेर जाणाऱ्या सर्व मार्गांवर पोलीस पहारा बसला. रेल्वे स्टेशनावर गुप्तचरांची टेहळणी सुरू झाली. शहर सोडून जाणाऱ्या प्रत्येक तरुणाची

कसून झडती होऊं लागली. असा कडक बंदोबस्त असूनहि दुसरे दिवशीं सकाळीं शहरांतील भिंतींवर लाल शाईनें The Hindustan Socialist Republican Army असा मथळा असलेलीं, सॉंडर्स व चाननसिंहाच्या हत्यांचें समर्थन करणारीं Saunders is dead ! Lalaji is avenged ! Long Live Revolution ! अशा तऱ्हेचीं हजारों पत्रकें चिकटविण्यांत आलीं होतीं. त्यामुळें पोलीस खातें अधिकच डिंवचलें गेलें. कोणाला तरी ताबडतोब गिरफदार करणें आवश्यक होतें ! त्यांची संक्रांत आपल्याकडे वळणार हें सरदारानें ओळखलें. चंद्रशेखरवरहि आज कैक वर्षें पकड वॉरंट होतेंच. तेव्हां त्यांनीं कसेंहि करून लाहोराबाहेर जाण्याचें ठरविलें.

वेषांतर करण्याचें ठरल्यानें त्यानें आतांपर्यंत राखलेल्या दाढीस रजा दिली ! एका तरुण सरकारी अधिकाऱ्याचा वेष केला. ट्रंका सामानसुमानांवर एक खोटेंच लेबल लावून दिलें. पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं एका तरुणीबरोबर – श्रीमती दुर्गादेवी बोहराबरोबर तो लाहोर सेंट्रल रेल्वे स्टेशनवर आला; बरोबर राजगुरु हातांत टिफिन कॅरिअर घेऊन त्याचा ऑर्डर्ली बनला. आणि स्टेशनवरील गुप्तचरांच्या डोळ्यांदेखत तो लाहोराबाहेर निघून गेला. अशा रीतीनें इतिहासाची पुनरावृत्ति झाली. औरंगजेबाच्या खड्या पहाऱ्यांतून एका पेटाऱ्यांत बसून शिवाजी महाराज पोलादखानासमोरून निघून गेले होते; बोटीवर पोलिसांचा कडक पहारा असतांनाच स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं अथांग महासागरांत उडी मारून आपली सुटका करून घेतली होती; आणि आतां सरदारानेंहि तशाच तुरी दिल्या ! पुढें इकडे चंद्रशेखरनेंहि एका ब्राह्मण पंडितजींच्या वेषांत मथुरेची यात्रा करण्याच्या मिषानें म्हाताऱ्या ब्राह्मण यात्रेकरूंच्या जथ्याबरोबर लाहोराबाहेर पाऊल टाकलें !

## : ७ : रिपब्लिकन आर्मीचें कार्य

सॉंडर्सच्या हत्येनें देशांतील तरुणांत नवचैतन्य पसरलें. ' ठोशास ठोसा ' देणारे कोणी तरी अज्ञात वीर देशांत कोठेंतरी गुप्तपणें काम करीत आहेत ही गोष्ट आतां स्पष्ट झाली होती. सरकारच्या मनांत या संघटनेनें धडकी भरविली होती. या संघटनेच्या सामर्थ्याचा, विस्ताराचा, मनुष्यबळाचा, व पुढील योजनांचा सरकारला अंदाज घेतां येईना. या संघटनेस सर्वतोपरी साह्य करण्याची जनतेची इच्छा होती. कार्यकर्ते, पैसा, शस्त्रें—सर्व कांहीं या संघटनेस अधिकाधिक प्रमाणांत पाहिजे होतें. ज्या दिवशीं सॉंडर्स व चानन-सिंहास यमसदनीं पाठवून असंख्य तरुणांच्या हृदयांत आशेचा नंदादीप पेटला, त्याच दिवशीं या तरुणांच्या घरीं दिवा लावण्यासाठीं तेलही नव्हतें ! परंतु या घटनेनंतर संघटनेस गुप्तपणें लोक पैसा पुरवूं लागले.

याच वेळीं कलकत्त्यास कॉंग्रेसचें अधिवेशन भरणार होतें. क्रांतिकारकांना ती महान् पर्वणीच वाटली. नवीन तरुणांचा परिचय, जुन्यांच्या गांठीभेटी, प्रांताप्रांतांतील प्रत्यक्ष परिस्थिति सांगणारे पुढारी—यामुळें नवीन मार्गाची वाटचाल सांपडणें शक्य असतें. यासाठीं अधिवेशनास जाण्याचा या मंडळींनीं विचार केला. परंतु सरदाराच्या मागावर सारखे गुप्तचर होते. गत इति-हासांत मृत झालेले सूर्याजी पिसाळ, चंद्रराव मोरे, गणोजी शिर्के आदि फितुरांचे आत्मे परत गुप्तचरांच्या रूपानें हिंदवी स्वातंत्र्याच्या उपासकां-मागें लागले होते ना ! भगतसिंगास ओळखणाऱ्या लाहोरांतील जुन्या व चलाख गुप्तचरांची निरनिराळ्या महत्त्वाच्या रेल्वे जंक्शन्सवर बदली करण्यांत आली होती. अशा बिकट परिस्थितींतही सरदार व त्याचे सहकारी त्या अधिवेशनांत सामील झाले. एका वर्षांत वसाहतीचें स्वराज्य न मिळाल्यास संपूर्ण स्वातंत्र्याचा झेंडा फडकविण्याचा ठराव या अधिवेशनांत सम्मत झाल्यानें पुढील जोरदार लढ्याची आपणांस तयारी केलीच पाहिजे असें त्यांनीं ठरविलें.

अधिवेशनानंतर भगतसिंग व विजयकुमारसिंह यांनीं बंगालचा दौरा काढून आपल्या संघटनेची एक शाखा तेथें सुरू केली. बंगाली क्रांतिकारकांच्या अंतर्मंडलांत प्रवेश करून घेण्यास त्यांस बिलकुल त्रास पडला नाहीं. त्या वृद्ध

व अनुभवी क्रांतिकारकाशीं झालेल्या चर्चांवरून मोठ्या प्रमाणावर सर्वत्र बॉम्ब तयार करण्याची आवश्यकता त्यांस पटली. याच दौऱ्यांत त्यानें यतिंद्रनाथ दासला आपल्या संघटनेंत सामील करून घेतलें. तो बॉम्ब तयार करण्यांतील एक तज्ज्ञ होता. लोकांच्या सहानुभूतीनें बॉम्ब तयार करण्यास लागणारें साहित्यही आतां मिळूं लागलें. कलकत्ता, आग्रा, लाहोर, सहारणपूर येथें कारखाने सुरू झाले. यतिंद्र ठरलेल्या वेळीं येऊन नवयुवकांस त्याचें शिक्षण देई. या कारखान्यांत तयार झालेल्या दोन बॉम्बची झांशीला चांचणी करण्यांत आली तेव्हां ते अत्यंत विस्फोटक असल्याचें आढळून आलें.

## *फसलेली योजना*

आतां पैशाची आवश्यकता अधिकच भासूं लागली. तेव्हां पंजाब नॅशनल बॅंकेवर दरोडा घालण्याचें ठरलें. नेहमींप्रमाणें चंद्रशेखरनेंच ही योजना आंखली. सुखदेवानें बॅंकेच्या पहारेकऱ्याची बंदूक हस्तगत करावी; हंसराज, राजगुरु व चंद्रशेखर यांनीं पिस्तुलांनीं बॅंक रोखून धरावी; कैलासपति व भगतसिंग यांनीं टेलिफोनचा कबजा घ्यावा, जयगोपाळ व किशोरीलाल यांनीं पैसा हस्तगत करून बाहेर पडावें, आणि महावीरसिंहानें मोटारींतून त्यांस मोजंग हाउसवर आणून सोडावें अशी हीं योजना होती. ठरल्याप्रमाणें एके दिवशीं दुपारीं ३ वाजतां हे सर्व लोक तेथें आले, परंतु आयते वेळीं भगतसिंह व महावीरसिंह यांची मोटर नादुरुस्त झाल्यानें ही योजना फसली.

त्यानंतर केंद्रीय समितीनें सरदाराविषयीं एक महत्त्वाचा निर्णय घेतला. सरदारानें काबूलमार्गें रशियांत जाऊन तेथून शस्त्रपुरवठा करावा असें ठरलें. परंतु या बाबतींत सुखदेवाचा मतभेद झाल्यानें ती योजनाहि बारगळली. ठरल्याप्रमाणें सरदार रशियांत गेला असता तर क्रांतिकारकांच्या चळवळीस एखादे वेळीं निराळेंच वळण लागलें असतें. ही तर योजना रद्द झाली. सॉंडर्सच्या हत्येनेंही क्रांतिकारकांचा मूळ हेतु सफल झाला नव्हता तेव्हां तो साध्य करण्यासाठीं दिल्ली असेंब्लीचें कामकाज चालू असतां सरकारी पक्षांतील सदस्यांवर बॉम्ब टाकण्याची योजना त्यांनीं आंखली.

## : ८ : असेंब्लींत बॉंबफेक

"बहरोंको सुनानेके लिये धडाके की जरूरत है"

रशियांतील राज्यक्रांतीनंतर जगांत सर्वत्र साम्यवादाचा जोरानें प्रचार होऊं लागला; साम्यवाद तर ब्रिटिश साम्राज्यशाहीचा कट्टर शत्रु. भारतांतहि या कालांत साम्यवाद जोरानें फोंफावूं लागला होता. मुंबईसारख्या शहरांत कामगार चळवळ दिवसेंदिवस उग्र होत चालली होती. या चळवळीस पायबंद घालण्यासाठीं सरकारनें ट्रेड डिस्प्यूट बिल संमत केलें होतें; आणि आतां दिल्लीच्या मध्यवर्ती कायदेमंडळांत पब्लिक सेफ्टी बिलावर चर्चा चालू होती.

या अन्याय्य कायद्यांविरुद्ध शस्त्र उपसण्याचें क्रांतिकारकांनीं ठरविलें. त्यानुसार ८ एप्रिल १९२९ रोजीं या बिलावर अखेरचें मतदान होणार होतें. सरदार विठ्ठलभाई पटेल सभापति होते. बिलावर मतदान होऊन तें संमत झाल्याचें जाहिर होतें न होतें तोंच विरोधी पक्षाच्या बाकाखालीं दोन बॉंब्स फुटले, व कांहीं पत्रकेंहि उधळलीं गेलीं. मोठ्या प्रचंड आवाजानें सर्वांच्या कानठळ्या बसल्या; सभागृह क्षणार्धांत घनदाट धुरानें भरून गेलें; बाकांचे तुकडे तुकडे झाले. तेथील जमिनीला भेगा पडल्या. सभासदांत घबराट, गोंधळ उडाला. ते सैरावैरा धांवत सुटले. प्रेक्षकांचीं बाकें ताबडतोब रिकामीं झालीं. परंतु या गडबडींतहि पं मोतीलाल नेहरू, पं. मदनमोहन मालवीय, सरकारी पक्षाचे सर जेम्स क्रेशर हे सदस्य शांतपणें हा प्रकार पहात होते. सर बमनजी दलाल व सर जॉर्ज शूस्टर आदि मंडळींस थोडेंसें खरचटलें होतें.

आणि प्रेक्षकांच्या गॅलरींत दोन तरुण हसतमुखानें उभे होते. सरदार भगतसिंग व बटुकिशोर दत्त! अर्ध्या तासानें दोन सार्जंट एका सशस्त्र तुकडीसह तेथें दाखल झाले. परंतु त्या तरुणांच्या हातांतील पिस्तुलें पाहून त्यांच्याजवळ जाण्याचें कोणासहि धाडस होईना. तेव्हां त्या दोघांनीं आपलीं पिस्तुलें फेंकून देऊन ते स्वतःच पोलिसांच्या स्वाधीन झाले. जातांना "इन्किलाब झिंदाबाद! साम्राज्यशाहीचा नाश होवो!" अशा घोषणा त्यांनीं करून सभागृह परत दणाणून सोडलें!

क्रांतिकारक दिल्लींत आले कसे, कोठून आले, सभागृहाबाहेर सशस्त्र पहारा असतां त्यांस आंत प्रवेश कसा मिळाला, त्यांस प्रवेशपत्रिका कोणीं दिल्या इत्यादि प्रश्नांनीं गुप्तचर खातें पार गोंधळून गेलें. वस्तुस्थिति अशी होती कीं, ते दोघेजण नखशिखात पाश्चिमात्य वेष करून तीनचार दिवस या बिलावरील चर्चा ऐकण्यास येत असत. त्या वेळीं त्यांनीं आपल्याजवळ बॉम्ब्स, रिव्हॉल्वर्स, व हस्तपत्रकेंहि बाळगलीं होतीं. या हस्तपत्रकांतील मजकूर फार महत्त्वाचा होता. लाल शाईंत टाइप केलेल्या या पत्रकांत बॉंबफेकीच्या हेतूचें व कृत्याचें स्पष्टीकरण व समर्थन केलें होतें. त्यांचा आशय असा.—

"सुप्रसिद्ध फ्रेंच क्रांतिकारक व हुतात्मा हिलांट यानें अशाच एका प्रसंगीं 'बहिऱ्यांना ऐकूं जाण्यासाठीं मोठ्यानें आवाज करावा लागतो' असें म्हटलें होतें. त्यानुसार असहाय्य हिंदी जनतेच्या वतीनें ट्रेड डिस्प्यूट बिल, पब्लिक सेफ्टी बिल, व लालाजींचा खून – या गोष्टींचा अशा रीतीनें आम्ही निषेध करीत आहोंत. व्यतीचा नाश तुम्ही कराल, परंतु तत्त्वें अमर आहेत, हें चिरंतन सत्य सरकारवर आम्हांस बिंबवावयाचें आहे. मोठमोठीं साम्राज्यें धुळीस मिळालीं आहेत. बुर्बोन व झार धुळीस मिळाले असून क्रांत्या त्यांच्या छाताडावर नाचत आहेत. भविष्यकालांत मानवाला संपूर्ण स्वातंत्र्याचें शांततेनें दर्शन घेतां येईल असा आम्हांस विश्वास वाटतो. आम्ही मानवी जीवित पवित्र समजतों. परंतु दुर्दैवानें हें पवित्र रक्त आम्हांस सांडावें लागत आहे. एका माणसानें दुसऱ्याची पिळवणूक करूं नये म्हणून क्रांतीच्या यज्ञ-कुंडांत व्यक्तीची आहुति देणें अपरिहार्य होतें! क्रांति चिरायु होवो!!"

पूर्वयोजनेनुसार याच वेळीं दोन तरुणांनीं लाहोरांतील 'पीपल' या पत्रास या घटनेची माहिती दिली होती!

५२९३

## : ९ : जन्मठेप !

दि. ७ मे १९२९ ला दिल्लीच्या तुरुंगांत ॲडिशनल मॅजिस्ट्रेट श्री. पूल यांच्यासमोर सरदार व दत्त यांवरील अभियोगास सुरवात झाली. या वेळीं कांहीं विलक्षण प्रकार घडूं नये म्हणून पोलिसांनीं फार दक्षता बाळगली होती. केवळ सहा वर्तमानपत्रांचे प्रतिनिधि, बंदींचे आई-वडील, व दोन्ही पक्षांची वकील मंडळी यांशिवाय तेथें येण्यास कोणासहि अनुज्ञा नव्हती. आरोपींच्या वतीनें बॅ. असफअली काम चालवीत होते. इं. पि. को. ३०७ हत्येचा प्रयत्न व विस्फोटक कायदा क. ३ या आरोपांवर दोन दिवसांतच त्यांचा खटला सेशनकमिट करण्यांत आला.

पुढें हा खटला दिल्लीचे सेशन्स जज्ज श्री. मिडलटन यांच्यापुढें ४ जून १९२९ ला सुरू झाला. कोर्टांत आल्यावर दोघेहि Long Live Revolution! Long Live Proletariate ' अशा घोषणा करीत, आणि म्हणून त्यांस खटला चालू असेपर्यंत हातकड्या घालून ठेवण्यांत येत असे. खटल्याचे वेळीं दोघांनीं एक संयुक्त जाहीरनामा काढून आपल्या राजकीय तत्त्वज्ञानाचा इतिहास सर्व जगासमोर मांडला. ही कैफियत आपल्या देशाच्या इतिहासांत एक अजरामर घटना ठरली असून एका परतंत्र देशांतिल एका महान् क्रांतिकारी संघटनेनें आपल्यापुढें कोणता राजकीय वाद ठेवला होता त्याची बरोबर कल्पना त्यामुळें येते. या प्रसंगीं क्रांतिकारकांनीं सरदाराकडून हें वक्तव्य होण्यापूर्वीच सर्व प्रमुख वृत्तपत्रांकडे त्याची एकेक प्रत धाडली होती. इतकेंच नव्हें तर त्यांतील महत्त्वाचा भाग आयर्लंडमधील वृत्तपत्रें, पॅरीसचें 'ला ह्यूमॅनिस्ट' व रशियांतील 'प्रवदा' या वृत्तपत्रांतही प्रसिद्ध झाला होता.

दि. १२ जूनला खटल्याचा निकाल लागून दोघांही आरोपींस काळेंपाण्याची शिक्षा झाली. या निकालाविरुद्ध हायकोर्टांत केलेलें अपील १२ जानेवारी १९३० ला फेटाळून लावण्यांत आलें. तथापि शिक्षेचें त्यांस कांहींच वाटलें नाहीं. एक दिवस बॅ. असफअली सरदारास भेटावयास गेले असतां तो बेड्यांच्या तालावर संगीताचा आनंद लुटण्यांत गर्क असल्याचें त्यांस आढळून आलें !

शिक्षेच्या निकालानंतर दोन दिवस ते दिल्ली जेलमध्येंच होते. नंतर दत्तला लाहोर सेंट्रल जेलमध्यें, तर सरदारला मियांवाली येथील जेलमध्यें हालविण्यांत आलें.

## सरदारानें दिलेल्या कैफियतीचा गोषवारा

“ जुन्या युगाच्या भूमिकेवर स्वातंत्र्याचें अधिष्ठान करूं पाहणें तत्त्वतः चुकीचें आहे. नवीन गरजांबरोबर नवीन तत्त्वज्ञान निर्माण झालें पाहिजे ” असें लेनिननें म्हटलें आहे. या तत्त्वानुसार भारतांतील असंख्य शेतकरी-कामकरी वर्गांत आवश्यक अशा समाजसत्तावादी राजवटीसाठीं आपल्या संघटनेची स्थापना झाली असल्याचें सांगून सरदार म्हणतो, “ मनुष्यप्राण्याच्या जीवनाविषयीं इतरांप्रमाणें आम्हांसही प्रेम आहे. तथापि सध्यांच्या खोड-साळ राज्यसंस्थेविरुद्ध सक्रिय निषेध करण्याचा आमचा हेतु होता. ‘ इंग्लंडला आपल्या स्वप्नांतून जागें करण्यासाठीं बॉम्बची जरूरी आहे ’ असें माजी लॉ मेंबर एस. आय. दास यांनीं आपल्या मुलांस लिहिलें होतें. या बहिऱ्यांना ऐकूं जाण्यासाठींच आम्हीं असेंब्लींत बॉंब टाकले. या प्रसंगीं किंचित् जखमी झालेल्यांस इजा करण्याचा आमचा मुळींच इरादा नव्हता. उलट मानवी जीवित आम्ही अत्यंत पवित्र मानतों. आमच्यासारखे दोन क्षुल्लक जीव चिरडल्यानें हिंदी राष्ट्र चिरडलें जाणार नाहीं. जगांतील क्रांति इतिहासावरून हें सिद्ध होतें. क्रांति म्हणजे रक्तपात किंवा भयंकर संहारक युद्ध नव्हे. व्यक्तिगत सूडाच्या कल्पनेस क्रांति थारा देत नाहीं. अन्यायाच्या पायावर उभारलेली आजची समाज-रचना बदलणें हाच क्रांतीचा अर्थ आम्हांस अभिप्रेत आहे. नव्या समाजरचनेंत सामान्य व गरीब जनतेच्या हातीं राज्याचीं सूत्रें राहातील, सर्व लोकांत बंधुभाव, समता निर्माण होऊन जगाचें भांडवलशाहीच्या गुलामगिरींतून आणि साम्राज्यवादाच्या जुलुमांतून विमोचन होईल. याच हेतूनें प्रेरित होऊन आम्हीं असेंब्लींत बॉंब फेकून सर्वांस ऐकूं जाईल असा इषारा दिला आहे. याकडे कानाडोळा करून जर प्रचलित राज्यसत्ता नव्या जागृत होत असलेल्या नैसर्गिक शक्तींना हल्लींसारखीच अडवीत राहील तर यापुढें भीषण संग्राम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. त्यांतूनच क्रांतिदेवतेचा अवतार होईल.”

सरदाराच्या या वक्तव्यानें तरुणांत नवचैतन्य पसरलें. “ The effect of this Statement on the youth and Public was electrical ” असें सचिंद्र सन्यालनें लिहिलें आहे. ज्या पुढाऱ्यांनीं या बॉंबफेकीचा धिक्कार केला होता त्यांचें आतां मतपरिवर्तन होऊं लागलें. खुद्द व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनींही “ हा बॉंब कोणा व्यक्तीविरुद्ध नसून संस्थेविरुद्ध आहे ” असे उद्‌गार काढले. अनेक पुढारी व वृत्तपत्रांनीं त्याचा आतां गौरव करण्यास सुरुवात केली. सरदारानें स्थापन केलेल्या नवजवान भारत सभेनें या जाहीरनाम्यास देशव्यापी प्रसिद्धी दिली.

अशा रीतीनें हि. सो. रि. आ.चा एक हेतु साध्य झाला.

## उपोषण

हा खटला चालू असतां त्यांस तुरुंगांत अत्यंत अपमानास्पद वागणूक मिळत असे. म्हणून त्यांनीं त्याच वेळीं पंधरा दिवस उपोषणहि केलें होतें. तेव्हां सरकारनें त्यांस असें कळविलें कीं, तुम्हांवरील खटल्याचें स्वरूप राजकीय वा गुन्हेगारीचें आहे तें स्पष्ट झाल्याशिवाय कोठल्याही मागण्यांचा विचार करतां येणार नाहीं. आतां खटल्यांत ते राजकीय गुन्हेगार ठरल्यानें राजकीय कैद्यांचे अधिकार मिळविण्यासाठीं दोघांनीं आपापल्या तुरुंगांत १५ जून १९२९ पासून उपोषणास प्रारंभ केला. आपणांस राजकीय बंदी या नात्यानें अभ्यासास मोकळीक असावी, वृत्तपत्रें मिळावींत, चांगलें अन्न व सहकाऱ्यांचा सहवास मिळावा, अशा त्यांच्या अगदीं सामान्य मागण्या होत्या. त्या वेळीं पंजाब व बंगाल प्रांतांनीं ३० जूनला ‘ सिंह-दत्त दिन ’ पाळून त्यांस पाठिंबा व्यक्त केला.

आणि अशा रीतीनें उपोषण चालू असतांनाच त्यांस सुप्रसिद्ध लाहोरच्या दुसऱ्या कटांत गोंवण्यांत आलें, व त्यांची खटल्यासाठीं परत लाहोर सेंट्रल जेलमध्यें रवानगी करण्यांत आली.

## लोहाराकडून सुगावा

क्रांतिकारकांनीं बॉम्ब तयार करण्याचे कारखाने उघडल्यानंतर निरनिराळ्या लोकांशीं त्यांचा संबंध आला. एक विशिष्ट आकाराची वस्तु तयार करण्यासाठीं त्यांनीं एका लोहाराशीं संधान बांधलें होतें. तथापि लोहारास त्याविषयीं फार उत्सुकता वाटूं लागून त्यानें त्यासंबंधीं आपल्या माहितींतील एका पोलिसास सांगितलें. पोलिसानें ती बातमी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यास दिली. त्यांनीं गुप्तपणें तपास करतां त्यापैकीं एक व्यक्ति सुखदेव असून तो ६९, काश्मीर बिल्डिंग येथें रहात असल्याचें त्यांस आढळून आलें. ही जागा भगवतीचरणच्या नांवावर होती. या वस्तूचें दिल्ली बॉंब स्फोटांतील एका वस्तूशीं संपूर्ण साम्य असल्याचेंहि त्यांनीं सिद्ध केलें. पुढील तपासांत जयगोपाळ, सुखदेव व किशोरीलाल तेथेंच बॉंब तयार करीत असल्याचें सिद्ध झालें. पोलिसांनीं पाळत ठेवून १५ एप्रिल १९२८ रोजीं या घरावर छापा घालून तिघांसहि अटक केली. पकडल्यानंतर अधिक माहिती व कबुलीजबाबासाठीं पोलिसांनीं त्यांचा भयंकर छळ सुरू केला. त्यांत प्रथम जयगोपाळ बळी पडला. दि. २३ ला तो माफीचा साक्षीदार झाला, व या क्रांतिकारी संघटनेचा इतिहास, त्यांतील सदस्यांनीं आतांपर्यंत कलला कामगिरी त्यानें सांगितली. २ मे ला हंसराज यास पकडून त्यालाहि माफीचा साक्षीदार करण्यांत आलें व त्यानेंहि अत्यंत महत्त्वाची माहिती सरकारला पुरविली. या दोघांनीं सहारनपूरच्या बॉंब कारखान्याचीहि माहिती दिली. तेव्हां २३ मे रोजीं पोलिसांनीं तेथें छापा घालून शिववर्मा व जयदेव यांस अटक केली. त्यास या कारखान्यांत सहा भरलेले व तीन रिकामे बॉम्ब भरलेलीं कांहीं रिव्हॉल्वर्स व क्रांतिकारी पुस्तकें इत्यादि साहित्य मिळालें.

## दशहरा बॉंब स्फोट प्रकरण

दि. २३ ऑक्टोबर रोजीं दशहरा व लाहोर येथील लोक दशहरा येथें

भरलेल्या प्रचंड मेळाव्यांतून परतत होते, परत येत असतांना रोशनी दरवाजा-जवळ एक बॉम्बस्फोट होऊन त्यांत १० लोक ठार व तीस जखमी झाले! पोलिसांना तपासांत तेथील एका खाणावळींत ओरिएंटल विश्वविद्यालयांतील पूर्वींचे दोन विद्यार्थी वारंवार येत असल्याचें आढळून आलें. त्या दोघांस अटक करण्यांत येऊन नेहमींप्रमाणें त्यांचाही अनन्वित छळ केल्यावर त्यांनीं सरदारानें सॉंडर्सच्या हत्येंत भाग घेतल्याचें आणि भगवतीचरण हा एक या संघटनेचा मोठा कार्यकर्ता असल्याचें कबूल केलें. लाहोर कटाच्या खटल्यांत सरदाराला गोवण्यास एवढी माहिती पुरेशी होती.

## खटल्यास सुरुवात

क्रमाक्रमानें बिहार, संयुक्त प्रांत व पंजाब प्रांतांतून अनेक तरुणांस गिरफदार करण्यांत येऊन लाहोर कटाचा अभियोग सरकारनें उभा केला. दि. १० जुलै १९२९ ला लाहोर सेंट्रल जेलमध्यें स्पेशल मॅजिस्ट्रेट रायसाहेब पंडित श्रीकृष्ण यांच्यासमोर हा खटला सुनावणीस निघाला. खट-ल्यांत एकंदर ३२ आरोपी होते. त्यांतील सुखदेव, किशोरीलाल, शिववर्मा, डॉ. गयाप्रसाद, जगदेवकपूर, यतिंद्रनाथ दास, कमलनाथ त्रिवेदी, जितेंद्रनाथ सन्याल, आशाराम, देशराज, प्रेमदत्त गुजराथ, सुरेंद्रनाथ पांडे, महावीर-सिंह, अभयकुमार घोष, बटुकिशोर दत्त व सरदार हे १६ आरोपी सरकारच्या ताब्यांत होते. भगवतीचरण, यशपाल, विजयकुमारसिंह, चंद्रशेखर आझाद, रघुनाथ, कैलास, सद्‌गुरुदयाल अवस्थी, शिवराम राजगुरु, व कुंदनलाल हे ९ आरोपी फरारी होते. तर जयगोपाळ, हंसराज वोहरा, रामशरणदास, ललितकुमार मुकर्जी, ब्रह्मदत्त, फणींद्रनाथ घोष, व मनमोहन मुकर्जी हे ७ आरोपी माफीचे साक्षीदार झाले होते.

या आरोपींच्या बचावासाठीं देशांतील सर्व प्रमुख पुढाऱ्यांनीं जून १९२९ मध्येंच लाहोर येथें भगतसिंग संरक्षक समिति स्थापून आरोपींचा बचाव करणें, त्यांच्या नातलगांस द्रव्यसाहाय्य देणें इत्यादि कामें सुरू केलीं.

या खटल्याच्या वेळीं पोलिसांनीं अत्यंत दक्षता बाळगली होती. तुरुंग व लॉरेन्स गार्डनचे सर्व मार्ग बंद करण्यांत येऊन तेथें संगीनधारी पोलिसांचा

पहारा बसविण्यांत आला. रस्त्यावर गोरे सार्जंट मोटर सायकलवरून सारखी गस्त घालीत होते.

अभियोगास रुसुवात झाली! सर्वत्र गंभीर शांतता होती. आरोपींनीं " इन्किलाब झिंदाबाद ! वंदे मातरम् ! " अशा जयघोषांत प्रवेश केला !

## : ११ : ऐतिहासिक उपोषण

अशा रीतीनें सरदार पुन्हा एकदां युद्धास उभा राहिला. अनेक महिन्यांनीं तो आपल्या प्रिय सहकाऱ्यांस भेटत होता. सहकाऱ्यांनीं त्यास अभिवादन केलें. त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. कारण पूर्वीच्या सरदाराची छायासुद्धा आतां उरली नव्हती. अशक्त आणि सुकलेल्या स्थितींतच स्ट्रेचरवरून त्यास कोर्टांत न्यावें लागत होतें. पोलिसांनीं दिलेल्या अमानुष त्रासाचाच तो पुरावा होता.

पहिले तीन दिवस कोर्टांतील कामकाजाकडे कांहीं लक्ष न देतां हे सारे क्रांतिकारक आपसांत चर्चा करून पुढील धोरण ठरवीत होते. सरदार आतां इतका अशक्त झाला होता कीं, त्याला सारा वेळ आरामखुर्चीवर पडून रहावें लागत असे, तरीहि तो चर्चेंत प्रामुख्यानें भाग घेई. आपल्या धरपकडीमुळें आपली संघटना नेस्तनाबूद होत असून हें कार्य पुढें कसें चालणार अशी काळजी अनेक सहकाऱ्यांनीं व्यक्त केली. तेव्हां नेहमींप्रमाणचें सरदार त्यांच्याशीं यशस्वी युक्तिवाद करी, " तुरुंगांत आल्यानें आपला सारा ग्रंथ आटोपला असें तुम्हीं समजण्याचें कारण नाहीं. आपणांस आपला जीव वांचण्याच्या स्वार्थी हेतूनें फारशी कायदेबाजीहि करावयाची नाहीं. आपल्याला हा अभियोग एका विशिष्ट राजकीय ध्येयवादानें लढवायाचा आहे. ब्रिटिशांच्या न्यायदान पद्धतीचे वाभाडे काढण्यासाठीं, तसेंच क्रांतिकारकांच्या दुर्दम्य आशावादाचें व निश्चयाचें जगास दर्शन घडविण्याकरितां जी जी संधी मिळेल तिचा आपणांस उपयोग करून घ्यावयाचा आहे.

केवळ खटल्यांतील जबानीनेंच नव्हे तर न्यायालयांत व तुरुंगांत प्रत्यक्ष कृतीनें सर्व राजबंद्यांच्या हक्कासाठीं आपणांस आतां लढा द्यावयाचा आहे. तुरुंगाबाहेर असतांना झोपलेल्यांना जागें करण्याचा आपण प्रयत्न केला, तोच प्रयत्न आतां तुरुंगांत राहूनहि आपण पुढें चालू ठेवणार आहोंत.'' अशा तऱ्हेच्या युक्तिवादानें त्याचे सहकारी उत्साही झाले, व राजबंद्यांच्या मागण्यांचा विचार न झाल्यास दि. १३ जुलैपासून उपोषण करण्याचा त्यांनीं निर्धार केला.

यानुसार दि. १३ जुलैला राजबंद्यांनीं उपोषणास सुरुवात केली. त्यामुळें सरकार त्यांस अधिकच त्रास देऊं लागलें. दि. १७ ला आरोपींना न्यायालयांत आणल्यावर हातकड्या घातल्या, व दोन आरोपींच्यामध्यें एकेक पोलीस बसविण्यांत आला. तेव्हां राजबंदी व पोलीस यांच्यांत भांडणें होऊं लागलीं. यावर राजबंद्यांनीं खटला दुसऱ्या कोर्टांत चालविण्याची मागणी केली, परंतु ती सरकारनें फेटाळून लाविली.

राजबंद्यांच्या उपोषणामागील हेतु लवकरच साध्य होऊं लागला. लवकरच साऱ्या हिंदुस्थानचें लक्ष त्यांनीं आपल्याकडे आकर्षून घेतलें. सुरुवातीला सरकार व जेल अधिकाऱ्यांनीं या उपोषणाकडे दुर्लक्षच केलें. या अन्नत्यागाचा थोडक्याच दिवसांत बोजवारा उडेल अशी त्यांची खात्री होती. त्यांतच दोन बंद्यांनीं थोड्याच दिवसांनंतर उपोषण सोडल्यानें त्यांच्या समजुतीस बळकटी आली. अनेक राजबंदीहि अन्नत्यागाच्या अंतिम यशाबद्दल साशंकच होते. पोलिसांशीं समोरासमोर सामना देण्याची त्यांची तयारी होती; परंतु तुरुंगांत बंदिस्त अवस्थेंत दिवसच्या दिवस, आठवडेच्या आठवडेच नव्हे तर महिनेन् महिने उपोषण करण्याचा विचार खचित त्यांस हादरा देणाराच होता.

कांहीं दिवसांच्या उपोषणानंतर सरकारचे डोळे उघडूं लागले; या उपोषणांत त्यांचें कांहीं बरेंवाईट होऊन जनप्रक्षोभाची लाट उसळूं नये; तसेंच जगांत यामुळें आपली छी थू होऊं नये म्हणून राजबंदींस आतां जबरदस्तीनें अन्न घालण्यास प्रारंभ झाला. त्या वेळीं प्रत्येक राजबंद्यास स्वतंत्र कोठडींत ठेवण्यांत येत असे. कांहीं धिप्पाड वॉर्डर्सना घेऊन डॉक्टर प्रत्येक कोठडींत

येई. कैद्यास प्रथम अेका चटईवर पाडण्यांत येअी; नंतर हे वॉर्डर त्यांना सर्व बाजूंनीं धरून ठेवीत. अेवढें झाल्यावर त्याच्या नाकांत तर कधीं तोंडांत अेका रबरी नळीच्या साहाय्यानें जबरदस्तीनें दूध सोडण्यांत येत असे. यतींद्राच्या नाकांत व तोंडांत अशा रीतीनें नळी सोडल्यानें तो बेशुद्ध झाला, त्याची नाडी थंड पडूं लागली. तेव्हां या प्रकारानें घाबरून जाऊन सरकारनें २६ जुलैपासून खटल्याचें काम बेमुदत तहकूब ठेविलें. राजबंद्यांचें उपोषण मात्र चालूच होतें!

## : १२ : उपोषणाचें यश

राजबंद्याच्या या उपोषणांत कोणासहि मृत्यु आल्यास देशाचें नुकसान होणार असल्यानें आतां देशांतील पुढाऱ्यांनींहि हें उपोषण बंद होण्याचे प्रयत्न सुरू केले त्यांस आपला नैतिक पाठिंबा व सहानुभूति व्यक्त करण्यासाठीं ठिकठिकाणीं उपोषण-दिन पाळले गेले. प्रयागच्या अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींत २६ जुलै रोजीं राजबंद्यांच्या उपोषणाचें समर्थन करण्यांत आलें. तदनंतर ४ ऑगस्ट रोजीं कॉंग्रेसचे अध्यक्ष पं. मोतिलाल नेहरू यांनीं एका सार्वजनिक सभेंत सरकारचा धिक्कार केला व त्यांनीं इतर पुढाऱ्यांसह राजबंद्यांची तुरुंगांत भेट घेतली.

पंजाब सरकार आतां जागें झालें. त्यांनीं ६ ऑगस्टला एक पत्रक काढून आपली बाजू मांडली. तथापि यामुळें परिस्थितींत कोठल्याहि प्रकारें सुधारणा झाली नाहीं. तेव्हां पंजाबचे गव्हर्नर सिमल्याहून लाहोरला येऊन जेल अधिकाऱ्यांशीं त्यांनीं विचारविनिमय केला व ९ ऑगस्टला सरकारनें यासंबंधीं दुसरें एक पत्रक काढून आपल्या धोरणाचें समर्थन केलें. आतां हिंदुस्थान सरकारहि खडबडून जागें झालें. प्रत्येक प्रांतांतील तुरुंगाचे नियम व कैद्यांस मिळणारी वागणूक यांत सुधारणा करण्यासाठीं सरकारनें एक समिति नेमण्याचें ठरविलें. तेव्हां ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यांत पंजाब सरकारनें

इन्स्पेक्टर जनरल ले. कर्नल बार्कर यांच्या अध्यक्षतेखालीं पंजाब जेल कमिटीची स्थापना केली. याच महिन्यांत या समितीचा एक सदस्य व देशांतील कांहीं पुढारी राजबंद्यांना भेटले. २१ ऑगस्टला इन्स्पेक्टर जनरलनेंहि त्यांची भेट घेऊन उपोषण थांबविण्याचा निष्फळ प्रयत्न केला, व ३१ ऑगस्ट रोजीं लाहोर तुरुंगांत या खटल्यांतील आरोपींबरोबरच गदरपक्षाचे एक संस्थापक वीर बाबा सोहनसिंग, दक्षिणेश्वर बॉंब कटांतील श्री. बी. के. बॅनर्जी, सरदार उज्ज्वलसिंह, मार्शल लॉ चे कैदी श्री. रतनचंद यांनींहि उपोषण चालू केलें. बाबा सोहनसिंगांनीं उपोषण जाहीर करतांच त्यांस जेल सुपरिंटेंडेंटनें असें कळविलें कीं, आपण उपोषणांत भाग घेतलात तर आपणास मिळालेली शिक्षेची सूट रद्द होईल, व अधिक काळ तुरुंगांत काढावा लागेल. बाबाजी वृद्ध होते, त्यांची प्रकृतीही खालावलेली होती. अंदमानमधील १४ वर्षांच्या यातनांनीं त्यांचें शरीर आधींच जर्जर झालेलें, आणि त्यामुळें अन्नत्यागाचा फार घोर परिणाम होण्याचा धोका होता. म्हणून सरदारानें त्यांची मुलाखत घेऊन त्यांस निर्धारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. तथापि त्या शूर शेलारमामानें आपला निर्धार ढळूं दिला नाहीं. नाइलाज होऊन सरदार परतला. आपल्या या मुलाखतीचें वृत्त सहकाऱ्यांस सांगतांना त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. या राजबंद्याबरोबर फिरोजपूर तुरुंगांत पं. जगतराम; मियांवाली तुरुंगांत भाई अरोडासिंह, श्री. कबूलसिंह, लाला रामचंद्र, मौलवी अहमददिन, श्री. गोपालसिंह, बारिसाल तुरुंगांत सतिंद्रनाथ सेन, उपेंद्रनाथ गुह, श्री. एस. सी दास, श्री. सतिंद्रनाथ विश्वास, श्री. फणिभूषण चतर्जी, व श्री बी. के. मिश्र; रायपूर तुरुंगांत सरदार करतारसिंह, स. ज्वालासिंह, स. रणधीरसिंह आणि त्यांच्या जोडीस मीरत कटांतील आरोपींनींहि उपोषण सुरू केलें होतें.

या उपोषणाला परदेशांतहि अतिशय प्रसिद्धी मिळाली. हिंदी तुरुंगांतील भीषण परिस्थितीकडे जगाचें लक्ष वेधलें; देशांतही राजबंद्यांच्या मागण्यांना पाठिंबा देणारी चळवळ उफाळून येऊं लागली; सर्वत्र प्रचंड सभा-निदर्शनें होऊं लागलीं. राजबंद्यांनीं उपोषण करण्यामागील सरदाराचा हेतु फलद्रूप होऊं लागला. त्यामुळें सरकार अधिकच संतप्त झालें; व कसेंही करून हें

ऐतिहासिक उपोषण बंद पाडण्याचें सरकारनें ठरविलें. आतां सक्तीनें दूध पाजण्याबरोबर अन्नहि घालण्याचे प्रयोग सुरू झाले. तेव्हां युक्तीला प्रयुक्ती निघूं लागली. किशोरीलालनें आधणाचें पाणी पिऊन व मिरच्यांची पूड खाऊन आपला घसा सुजवून घेतला; त्यामुळें त्याच्या घशांत नळी घालण्याचा प्रयत्न करतांना त्याला जोराचा खोकला येई व तो गुदमरून मरूं नये म्हणून डॉक्टरला नाइलाजानें नळी काढून घ्यावी लागे. तसेंच सक्तीनें घातलेलें अन्न ओकून पडावें म्हणून अजयकुमार घोष माशा पकडून खाऊं लागला! राजबंद्यांचा निर्धार मोडून काढण्यासाठीं सरकारनें आतां एक अमानुष युक्ति योजिली.

प्रत्येक राजबंद्याच्या कोठडींत पूर्वीं पाण्यानें भरलेलें मडकें असे· त्याऐवजीं तें मडकें आतां दुधानें भरून ठेवण्यांत येई. राजबंद्यांपुढें हें एक भयंकर दिव्यच होतें! यासंबंधीं अजयकुमार घोष यांनीं लिहिलेला अनुभव अंतःकरणास पीळ पाडणारा, तसेंच प्रक्षोभकहि आहे. ते लिहितात, ''

‘‘एका दिवसानंतर तहान असह्य होऊं लागली. मी कित्येक वेळां पाण्याच्या आशेनें सरपटत मडक्यापर्यंत जांई, परंतु पाण्याऐवजीं दूध पाहून दचकून स्वतःला मागें ओढीत असे. ही युक्ति कोणालाहि वेड लावणारी होती. ज्याच्या डोक्यांतून ही शक्कल निघाली तो समोर दिसता तर मीं त्याचा खूनच केला असता! बाहेर पहारेकरी चोरून आमची प्रत्येक हालचाल पहात. माझा स्वतःवरील विश्वास ढळूं लागला, व आणखी कांहीं तासांतच मी तें दूध पिऊन टाकीन कीं काय असें मला वाटूं लागलें. माझा घसा कोरडा पडला होता, व जिभेला सूज आली होती.

‘‘मीं पहारेकऱ्याला हांक मारली, आणि दाराच्या जाळींतून पाण्याचे निदान चार थेंब तरी सोडण्याची विनति केली. ‘मला परवानगी नाहीं’ एवढेंच उत्तर तो देई. माझ्या अंगाचा भडका उडाला. दुधाचें मडकें घेऊन मी दारावर आपटलें. त्याचे तुकडे तुकडे होऊन पहारेकऱ्याच्या अंगावर तें सांडलें. तो घाबरून मागें सरकला. त्याला वाटलें माझें डोकेंच फिरलें. बाकी मी त्या पंथास लागलों होतोंच. त्यानें ताबडतोब पाणी आणलें. मी घटाघटा पाणी ढोसलें. परंतु त्यानें मला मळमळूं लागून प्यालेल्या पाण्याचा प्रत्येक

थैंबन् थैंब ओंकून पडला ! किशोरीलाल व इतर राजबंदींची तीच अवस्था झाली होती. आणि माझ्याप्रमाणेंच त्यांनींही दुधाचीं मडकीं पहारेकऱ्यांच्या अंगावर भिरकावून दिल्याचें मागाहून मला समजलें."

साऱ्या जगांत न्यायप्रिय म्हणून स्वतःचा टेंभा मिरविणाऱ्या ब्रिटिश सरकारचें अंतरंग किती काळें कुट्ट, अमानुष व सैतानी आहे तें सर्व जगाच्या निदर्शनास आणून देणाऱ्या राजबंद्यांस धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच.

अशा रीतीनें राजबंद्यांच्या उपोषणास यश येत असतांनाच यतिंद्राच्या बलिदानाचा क्षण आला !


♠

## : २१ : यतिंद्राचें बलिदान

### यतिंद्राचें पूर्वायुष्य

अगदीं लहानपणापासूनच यतिंद्र अेका बंगाली क्रांतिकारक संघटनेचा कार्यकर्ता होता. १९२१ पासून अनेक वेळां त्यास लहानमोठ्या मुदतीच्या शिक्षा झाल्या होत्या. सरकारनें त्यास काकोरी कटांत गोवण्याचे निष्फळ प्रयत्न केले. त्यानंतर त्यास बंगाल ऑर्डिनन्सनुसार बंदिस्त करण्यांत आलें. तुरुंगांत त्याचा अनन्वित छळ झाला, तेव्हां सतत २३ दिवस उपोषण करून तुरुंगाधिकाऱ्यांस माफी मागावयास लाविलें होतें. उपोषण त्याच्या हाडींमाशीं खिळलें होतें ! शेवटीं २७ सप्टेंबर १९२७ ला त्याची निर्दोष सुटका झाली. परंतु तो अेक उत्कृष्ट बॉंब तज्ज्ञ होता आणि सरदाराच्या अनेक सहकाऱ्यांस ही विद्या त्यानेंच शिकविली असल्यानें त्यालाही १४ जून १९२९ ला कलकत्त्यांत अटक होऊन लाहोर कटांत गोवण्यांत आलें. सरदाराच्या पराक्रमामुळें त्यास भारताचा 'टॉम अॅश', तर यतिंद्रास उपोषण-श्रद्धेमुळें 'टेरेन्स मॅकस्विनी' म्हणत असत !

मागें म्हटल्याप्रमाणें उपोषणामागील हेतु सिद्धीस जात असतांनाच २८ जुलैस यतिंद्र अत्यवस्थ असून त्यास रुग्णालयांत नेल्याचें राजबंदींस



सुखदेव



बटुकेश्वर दत्त

अनुक्रम
विभाग...३.३..
ग्रं. वि.
ग्रंथालय

समजलें, व ते साश्चर्य दुःखित झाले. कारण कांहीं ता[illegible]पूर्वीच ती त्यांस[illegible]ला होता. नंतर जेलमधील एका दुय्यम अधिकाऱ्यानें भीतभीत अशी बातमी दिली कीं, त्यास सक्तीनें अन्न घालीत असतां कांहीं तरी ध[illegible]ल्यानें त्यास रुग्णालयांत न्यावें लागलें त्या दिवशीं रुग्णालयांत अनेक डॉक्टर त्या उपोषणवीराचे प्राण वांचविण्याची पराकाष्ठा करीत होते. त्या रात्रींच तो जाणार अशी त्यांची खात्री झाली होती. संध्याकाळीं त्यानें एनिमासुद्धां घेण्याचें नाकारलें. त्याच्या शरीरांत विष पसरत होतें; त्यास धड डोळेहि उघडतां येत नव्हते. मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं त्यास उपोषण सोडण्याची विनंति केली. परंतु व्यर्थ ! इतक्यांत राजबंद्यांपैकीं कोणीतरी, 'तो सरदाराचें ऐकेल' असें म्हटलें. ताबडतोब पंजाबच्या गव्हर्नर साहेबांना असा संदेश धाडण्यांत आला कीं, "यतिंद्राची परिस्थिति अत्यंत चिंताजनक असून आज जर त्यानें एनिमा घेतला नाहीं तर त्याच्या जिवाची खात्री देतां येणार नाहीं. या क्षणीं तो जर कोणाचें ऐकेल तर एकट्या सरदाराचेंच ! यासाठीं यतिनची व सरदाराची ताबडतोब भेट घडवून आणावी." गव्हर्नरसाहेबांनींहि प्रसंगाचें गांभीर्य लक्षांत घेऊन ताबडतोब तसें करण्यास अनुमति दिली.

या वेळीं यतिंद्र सरदारास किती मानीत असे याचा प्रत्यय आला. सरदारानें यतिंद्राची मनधरणी केली. हो त्यालाही मनधरणीच करावी लागली. अन् अखेरीस यतिंद्रानें एनिमा घेतला, व निदान त्या दिवसाचें प्राणसंकट टळलें एनिमा घेतल्यानें त्यांचें आयुष्य आतां कमींत कमी १५ दिवस तरी वाढलें आहे असें डॉक्टर म्हणाले. आपलें न ऐकतां त्यानें सरदाराचें ऐकलें हें पाहून सर्वांसच आश्चर्य वाटलें. डेप्युटी सुपरिंटेण्डेंट ऑफ पोलिस खानसाहेब खैरदिन यांनीं यतिंद्रास विचारलें, "आम्हीं तुझी एवढी मनधरणी केली तेव्हां तूं आमचें जरासुद्धां ऐकलें नाहींस, व सरदारानें सांगतांच कबूल झालास हें कसें ?" त्यावर यतिंद्र म्हणतो, "तुम्हांस माहीत नाहीं काय, कीं सरदार हा शूर योद्धा आहे. त्याचा मी अपमान कसा करूं ?"

आतां पंजाब जेल समितीचा अहवाल तयार होत आला होता. सरदारानें यतींद्रास एका प्रसंगीं औषध घेण्याची विनवणी करतांना म्हटलें, "यतिंद्रा,

आणखी थोडे दिवस धीर धर. अगदीं थोडक्या दिवसांतच पंजाब जेल समितीचा अहवाल आपल्या हातीं येईल." या वेळीं अत्यंत अशक्त झालेला यतींद्र अतिशय क्षीण आवाजांत म्हणतो, " सरदारा, माझा निर्धार मला पाळलाच पाहिजे. परंतु तुझ्याखातर आतां एकदांच तुझं ऐकतों. यानंतर मात्र मला कांहीं सांगू नकोस !" जेल समितीनें वारंवार दिलेल्या आश्वासनांवरून सर्व राजबंदींनीं २ सप्टेंबरला उपोषण स्थगित केलें होतें. एकट्या यतींद्राचें उपोषण चालू होतें. तेव्हां समितीनें त्यास सोडून देण्याची शिफारस केली होती.

जेल समितीनें तोंडास पानें पुसल्यानें राजबंद्यांनीं ६ सप्टेंबर रोजीं परत उपोषणास सुरवात केली. शिववर्मा,अजयकुमार, किशोरीलाल यांची सक्तीनें अन्न घातल्यानें मरणोन्मुख अवस्था होऊन त्यांस रुग्णालयांत जावें लागलें. हे राजबंदी आजारी पडल्याचें पाहून सरकारनें जेल नियम सुधारण्यासाठीं बिन-सरकारी सदस्यांचें बहुमत असलेलें दुसरें एक मंडळ नेमलें. या मंडळानें राजबंद्यांची गांठ घेऊन त्यांच्या सर्व मागण्या मान्य होतील असें आश्वासन दिलें. तथापि त्यांनीं केलेल्या शिफारशींचा अर्थ अधिकारी आपल्या मत-लबानुसार लावूं लागल्यानें ही तडजोड फिसकटून राजबंदींचें उपोषण चालूच राहिलें.

यतींद्राची जगण्याची आशा आतां खुंटली होती.तो मृत्यूच्या मांडीवर होता. रक्तदाब कमी झाला होता. सर्व अंग निर्जीव पडत चाललें होतें. दृष्टि क्षीण होत होती. त्याच्या छोट्या भावास त्याची शुश्रूषा करूं देण्याचें औदार्य सरकारनें दाखविलें ! इतकेंच नव्हे तर त्यास जामिनावरहि सोडण्यास सरकार तयार झालें. परंतु त्यानें तें नाकारलें व या नकारास त्याच्या वडिलांनींहि अनुमति दिली !

राजबंदीच्या उपोषणाचें प्रकरण वाढत असल्याचें पाहून सरकारनें आतां तहकूब केलेला खटला ताबडतोब निकालांत काढण्याचें ठरविलें. राजबंद्यांच्या मागण्यांस न जुमानतां खटला चालू करण्याच्या निश्चयानंतर मध्यवर्ती सर-कारचे गृहमंत्री सर जेम्स क्रेरार यांनीं सिमल्यास भरणाऱ्या अधिवेशनांत ' हंगर स्ट्राइक बिल ' आणण्याचें ठरविलें. १८९८ च्या फौजदारी काय-

द्याच्या ५४० व्या कलमांत या बिलानुसार एक फरक करावयाचा होता. तो असा कीं खटला चालू असतां आरोपीच्या वर्तनामुळें तो कोर्टांत उपस्थित राहूं शकत नसल्यास त्याच्या अनुपस्थितींतहि कोर्टानें खटला चालवावा. २२ सप्टेंबर १९२९ ला हें बिल असेंब्लीपुढें चर्चेला आलें. या बिलास सर्व सभासदांनीं जोरदार विरोध केला. बॅरिस्टर जिना यांनीं यांत पुढाकार घेतला होता. या कडव्या विरोधामुळें तें बिल मागें घेण्यांत आलें.

इकडे या बिलावर चर्चा चालू होती, तर तिकडे रुग्णालयांत शहीद होण्याच्या मार्गावर लागलेला वीर यतिंद्र आपल्या आयुष्याचे अखेरचे क्षण मोजीत होता.......१३ सप्टेंबर! आज यतींद्राचे सारे सहकारी त्याच्या सेवेस होते. उपोषणाचा तो ६२ वा दिसत होता. आतां दुपारचे बारा वाजत आहेत. यतिंद्र खरंच आतां कांहीं क्षणांचाच सोबती होता...सर्वांचे कंठ दाटून आले......सरदार मोठ्या शिकस्तीनें शांत राहिला होता...... त्यानें पुढील प्रसंगाची तयारी चालविली होती. आतां एक वाजला !...... यतींद्रानें शेवटचा श्वास सोडला ! !

यतींद्रनाथ झिंदाबाद ! इन्किलाब झिंदाबाद ! !

... . जेलचे अधिकारीहि तेथें जमले होते. त्या निढावलेल्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांतहि अखेरीस पाणी आलें तर ! जेलच्या बाहेर जमलेल्या प्रचंड जनसागराचें सांत्वन करणें अशक्य होतें. लाहोरचे पो. सु. हॅमिल्टन हार्डिंग यांनींहि त्या वीरास अभिवादन केलें...... ! !

यतिंद्राचें शव लाहोरहून कलकत्त्यास नेलें. १४ सप्टेंबरला अखिल भारतांत 'हुतात्मा यतिंद्र दिन' मोठ्या गंभीरपणें पाळण्यांत आला.

'मोठ्या लढ्यांनीं जें कार्य होत नाहीं तें सत्याग्रही आत्मत्यागानें करतो. तें कां सिद्धीस जातें हें एक गूढ आहे;—पण तें होतें एवढें मात्र निश्चित'— असे उद्‌गार आयर्लंडचा यतींद्र टेरेन्स मॅक्स्विनी यांनीं काढले होते. यतींद्रानें आपल्या हिंमतीवर ब्रिटिश साम्राज्यशाहीस वांकवून राजबंद्यांस त्यांच्या लढ्यांत विजय मिळवून दिला होता. परंतु यासाठीं त्यानें आत्माहुती दिली !

होय—गड आला पण सिंह गेला......! !

♠

## खटला परत चालू होतो

यतींद्राच्या बलिदानानें या खटल्यांतील एक पर्व संपलें होतें व खटला परत चालू झाला होता. अनेक दिवसांच्या अन्नत्यागामुळें क्षीण झालेल्या सरदाराला आधार देऊन तुरुंगांतील कोर्टांत आणतांच त्याच्या सहकाऱ्यांनीं "क्रांतीचा जयजयकार असो! साम्राज्यवादाचा नाश होवो!" अशा गगनभेदी गर्जनांनीं त्याचें स्वागत केलें. लाल शर्ट, कोट व पायजमा अशा थाटांत त्यानें प्रवेश केला. एका आरामखुर्चीवर निष्काळजीपणें त्यानें आसन मांडलें. मॅजिस्ट्रेट अगर साथीदार यांच्याकडे त्याचें फारच थोडें लक्ष असे. आपल्या सहकाऱ्यांबरोबर गप्पा मारण्यांत तो बहुतेक वेळ घालवी.

२९ तारखेस जयगोपाळ या माफीच्या साथीदाराची साक्ष सुरू झाली. आपल्या जबानींत त्यानें आपल्या जुन्या सहकाऱ्यांबद्दल अत्यंत अपमानास्पद उद्गार काढले. तेव्हां राजबंद्यांतील वयानें सर्वांत लहान अशा प्रेमदत्तनें त्यावर आपला जोडा फेंकून मारला व बाकीचे बंदी त्याकडे पाहून 'शेम! शेम!' असें ओरडले. तेव्हां कोर्टानें ताबडतोब असा हुकूम काढला कीं, राजबंद्यांस तुरुंगाबाहेर काढल्यापासून कोर्टांत आणल्यावर व परत तुरुंगांत नेईपर्यंत हातकड्या घालूनच न्यावें व आणावें. ताबडतोब सगळ्या आरोपीस हातकड्या घालण्यांत आल्या.

आरोपींनींहि आतां प्रत्यक्ष प्रतिकाराचें शस्त्र उपसलें. दुसऱ्या दिवशीं पोलिसांनीं पाशवी शक्ति पणास लावूनहि विशेष फायदा झाला नाहीं. मोठ्या कष्टानें त्यानें त्या आरोपींपैकीं ५ जणांस ते तुरुंगाबाहेरील लॉरींत आणूं शकले. परंतु मग ते लॉरीबाहेरच पडेनात! तेव्हां खटल्याचें काम त्या दिवशीं स्थगित करावें लागलें. दुसऱ्या दिवशीं, कोर्टांत गेल्यावर बेड्या काढून घेण्यांत येतील या अटीवर राजबंदी कोर्टांत आले. मॅजिस्ट्रेट-पुढें त्यांनीं तुरुंगांतील अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रारी केल्या, परंतु त्याकडे दुर्लक्ष होऊन उलट हातकड्या मात्र तशाच राहिल्या. यामुळें राजबंदी अगदीं खवळून गेले. कसेंहि करून आपला उद्देश तडीस नेण्याचें त्यांनीं ठरविलें.

दुपारची सुटी झाली; खाना खाण्यासाठीं हातकड्या काढण्यांत आल्या.

सुटी संपली व परत हातकड्या घालण्यासाठीं पोलीसांऐवजी त्यांचे अधिकारी आले ! हातकड्या घालून घेण्यास आरोपींनीं नकार दिला. झटापटीस तेथेंच सुरुवात झाली व कोर्टांत अक्षरशः रणधुमाळी माजली...पोलिसांच्या मदतीस आतां एक खास तुकडी आली व सर्व राजबंदींस भयंकर मारझोड केली. बुटाच्या टाचांनीं व हातांतील दंड्यांनीं त्यांस निर्दयपणें पिटण्यांत आलें. हा प्रकार मॅजिस्ट्रेटसाहेब व प्रेक्षकांच्या समोरच घडला.

लाहोरांत ही बातमी विद्युत्वेगानें पसरली. त्याच दिवशीं संध्याकाळीं शहरांत एक प्रचंड जाहीर सभा होऊन पोलिसांच्या या निंद्य वर्तनाचा निषेध करण्यांत आला. दुसऱ्या दिवशीं राष्ट्रीय वृत्तीच्या पोलिसांनींहि त्यांचा धिक्कार केला.

त्याचा योग्य तो परिणाम होऊन मॅजिस्ट्रेटसाहेबांवर हा हुकूम मागें घेण्याची वेळ आली. हा खटला ऐकायला येणाऱ्यांत तरुणतरुणींचाच अधिक भरणा असे. कोठलीहि निदर्शनें करण्याची संधि राजबंद्यांनीं सोडून दिली नाहीं. कोर्टांत त्यांनीं ‘ काकोरी दिन ’, ‘ लेनिन दिन ’, ‘ १ मे दिन ’, ‘ लाला लजपतराय दिन ’ हे दिवस मोठीं निदर्शनें करून साजरे केले. या प्रसंगीं ते जनतेला आपला संदेशहि देत असत. इतकेंच नव्हे तर दररोज कोर्टांत येतांच ‘Long live Revolution ! Long live Proletariate!! Down, down with Imperialism ! ’ अशा घोषणा करीत, ‘ वंदे मातरम् ’ हें राष्ट्रगीत म्हणत, व मगच खटल्याच्या कामास सुरुवात होई.

हे राजबंदी मोठे भाग्यवान् खरेच ! कोर्टांतच त्यांस नामवंत पुढारी भेटावयास येत. यांत प्रमुख म्हणजे सुभाष बोस, बाबा गुरुदत्त सिंग, के. एफ्. नरिमन, पै. रफि अहमद किडवाई, व स्व. पंडित मोतिलाल नेहरू हे होत. पंडितजी त्यांस दोन वेळां भेटले. दुसऱ्या वेळीं आरोपींच्या पिंजऱ्यांत जाऊन ते त्यांच्याशीं विशेषतः सरदाराशीं तासभर बोलत होते. दुर्दैवानें त्यांच्या संभाषणांतील महत्त्वाचा भाग कोणासहि कळला नाहीं.

या खटल्यास आतां तर आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळाली होती. खटल्याची हकीकत देणाऱ्या पत्रांकडे दूरदूरच्या देशांतील लोक वर्गणी पाठवून अंक मागवूं लागले. पोलंडमधील एका महिलेनें तर एक मोठी रक्कम अगोदरच

पाठवून खटल्याचें सविस्तर वृत्त आपणांकडे दैनंदिन येण्याची व्यवस्था केली होती. कानडा, जपान, दक्षिण अमेरिका या देशांतून बचावासाठीं मोठमोठ्या देणग्या येऊं लागल्या. देशांत दत्त-सिंह दिन पाळले जाऊं लागले व क्रांतिकारकांच्या फोटोंनीं सारे तरुण वेडे झाले ! ही गोष्ट १९२९–३० ची आहे. आणि आज देश स्वतंत्र होऊनहि १९५५ मध्यें आजचा तरुण वर्ग सुरैय्या, नर्गिस आदि नट्यांचे फोटो बाळगण्यांतच जीवितसाफल्य मानीत आहे ! असो.

राजबंद्यांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढतच होत्या. जेल कमिटीच्या सुधारणा कागदावरच राहिल्या होत्या म्हणून सरदारानें गृहमंत्रि सर जेम्स क्रेरार यांस देण्यासाठीं म्हणून मॅजिस्ट्रेट साहेबांकडे एक पत्र दिलें. त्यांत त्यानें आपल्या जुन्या मागण्यांचा पाढा वाचून त्यांस गृहमंत्र्यांनीं सात दिवसांत उत्तर न दिल्यास राजबंदी परत उपोषणास सुरुवात करतील असें स्पष्टपणें बजाविलें होतें. तथापि गृहमंत्र्यांनीं कांहींच उत्तर पाठविलें नाहीं व पुन्हा एकदां उपोषणास सुरुवात झाली. त्यामुळें ८ फेब्रुवारी ते ८ मार्चपर्यंत खटला तहकूब करावा लागला. या खटल्यांत सरकारतर्फें ६०७ साक्षीदारांच्या जबान्या होणार होत्या, व ९ महिने खटला चालून केवळ २३० साक्षीदार कोर्टापुढें आले होते. राजबंद्यांविरुद्धहि सरकारनें खूपच अपप्रचार चालविला होता. म्हणून सरदार व दत्त यांनीं ११ फेब्रुवारी १९३० रोजीं तुरुंगाच्या सुपरिंटेण्डेंटमार्फत स्पेशल मॅजिस्ट्रेटला पुढीलप्रमाणें पत्र पाठविलें.

“आपल्या दि. ६ फेब्रुवारीच्या आज्ञेनुसार, दि. ६ फेब्रुवारीच्या सिव्हिल ॲण्ड मिलिटरी गॅझेटांत जो मजकूर आला आहे त्यामुळें आम्हीं कोर्टांत कां येत नाहीं याचा खुलासा करणें आम्हांस आवश्यक वाटूं लागलें आहे. आम्ही ब्रिटिशांच्या न्यायालयावर बहिष्कार टाकलेला नाहीं. आमच्या मागण्या आम्हीं आपल्यापुढें अनेक वेळां ठेवल्या आहेत. परंतु त्यांची कधींहि दखल घेतली गेलेली नाहीं. आरोपी निरनिराळ्या प्रांतांतील असल्यानें त्यांस आपल्या आतेष्टांच्या भेटीगांठीसाठीं आवश्यक त्या सवलती देणें जरूर आहे. न्यायाच्या नांवाखालीं अशा रीतीनें न्यायाचें नाटक चालू आहे. आमची आणखी एक तक्रार वर्तमानपत्रांविषयीं आहे. राजबंद्यांस

कमींतकमी एक पत्र तरी मिळावयास पाहिजे. अधिकारी केवळ कोर्टांतच एक वृत्तपत्र देण्यास तयार आहेत, परंतु आमच्यांतील इंग्रजी न जाणणारांस देशी भाषेंतील पत्र मिळालें पाहिजे. म्हणून आम्हीं प्रतिगामी विचारसरणीचें ट्रिब्यून हें पत्र परत करीत आहोंत. या अडचणी दूर झाल्यावर कोर्टांत येण्यास आम्हांस कोणताच प्रत्यवाय नाहीं."

परंतु या पत्राचाहि उपयोग न झाल्यानें राजबंद्याचें उपोषण चालूंच राहिलें. तेव्हां जगांत महिनेन्‌महिने होत असलेली आपली छीः थू बंद करण्या-साठीं सरकारनें खटला झपाट्यानें उरकण्याचें ठरविलें व दि. १ मे १९३० ला एक खास वटहुकूम काढला. या वटहुकुमानें आतां आरोपींच्या गैर-हजेरींतहि खटला चालणार होता !

♠

## : १४ : अखेर खटल्यावरच बहिष्कार !

खटला रेंगाळत चाललेला पाहून तसेंच तो ऐकण्यास येणाऱ्या तरुणांवर त्याचा विपरीत परिणाम होण्याचा धोका लक्षांत घेऊन त्याचा लवकर निकाल लावण्याकरितां पंजाब सरकारनें लाहोर कॉन्स्पिरसी केस ऑर्डिनन्स हिंदुस्थान सरकारकडे मंजुरीसाठीं पाठविला. यामुळें अकारण प्रक्षोभ माजेल अशा भीतीनें हिंदुस्थान सरकारनें त्यास मंजुरी न देण्याचें ठरविलें परंतु नंतर सरकारचा खुद्द कॉंग्रेसशींच लढा चालू झाला, व अनेक वटहुकूम निघूं लागले; त्यामुळें लोकक्षोभाचा विचार सरकारपुढें नसल्यानें १ मे १९३० ला हा वटहुकूम जारी करण्यास सरकारनें परवानगी दिली.

या वटहुकुमानुसार हा खटला मॅजिस्ट्रेट श्रीकृष्णसिंह यांजकडून काढून घेऊन तो एका खास ट्रिब्यूनलपुढें चालावा असें ठरलें. मि. जस्टिस कोल्ड-स्ट्रीथ, मि. जस्टिस आगा हैदर, व मि. जस्टिस हॅमिल्टन या लाहोरच्या तिन्ही हायकोर्ट जजांचें मिळून हें ट्रिब्यूनल स्थापन झालें. वटहुकुमानुसार

आतां खटला आरोपींच्या गैरहजेरींतहि चालणार असून ट्रिब्यूनलनें दिलेल्या निर्णयाविरुद्ध हायकोर्टांत अपील करतां येणार नव्हतें.

हा खटला चालू असतां सरकारलाही कांहीं धक्के मिळाले होतेच. सॉंडर्सच्या हत्येच्या वेळीं उपस्थित असलेला एकमेव पोलीस अधिकारी मि. फर्न याला भगतसिंगास कोर्टात ओळखतां आलें नव्हतें. खटल्यास मिळालेल्या जनतेच्या सहानुभूतीमुळें कांहीं महत्त्वाचे साक्षीदारहि आतां उलटले होते व आणखी कांहीं साक्षीदार आयत्या वेळीं उलटण्याची शक्यता होती; तसेंच माफीच्या साक्षीदारांपैकीं दोघांनीं आपले कबुली जबाब फिरविले होते ! त्यामुळें राजबंदीस सर्व प्रकारच्या कायदेविषयक सवलती दिल्यास या पोकळ पुराव्याच्या तटबंदीस भारतांतील कायदेपंडित ताबडतोब मोठमोठीं खिंडारें पाडण्याचा धोका होता व असें झाल्यास खटल्याचा बोजवारा उडून सरकारची अधिकच फटफजिती झाली असती. हें टाळण्यासाठींच हा वटहुकूम जारी करण्यांत आला.

जुलैच्या मध्यास जेल कमिटीनें आपल्या शिफारशींत राजबंद्यांचे अ, ब व क असें वर्गीकरण करून या राजबंदींस अ व ब वर्ग दिला. त्यामुळें त्यांचें समाधान होऊन २० जुलैला राजबंद्यांनीं उपोषण बंद केलें. या खटल्यांत भाग घ्यावा कीं नाहीं, या मुद्यावर राजबंद्यांत कांहीं दिवस मतभेद झाला होता. परंतु अखेरीस आपल्या मनाविरुद्ध केवळ सहकाऱ्यांच्या मतास मान देण्यासाठीं सरदार खटल्याच्या कामकाजांत भाग घेण्यास तयार झाला.

या ट्रिब्यूनलपुढें १५ दिवस खटला चालला असेल नसेल तोंच परत लढ्यास तोंड फुटलें. या वेळींही खटला चालू होण्यापूर्वीं आरोपी निरनिराळ्या घोषणा व वंदे मातरम् हें राष्ट्रगीत म्हणत, व मगच खटल्याच्या कामास सुरुवात करूं देत ! न्यायाधिशांस या गोष्टीची हळूहळू चीड येऊं लागली. व एक दिवस त्यांनीं सर्व राजबंदीस राष्ट्रगीत झाल्यावर हातकड्या घालण्याचा हुकूम फर्माविला. अर्थात् राजबंदींनीं याचा प्रत्यक्ष प्रतिकार केला. तेव्हां ताबडतोब सर्वांसमक्ष चाळीस पन्नास पोलिसांनीं त्यांचेवर भयंकर लाठीहल्ला केला. राजबंदींनीं त्याचा केवळ आपल्या मनगटांनीं प्रतिकार केला. त्यांच्या

डोक्यावर, छातीवर, हातावर भयंकर मार बसला, व रक्तबंबाळ, घायाळ स्थितींत त्यांस कोर्टाबाहेर नेण्यांत आलें. या मारामुळें कांहीं बंदींस तर अनेक दिवस जागचें हालणेंहि अशक्य झालें. अशा स्थितींतहि त्यांनीं हातकड्या काढून घेण्याचा आग्रह धरला, व अशा प्रकारांची पुनरावृत्ति न होण्याची हमी मागितली. अर्थात् ती नाकारण्यांत आली. तेव्हां राजबंदींनीं परत कोर्टांत न जाण्याचें ठरविलें. पूर्वींच्या अनुभवावरून राजबंदी कोर्टांत येणार नाहींत याची सरकारला खात्री होती. आणि त्यांच्या अनुपस्थितींतही खटला चालू राहण्यासाठींच तर वटहुकूम जारी करण्याची कारवाई करण्यांत आली असल्यानें सरकारला राजबंद्यांच्या उपस्थितीचा-अनुपस्थितीचा आतां विधिनिषेध उरला नव्हता.

या ट्रिब्यूनलमध्यें न्यायमूर्ति आगा हैदर हे एकमेव हिंदी न्यायाधीश होते. त्यांच्या डोळ्यांसमक्ष राजबंद्यांस झालेली भयंकर मारहाण पाहून त्यांनीं बेड्या ठोकण्याच्या व राजबंदींविरुद्ध पाशवी सामर्थ्य वापरण्याच्या हुकुमाशीं आपला कांहीं संबंध नसल्याचें जाहीर केलें. त्यामुळें थोड्याच दिवसांत ट्रिब्यूनलची पुनर्घटना होऊन त्यांतून हैदर यांस वगळण्यांत आलें.

अशा रीतीनें आरोपीशिवाय, त्यांच्या वकिलांशिवाय, त्यांच्या बाजूच्या साक्षीदारांशिवाय, आणि शिक्षा देतांना आपलें स्वतंत्र मत देण्याची शक्यता असलेल्या न्यायमूर्तींशिवाय हा खटला (!) पुढें चालू राहिला. तिकडे राजबंदी तुरुंगांतच आपला असलेला काल आनंदानें घालवूं लागले ! तेव्हां आपणहि कोर्टाचें कामकाज पाहण्यांत वेळ व्यर्थ न दवडतां सरदाराचें तुरुंगांतील जीवन, त्याचें तत्त्वज्ञान, त्याचा बाणेदारपणा इत्यादि स्वभावविशेषांचें अवलोकन करूं या.

## व्यक्ति व विचारदर्शन

लाहोर कटांतील हे सर्व आरोपी अतिशय बुद्धिमान् व व्यासंगी होते. सरदार हा सर्वांत अग्रेसर होता. साम्यवाद हा त्याचा खास अभ्यासाचा विषय होता. रशियांतील राज्यक्रांतीचा त्यानें सखोल अभ्यास केला होता. त्या देशांत चाललेल्या आर्थिक प्रयोगानें त्याचें लक्ष वेधवून घेतलें होतें. साम्यवादी कल्पनांकडे इतरांपेक्षां तोच सर्वांत अधिक ओढला गेला होता. तो नास्तिक असल्यामुळें पूर्वींच्या दहशतवाद्यांचा धार्मिकपणा त्याच्या ठायीं नव्हता. तरी तो अत्यंत भावनाप्रधान होता हें खरें. सोलापूरचें बंड, पेशावरचा उठाव, चंद्रसिंगाच्या नेतृत्वाखालीं गढवाली सैनिकांनीं दाखविलेला बाणेदारपणा, बब्बर अकाली दलाची चळवळ इत्यादि घटनांचा त्याच्या मनावर फार परिणाम झाला होता.

तो अतिशय संवेदनाक्षम होता. स्पेशल कोर्टांत आपल्या सहकाऱ्यांस तो लिओनॉइड अँड्रीव्हची ‘ Seven that were hanged ’ ही कादंबरी वाचून दाखवीत होता. या कादंबरींतील एका पात्राचा फांशीचें नांव काढतांच भीतीनें थरकांप होत असे. ‘ I shall not be hanged ’ असें तो प्रत्यक्ष फांसावर नेला जात असतांनाहि म्हणत होता. ती त्याची करुण अवस्था पाहून सरदाराच्या डोळ्यांतून खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या ! आणि हाच हळुवार अंतःकरणाचा सरदार हंसत हंसत फांशीं गेला. खरोखर लोण्यासारखें मऊ व हिऱ्यासारखें कठोर असें त्याचें अंतःकरण होतें.

त्याला कादंबऱ्यांची आवड असली तरी त्याचें बरेचसें वाचन आर्थिक व राजकीय अशा जोडविषयावरच असे. तुरुंगांत तो चार्लस डिकन्स वाचूं लागला. तो त्याचा आवडता लेखक होता. अप्टन् सिंक्लेअरच्या ‘ बोस्टन ’, ‘ जंगल ’, ‘ ऑइल ’, ‘ काय फॉर जस्टिस ’ या त्याच्या आवडत्या कादंबऱ्या होत्या. हॉल कॅबनचें ‘ इटर्नल सिटी ’ त्यास फार

आवडत असे. त्यांतील रोमिलीचा कांहीं भाग तर त्यानें पाठ केला होता. रीडस्चें ' टेन डेज् दॅट शुक दि वर्ल्ड ' रॉपशीनचें ' व्हॉट नेव्हर हॅपंड् ' मॅक्झिम गॉर्कीचें 'मदर', तसेंच 'करिअर ऑफ अ निहिलिस्ट, ' बर्थ ऑफ रशियन डेमॉक्रसी ' इत्यादि पुस्तकें त्यास फार आवडलीं होतीं.

रशियन राज्यक्रांतीच्या यशामुळें तो हळूहळू साम्यवादाकडे अधिकाधिक झुकूं लागला. काकोरीच्या कटांतील आरोपींस फांशीं दिल्यानंतर केवळ एक प्रतिक्रिया म्हणून कांहीं काळ तो दहशतवादी होता. त्याचा सारा विश्वास ' जनतेकरितां जनतेच्या सामुदायिक चलवळीं'वर होता. कॉंग्रेस ही बड्या भांडवलदारांची, जमीनदारांची, व मोठमोठ्या नाणावलेल्या कायदेपंडितांची संस्था असून या ,तिच्या स्वरूपामुळें देशास आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करून देईल अशी कोणतीहि चळवळ तिला हातीं घेतां येणार नाहीं असें त्याचें मत होतें. 'महात्माजींबद्दल त्यास नितांत आदर असूनहि त्यांचें तत्त्वज्ञान त्यास पसंत नव्हतें. "Gandhiji is a philanthrophist but it is not philantrophy but a dynamics scientific social force that is needed" असें त्यास वाटत असे.

तुरुंगांतच त्यानें साऱ्या भारतीय राज्यक्रांतीचा इतिहास लिहिला होता. क्रांतिकारकांचीं चरित्रें सारें लेखनकौशल्य पणास लावून लिहिलीं. हिं. सो. री. आर्मीचा चार पानी जाहिरनामा त्यानें संध्येसारखा पाठ केला होता. तुरुंगांत असतांनाच त्यानें युक्तीनें Youth Leaguers या संघटनेच्या लाहोर् येथें १९२९ मध्यें भरलेल्या अधिवेशनांत 'Philosophy of Bomb' ह्या क्रांतिकारक पत्रासाठीं संदेश पाठविला होता. फांशीं जाण्यापूर्वी Young Political Workers करितां त्यानें तयार केलेलें पत्रक म्हणजे त्याचा अंतिम संदेशच होय. त्याचा आशय असा —

" स्वातंत्र्याच्या चळवळीला आतां महत्त्वाचें स्वरूप प्राप्त होत चाललें आहे. एका वर्षाच्या दांडग्या लढ्यानंतर वर्तुळ परिषदेंत कांहीं तरी निश्चित स्वरूपाच्या राज्यघटनेची योजना तयार करण्यांत आली, व कॉंग्रेसच्या नेत्यांना आपली चळवळ मागें घेण्याची विनंति करण्यांत आली. तें आतां ही चळवळ मागें घेतात वा नाहीं याचा आपणास काय विधिनिषेध ?

कोणताही लढा सुरू झाल्यावर ताबडतोब वा कालांतरानें तडजोड घडून येते. तडजोड करणें म्हणजे पराभव व कमीपणा अशी सर्वसाधारण समजूत असते. परंतु राजकीय लढ्यांत तडजोड अत्यंत आवश्यकच असते. मात्र ती स्वातंत्र्यवाद्यांचें सामर्थ्यसंवर्धकच असली पाहिजे. यासंबंधीं आपण रशियाचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवूं.

१९०५ सालीं रशियांत क्रांतिकारक चळवळीस प्रारंभ झाला. सर्व नेत्यांना यशाबद्दल खात्री होती. अज्ञातवासांतून लेनिन परत स्वदेशीं गेला व तोच स्वातंत्र्ययुद्धाचा नेता झाला. परंतु त्यालाहि तडजोड करावीच लागली. तडजोड हें लढयांतील एक शस्त्र आहे. आम्हांला मवाळांच्या उथळ ध्येयाची मात्र चीड आहे.

मी कांहीं प्रसंगीं दहशतवादाचा अंगिकार केला असला तरी खरोखरीं मी अत्याचारी खुनी पक्षाचा नाहीं. मी एक उघड क्रांतिकारक आहें. आमच्या लढयासंबंधींच्या कार्यक्रमाबद्दल माझ्या कल्पना निश्चित आहेत. अत्याचारी चळवळीपासून व केवळ दहशतवादानें विशेष फायदा होणार नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. इतर मुत्सद्देगिरीशिवाय नुसती बॉम्बफेक केवळ निष्फळच नव्हे तर नुकसानकारकहि आहे. शेतकरी कामकरी वर्गांच्या नेतृत्वाखालीं क्रांतिकारक लढा चालविल्याखेरीज देशास स्वातंत्र्यप्राप्ति होणार नाहीं !"

याच विचारांचें एक पत्र त्यानें मॉडर्न रिव्ह्यूचे संपादक कै. रामानंद चतर्जी यांस लिहिलें होतें. राजबंदी तुरुंगांत आल्यावर ज्या घोषणा करीत त्यांपैकीं Long live Revolution या घोषणेस त्यांनीं आपल्या पत्रांतून Nonsensical असें म्हटलें होतें. त्यास सरदारानें पुढील आशयाचें उत्तर पाठविलें होतें.

"आपल्या लोकप्रिय मासिकांत 'क्रांति चिरायु होवो' या मथळ्याखालीं आपण कांहीं संपादकीय मजकूर लिहिला आहे. हा जयजयकार अर्थशून्य असल्याचें आपण म्हटलें आहे. हा जयजयकार आम्हीं शोधून काढलेला नाहीं. रशियन राज्यक्रांतींत त्याचा वारंवार उद्घोष होई. सुप्रसिद्ध अमेरिकन ग्रंथकार सिंक्लेअर यानें 'बोस्टन' व 'ऑइल' या कादंबऱ्यांतहि पात्रांच्या

तोंडीं हा जयजयकार घातला आहे. रक्तपाताचा लढा अखंड चालू रहावा, किंवा जगांत कोणतीच गोष्ट स्थिर राहूं नये असा त्याचा अर्थ होत नाहीं. एकच परिस्थिति कायम राहून देशाची प्रगति खुंटूं नये म्हणून नवी घडी निर्माण करण्याचा प्रयोग म्हणजेच क्रांति! 'क्रांति चिरायु होवो' ही घोषणा आम्ही याच अर्थानें घेतों."

देशकार्य करीत असतां विशेषतः पारतंत्र्यांत ब्रिटिशांशीं लढत असतां अनेक तरुणांपुढें कुटुंबकर्तव्य कीं देशप्रेम, मातृपितृभक्ति कीं स्वदेशकर्तव्य असा यक्षप्रश्न उभा राहात असे. सरदाराचे बाबतींत असा प्रश्नच उद्‌भवण्याचें कारण नव्हतें कां कीं त्याचें घराणेंच क्रांतिकारक होतें तरीही प्रेम आंधळें असतें म्हणतात तें खोटें नाहीं. सरदारास लाहोर कटांत गोंवण्यांत येऊन, सॉंडर्सच्या हत्येचा आरोप त्यावर आला तेव्हां आपला पुत्र फांशीं जाणार या असह्य कल्पनेनें त्याच्या पित्यास फार दुःख झालें; आणि निदान फांशींतून तरी त्याची सुटका करण्यासाठीं तो हत्येच्या दिवशीं लाहोर शहरांतच नव्हता असें सिद्ध करण्याची त्यांनीं धडपड सुरू केली. सरदाराला आपला असा भेकड बचाव करण्याचा प्रयत्न व्हावा ही गोष्ट पसंत नव्हती. म्हणून त्यानें वडिलांस पत्र लिहिलें त्याचा आशय असा :

"तुम्हीं माझ्या बचावाबाबत ट्रिब्यूनलकडे अर्ज केलात हें ऐकून आश्चर्य वाटलें. त्या बातमीनें माझ्या मनास असह्य धक्का बसला. या वेळीं व अशा परिस्थितींत तसा अर्ज करणें तुम्हांस योग्य कसें वाटलें तेंच मला समजत नाहीं. राजकीय बाबतींत तुमचा व माझा मतभेद असे; तथापि पसंती ना पसंतीची कदर न बाळगतां मी माझ्या मनाप्रमाणेंच वागत आलों आहे हें तुम्ही जाणतांच; आणि म्हणून वडील या नात्यानें तुम्हांविषयीं मला अत्यंत आदर वाटत असला तरी मला न कळवितां माझ्यातर्फे असा अर्ज करण्याचा अधिकार आपल्याला नव्हता.

माझ्यावर कसलेहि आरोप असले तरी खटल्यांतील चौकशीबद्दल पूर्ण बेफिकीर राहण्याचें माझें धोरण आहे. माझ्या प्राणांची किंमत तुम्हांस वाटत असेल पण मला तो माझ्या उच्च तत्त्वांच्या बदल्यांत वांचविण्याइतका मोलाचा खचित वाटत नाहीं. आम्हीं सर्वांनीं एकच धोरण स्वीकारलें आहे.

याबाबत आतांपर्यंत आम्ही एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून उभे आहोंत, व अखेरपर्यंतहि तसेच राहूं. मग त्याबद्दल कितीहि वैयक्तिक देहदंड भोगावा लागला तरी त्याची आम्हांस पर्वा नाहीं. तुम्ही मला वांचविण्याचा प्रयत्न केलात यामुळें माझ्या पाठींत सुरा खुपसल्यासारखें झालें आहे. असा प्रयत्न जर दुसऱ्या कोणीं केला असता तर त्याला मीं द्रोही व विश्वासघातकी म्हटलें असतें. पण तुम्ही माझे वडील आहांत, म्हणून इतकेंच म्हणतों कीं हा तुमच्या मनाचा कमकुवतपणा झाला ! ही वेळ प्रत्येकाच्या परीक्षेची होती. त्यांत तुम्ही अपेशी ठरलांत. ''

स्वतःच्या प्राणांबद्दल ही बेफिकीर वृत्ति अखेरच्या क्षणापर्यंत त्यानें कायम ठेविली होती. अितकें अचल मनोधैर्य, हंसत हंसत मृत्युंजय होण्याची किमया, ज्या साम्राज्यावर सूर्य कधींच मावळत नसे त्या ब्रिटिश सत्तेस कःपदार्थ मानण्याचा बेडरपणा इत्यादि सद्‌गुणांचा समुच्चय होण्याचें भाग्य विरळाच लाभतें. फांशीं जाण्यापूर्वीं सरदारानें आपल्या अत्यंत लाडक्या अशा धाकट्या भावास – कलतारासिंगास लिहिलेल्या अखेरच्या पत्रांतहि या सद्‌गुणांची प्रचीति येते. सरदार लिहितो —

प्रिय कलतारा,

तुझ्या डोळ्यांत अजून राहिलेलें पाणी पाहून व ओंठावर अडखळणारे शब्द ऐकून मला किती वाईट वाटलें याची तुला कल्पनाहि येणार नाहीं. असा बावरून जाऊं नकोस, मन लावून अभ्यास कर. प्रकृतीची विशेष काळजी घे. जास्त काय लिहूं ? खालील चार शब्द मी मुदाम तुझ्यासाठीं लिहीत आहें. मला विसरलास तरी चालेल, पण या शब्दांना मात्र विसरूं नकोस.

दैवाविरुद्ध कुरकुरणें रास्त नाहीं. सर्व जग जरी माझ्याविरुद्ध गेलें, तरी हृदयांत जोपासलेल्या ध्येयास मी दूर करणार नाहीं. परिस्थितीशीं झुंज करण्यांतच खरें शौर्य आहे. बंधूंनो, हाच माझा शेवटचा प्रणाम ! अरुणोदय होत असतां आपलें कर्तव्य बजावून प्रभातींच्या उगवत्या किरणांत विलीन पावणाऱ्या ताऱ्यांचें भाग्य मला लाभलें आहे. क्रांतीची ठिणगी पाडण्यासाठीं आम्ही आमच्या देहाचा उपयोग केला त्याबद्दल आम्हांस अभिमान वाटतो.

आतां फांशीच्या घडवंचीवर चढतांना मला मुळींच वाईट वाटणार नाहीं. हिंमत धर !

" What harm if a handful of dust is destroyed !! "

सरदाराचा व्यासंग, सहकाऱ्यांवरील भक्ति, कठोर कर्तव्यनिष्ठा, बाणेदारपणा, मनाचा हळुवारपणा, त्याचे राजकीय विचार इत्यादि गोष्टींचें दर्शन घेण्यांत तुम्ही गढले आहांत खरें, परंतु तिकडे पहा चंद्रशेखर आझादच्या आत्मसमर्पणानें साऱ्या भारतांत केवढी खळबळ उडाली आहे !

♠

## : १६ : चंद्रशेखरचें आत्मसमर्पण

लाहोर कटांतील आरोपींवर खटला चालू झाल्यानें हिं. सो. रि. आर्मीचें अवतारकार्य संपलें असें समजण्याचें कारण नाहीं. आणि त्याची भीषण प्रचीति २३ फेब्रुवारी १९३१ ला अलाहाबाद येथील ऑल्फ्रेड पार्कमध्यें चंद्रशेखर आझादनें अगदीं एकाकी सशस्त्र पोलिसांशीं झुंज देऊन त्या युद्धांत आत्मसमर्पण करून आली.

चंद्रशेखर आझाद ! हिं. सो. रि. आर्मीचा सरसेनापति ! क्रांतिकारक चळवळीच्या अखेरच्या पर्वांत अखेरच्या सैनिकांचें स्फूर्तिस्थान ! साम्राज्यशाहीवर वेळोवेळीं अचानक आघात करणाऱ्या अनेक गुप्त योजनांचा सूत्रधार ! अनेक राजकीय खटल्यांतील फरारी आरोपी ! क्रांतिकारकांनीं एकाकीपणें लढविलेल्या महाभारतीय युद्धांत घटोत्कची पराक्रम करणारा. आणि अखेरीस, हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्यास मिळालेल्या फंदफितुरीच्या शापाच्या चक्रव्यूहांत सांपडून आत्मबलिदान करणारा वीर अभिमन्यु - धन्य तो वीर चंद्रशेखर ! !

अशा या अद्भुतरम्य चंद्रशेखरचा इतिहास हेंहि एक मोठें गूढच आहे. सरकारी कागदपत्रांप्रमाणें त्याचा जन्म १९०७ सालीं बनारसमधील भेलुपुरा या ठिकाणचे पंडित वैजनाथ यांच्या कुटुंबांत झाला असावा.

काशीमध्यें त्याचें नांव प्रथमतः १९२१ मध्यें ऐकण्यांत आलें. त्या वेळीं ड्यूक ऑफ विंडसर हिंदुस्थानला भेट देणार होते. कॉंग्रेसनें या भेटीवर बहिष्कार घालण्याचें घोषित केलें होतें. चंद्रशेखर व मन्मथनाथ गुप्त या दोघांना बनारसच्या सरकारी संस्कृत विद्यालयावर निरोधन केल्याबद्दल पकडण्यांत येऊन त्यांवर खटला भरला. चंद्रशेखर त्या वेळीं चौदा वर्षांचें कोंवळें पोर होतें! खटला सुरू झाल्यावर मॅजिस्ट्रेटसाहेबांनीं विचारलें,

"तुम्हारा नाम क्या है?"

"मेरा नाम आझाद है!"

"पिता का नाम?"

"स्वतंत्र!"

"निवासस्थान?"

"जेलखाना!"


या उत्तरांनीं मॅजिस्ट्रेट क्रोधाविष्ट झाले, व त्यांनीं मन्मथनाथला ३ महिने कैदेची, तर शेखरला १५ फटक्यांची शिक्षा दिली! चौदा वर्षांचा कोंवळा पोर! आणि त्याला १५ फटक्यांची शिक्षा! अपराध काय? तर मातृभूमीवर प्रेम!

झालें! शिपायांनीं त्याचें शरीर बांधण्यास सुरुवात केली. तेव्हां तो म्हणतो, "बाँधते क्यों हो? मारो, मैं खडा हूं!" हें दृश्य पाहून तेथील लोक भीतीनें कांपूं लागले. काय खरोखरच का त्याला फटके मारणार? होय, मॅजिस्ट्रेटच्या हुकुमांचें पालन करणें शिपायांचें कर्तव्य होतें ना! आझादच्या अंगावर भराभर फटके मारण्यास सुरुवात झाली. परंतु प्रत्येक फटक्या-बरोबर मोठ्यामोठ्यानें 'वंदे मातरम्! महात्मा गांधी की जय!' अशा घोषणा तो करीत होता,–अन् अखेरीस तो मूर्च्छित झाला. त्याच्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहात होत्या! शुद्धीवर आल्यावर तो उठला व कांहीं मित्रांबरोबर घरीं आला!

शेखरच्या शिक्षेची वार्ता वायुवेगानें साऱ्या काशी शहरांत पसरली. लोक मोठ्या भाविकतेनें त्याच्या दर्शनास येऊं लागले. त्याच्या चेहऱ्यावर शोक वा दुःखाचें कोणतेंहि चिन्ह नव्हतें. इतकेंच नव्हे तर मोठ्या प्रसन्नतेनें



चंद्रशेखर आज़ाद



शिवराम राजगुरु

तो प्रत्येकाचें स्वागत करीत होता. फटक्यांच्या शिक्षेनें त्याच्या शरीरावर नव्हे तर मनावर आघात झाले होते. याच प्रसंगानें तो दहशतवादी झाला, आणि त्याचें नांव आझाद म्हणून सर्वत्र मशहूर झालें !

कांहीं लोकांनीं त्याचें स्वागत करण्याचें ठरविलें. कांहींनीं या प्रसंगीं लहानमोठीं भाषणेंहि दिलीं. भाषणानंतर आझाद उभा राहिला. परंतु सभा इतकी मोठी होती, व आझाद इतका लहान होता कीं तो लांबून कोणासहि दिसेना ! तेव्हां त्याला टेबलावर उभें करण्यांत आलें, व तारस्वरानें लोकांनीं महात्मा गांधी की जय अशी घोषणा केली. आझादनेंहि एक छोटेंसें भाषण केलें. नंतर त्याला इतके हार घालण्यांत आले कीं त्याचें शरीर दिसेनासें झालें. वृत्तपत्रांतूनहि त्याचे फोटो झळकून त्याचा सर्वत्र जयजयकार झाला.

काशीच्या राष्ट्रीय विद्यापीठांत त्याच्या शिक्षणाची आतां सोय झाली. तथापि त्याचें लक्ष अभ्यासांत कोठें होतें ! आतां त्याची मन्मथनाथ गुप्त, प्रणवेश चतर्जी, राजेंद्रनाथ लाहिरी व सचींद्रनाथ बक्षी आदि तरुण क्रांतिकारकांशीं दोस्ती झाली होती. असहकारितेच्या विफलतेनंतर क्रांतिकार्यास परत जोर चढला होता, व त्याची हिं. सो. रि. आर्मीच्या स्थापनेंत परिणति झाली. आझाद या सेनेचा पहिला सरसेनापति झाला. क्रांतिकारकांच्या अनेक योजना आंखण्याची व त्या पार पाडण्याची जबाबदारी सरदाराप्रमाणें त्याच्यावरहि तितक्याच प्रमाणांत येऊं लागली.

काकोरी कटानंतर १९२५ मध्यें सर्व हिंदुस्थानभर पेशावरपासून तों रंगूनपर्यंत एक जाहीरनामा एकाच दिवशीं वांटला गेला. सचिंद्रनाथ सन्यालनें लिहिलेल्या या जाहीरनाम्याचें नांव Revolutionary असें होतें. या सर्व योजनेमागें शेखरच होता. काकोरीच्या कटांत आझाद व कुंदनलाल हेच काय ते पोलिसांस सांपडले नव्हते. तथापि आतां काशींत राहणें धोक्याचें असल्यानें तो झांशीला येऊन राहिला. या ठिकाणीं तो मोटर हांकण्यास व नेमबाजी शिकला. हिं. सो. रि. आर्मीचें केंद्रस्थानहि आतां झांशीच झालें होतें. सरदार व आझाद यांच्या युतीमुळें क्रांतिकार्यास जोराची चालना मिळाली. दलांत नवीन तरुणांची भरती करणें, त्यांच्या कुवतीनुसार त्यांस कामें देणें, शस्त्रें तयार करणें, पत्रकें छापणें, वांटणें,

द्रव्यासाठीं लहानमोठे दरोडे घालणें, अशा प्रकारचीं कामें आतां सुरू झालीं.

सरदार व आझाद या दोघांनींहि क्रांतिकार्याची नौबत देशभर फडकविली. सरदाराच्या जीवनचरित्राची आझादच्या चारित्रकथनाशिवाय सांगता होत नाहीं. तथापि या दोघांच्या प्रकृति अगदीं परस्पर भिन्न होत्या. आझाद सरदारापेक्षां कितीतरी धीमा व शांत असे. तो कधींही त्रासून जात नसे. किंवा त्याच्या मनाचा तोलहि सुटत नसे. तो एक प्रचंड, धिप्पाड, पोलादी पुरुष होता. सरदाराच्या ठिकाणचा आवेश त्याच्या ठायीं नव्हता, किंवा सरदाराची व्यापक प्रतिभा वा बुद्धिवैभवहि त्याकडे नव्हतें. बौद्धिक व्यासंगाला त्याला फारशी सवड न मिळाल्यानें नवनवीन कल्पनांचें आकलन होण्यास त्यास वेळ लागे. त्याच्या अंगची ताकद, विलक्षण व अनपेक्षित असे चापल्य, व अव्वल दर्जाची नेमबाजी यामुळें अनेक वेळां पोलिस दलास सरदारापेक्षांहि त्याचीच अधिक दहशत वाटत असे. त्याच्या एकूण देहयष्टीवरून कोणासहि कल्पना येणार नाहीं, परंतु तो अतिशय आनंदी व खिलाडू वृत्तीचा, तसेंच कोटिबाज व विनोदीहि होता. सहकाऱ्यांच्या अडीअडचणीकडे तो विशेष लक्ष देत असे. तथापि तो शिस्तीचा अत्यंत भोक्ता असल्यानें एकदां ठरलेल्या कामांत चुकारपणा वा ढिलेपणा स्वतःकडून घडलेला अगर इतरांनीं केलेला त्यास सहन होत नसे. संघटनाकौशल्य हा त्याचा सर्वांत गुण होता. त्यानें हातीं घेतलेलें काम फत्ते होणारच असा सर्वांचा विश्वास असे.

आझादानें क्रांतिकार्याच्या प्रत्येक क्षेत्रांत काम केलें आहे. काकोरी खटल्यांत तो फरारी म्हणून त्यास पकडण्यास २ हजार रुपयांचें इनाम जाहीर झालें होतें. सॉंडर्सच्या हत्येच्या योजनेंत तो होताच. सरदाराचा पाठलाग करणाऱ्या चाननसिंहास त्यानेंच अचूक गोळी मारून यमसदनास पाठविलें होतें. पंजाब नॅशनल बँकेवर दरोडा घालण्याची योजना त्यानेंच आंखली होती. कानपूर येथील बॉम्बचा कारखाना तो चालवीत होता. १९२९ च्या डिसेंबरांत व्हाइसरॉयच्या गाडीवर बॉंब टाकण्यांत आले. परंतु ते थोडक्यांत बचावले. ही योजनाहि आझादचीच होती. या प्रकरणांतहि यशपालबरोबर फरारी आरोपी म्हणून त्याचें नांव जाहीर करण्यांत आलें. लाहोरच्या दुसऱ्या कटाच्या वेळीं सरदार व बटु किशोर

दत्त यांची सुटका करण्याचें त्यानें ठरविलें होतें. आरोपींस कोर्टांत नेत असतां शिपायांवर हल्ला करून आरोपींस मुक्त करण्याचें ठरलें होतें. तथापि ज्या ठिकाणीं त्यानें आपला तळ ठोकला होता तेथें अचानक बॉम्बस्फोट झाला व ही योजना त्यामुळें रद्द करावी लागली तेव्हां तेथून निसटून तो दिल्लीस आला, व तेथें एके रात्री आपल्या कांहीं सहकाऱ्यांच्या मदतीनें त्यानें गाडोदिया स्टोअर्सवर दरोडा घालून १३ हजार रुपये हस्तगत केले. लाहोरच्या दुसऱ्या कटांतहि फरारी आरोपींत त्याची गणना झाली. या कटांत अनेक प्रमुख कार्यकर्ते सांपडल्यानें शेखर आतां खरोखरीच एकटा राहिला.

ज्या पराजयांनीं व अपयशानें शूरांतील शूरांचाहि धीर खचला असता त्या अत्यंत निराशाजनक परिस्थितींतहि शेखरची वृत्ति अविचल राहिली. त्याचा पूर्वीचा बेडरपणा तसाच कायम होता. काम चालू असतां मिळालेल्या फावल्या वेळांत तो कसलाहि अभ्यास करी; त्याचें इंग्रजीचें ज्ञान कमी असल्यानें तो इतरांकडून त्या भाषेंतील विचार समजून घेई. परिस्थितीला आपल्या अपेक्षेप्रमाणें अखेरीस वळण आलें नाहीं हें तो समजून चुकला होता. मूठभर त्यागी व साहसी तरुण आपल्या कृतीनें एकंदर राष्ट्रीय चळवळीला क्रांतिकारक वळण लावूं शकतील या आपल्या समजुतींत कांहीं तरी उणेपणा आहे खास असें त्यास वाटूं लागलें होतें. शक्य तितक्या तरुणांनीं जनतेंत मिसळून समाजवादी सामुदायिक चळवळीसाठीं शेतकरी कामकरी वर्गाची संघटना करावी व त्या चळवळीला जरूर तेव्हां सशस्त्र प्रतिकाराचें शिक्षण देण्याचें, तसेंच भावी क्रांतिकारक उठावासाठीं सैनिक तयार करण्याचें काम आपण करावें असें त्यास वाटूं लागलें. आणि सरदाराचें यावर काय मत आहे तें जाणून घेण्यास तो अगदीं उत्सुक झाला होता.

या त्याच्या विचारांमुळें आतंकवादी कार्यावरचा त्याचा विश्वास उडाला आहे असें त्याच्या कांहीं सहकाऱ्यांस वाटूं लागलें. ही गोष्ट कर्णोपकर्णीं होत होत अखेरीस जनतेंतहि पसरली. याच वेळीं राजधानींत गांधी–अर्विन वाटाघाटी चालू होत्या, तेव्हां त्यानें महात्माजींस असा गुप्त संदेश पाठविला कीं, " जर तुम्हीं भगतसिंग आदि माझ्या सहकाऱ्यांची मुक्तता केलीत तर

मी व ते पुढील आयुष्यभर तुमचें अनुयायित्व पत्करूं. परंतु ही गोष्ट घडून न आल्यास अभूतपूर्व असें भीषण आतंकवादी युद्ध आम्ही करूं!'' आणि दुर्दैवानें गांधीजींना त्यांत यश आलें नाहीं.

आणि फितुरीचा शापहि भारताला नवीन नाहीं. जयचंद, गणोजी शिर्के आदींची परंपरा चालविण्यास आतां वीरभद्र तिवारी सिद्ध झाला होता. एके काळचा तो शेखरचा स्नेही! परंतु द्रव्यलोभानें शेखरला पकडून देण्यास तो सिद्ध झाला. 'वैऱ्याची रात्र आहे; राजा, जागा रहा!'' असें त्याच्या कानांत कोणी तरी गुणगुणलें. वीरभद्रापासून आपणांस धोका आहे हें जाणून तो आतां कानपूरहून अलाहाबादला अज्ञातवासांत दिवस काढूं लागला. काकोरी कटापासून त्याला पकडून देण्यासाठीं लावलेलें बक्षीस आतां वाढत वाढत ५ हजार रु. पर्यंत गेलें होतें. त्याचे फोटो मोठमोठ्या स्टेशनांवर लागले होते. या वेळपर्यंत सरकारी गुप्तचरांचे हात त्याच्यापर्यंत पोहोंचण्यास सुरुवात झाली.

२७ फेब्रुवारी १९३१ ची ती घटना. या दिवशीं शेखरनें अलाहाबाद मध्येंच 'ऑल्फ्रेड पार्क' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जंगलवजा जागीं ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं सशस्त्र झुंज देऊन आत्मसमर्पण केलें!

......या दिवशीं तो सकाळीं दहा वाजतां ऑल्फ्रेड उद्यानांत एका सहकाऱ्यासह गप्पा मारीत होता; इतक्यांत शहराकडे जाणाऱ्या सडकेवर त्यानें वीरभद्र तिवारीस पाहिलें. परंतु तिवारीनेंहि आपल्यास पाहिलें आहे ही गोष्ट त्याच्या ध्यानांत आली नाहीं, व तो आपल्या सहकाऱ्याशीं परत गप्पा मारूं लागला.

थोड्याच वेळानें तेथें पोलीस गुप्तहेर खात्याचे डेप्युटी सुपरिंटेण्डेंट ठाकूर विश्वेश्वरसिंह व आझादला ओळखणारे कायदा सल्लागार श्री. डालचंद तेथें आले. तिवारीनें सूर्याजी पिसाळाची भूमिका चोख पार पाडली होती! ठाकूर विश्वेश्वरसिंह त्यावर पाळत ठेवूं लागले, व श्री. डालचंद ही बातमी गुप्तहेर खात्याचे प्रमुख श्री. नाट बावर यांस देण्यास गेले. थोड्याच वेळांत मोठ्या सशस्त्र तुकडीनिशीं ते तेथे दाखल झाले. त्यांची गाडी शेखर-पासून १० फुटांवर येऊन थांबली.

" आप कौन हो ? हाथ ऊँचा करो." असें त्यांनीं आझादला फर्मावलें. परंतु त्याला साध्या शब्दांत उत्तर नाहीं मिळालें. शेखर आतां सावध झाला होता. पुढील भवितव्य त्यास आतां दिसूं लागलें. ब्रिटिशांच्या हातीं सांपडून हालहाल होऊन अखेरीस फांशीं—किंवा आतांच सशस्त्र युद्ध करून आत्म-समर्पण यांपैकीं कांहीं तरी पत्करल्याशिवाय आतां गत्यंतर नव्हतें. आणि तो आजपर्यंतच्या आपल्या कीर्तीला साजेसाच वागला !

डोळ्याचें पातें लवतें ना लवतें इतक्यांत त्याच्या पिस्तुलांतून गोळ्या सुटूं लागल्या ! ' तुम कौन हो ' त्याचें उत्तर नाट बाबरास मिळालें. तथापि त्याची शक्ति शेखरपेक्षां कितीतरी पटींनीं जास्त होती. १९२५ पासून त्यानें सरकारच्या गुप्तचर खात्याची सर्व जगांत छीथू केली होती. आणि म्हणून त्याच्या साऱ्या शक्ति आतां इरेला पडल्या होत्या. सूं...सूं.. करीत एक गोळी त्याच्या पायांत घुसली. तें पाशवी सामर्थ्याचें नादान व भेकड प्रदर्शन होतें....त्याच्या पायानें आजवर बहुमोलाची कामगिरी बजाविली होती. वाऱ्यासारखा या प्रांतांतून त्या प्रांतांत तो पोलिसांना आजवर हुल-कावण्या देत आला. त्यांतील एक पाय आतां गारद झाला होता. परत सूं...सूं करीत आणखी एक गोळी त्याच्या शरीरांत घुसली...तरीहि तो शांत होता ! नाट बाबरची एक गोळी त्याच्या जांघेंत घुसली; ताबडतोब आझादनें त्याच्या हातांवर गोळी झाडली...पिस्तुल हातातून गळून पडलें व नाट बाबर ताबडतोब एका मोठ्या वृक्षाआड लपला. तितक्यांत ठाकूर साहेबानें ५० ते ६० फुटांवरून झाडींतून गोळीबार करण्यास सुरुवात केली. आझादनें त्यांवर बरोबर नेम धरून गोळी झाडली. त्यानें त्याचें थोबाडच फुटलें...आतां अनेक पोलिसांनीं एकदम चौफेर गोळीबार सुरू केला. शेखर आतां मात्र हतप्रभ झाला....अनेक गोळ्या त्याच्या अंगांत घुसल्या व तो जमिनीवर कोसळून खालीं पडला ! तरीहि त्याच्या जवळ जाण्याची कोणा-चीहि हिंमत होईना. म्हणून शेवटीं त्या मृत देहावरहि गोळी झाडण्यांत येऊन खात्री पटल्यावर त्या मुर्दाड शिपायांनीं त्याचें शव ताब्यांत घेतलें !

" मी ब्रिटिशांच्या हातीं जिवंत सांपडणार नाहीं !" ही त्याची प्रतिज्ञा होती व ती त्यानें सिद्धीस नेली.

चंद्रशेखर आतां ' आझाद ' झाला होता. हिं. सो. रि. आर्मीचा सरसेनापति युद्धाच्या सातव्या वर्षीं कामास आला. स्वच्छंदानें स्वातंत्र्याच्या कविता गुणगुणणारा आणि त्या प्रत्यानांत मृत्यूला वरणाऱ्यांच्या गौरवाचीं गीतें गाणारा शेखरहि अखेर शेवटीं समरांगणीं देह ठेवून निघून गेला.

प्रतिकार ! प्रतिकार ! प्रतिकार ! ! !
—हेंच त्याच्या जीवनाचें सार......
—हेंच त्याचें जीवन-तत्त्वज्ञान,
सरसेनापति चंद्रशेखर आझाद झिंदाबाद !
इन्किलाब झिंदाबाद ! !

♠

## : १७ : सरदारास फांशीची शिक्षा

फिर्यादी पक्षानें २६ ऑगस्ट रोजीं आपल्या बाजूचा पुरावा संपविला. या वेळपर्यंत ४५७ जणांच्या साक्षी सरकारनें नोंदविल्या होत्या. बचावाची बाजू सुरू होण्यापूर्वी क्रिमिनल प्रोसीजर कोडच्या ३४२ व्या कलमानुसार आरोपींची उलट तपासणी होणार होती. तथापि राजबंद्यांनीं आतां न्याया-लयाच्या कामकाजावरच बहिष्कार घातल्यानें २७ ऑगस्टला बचावाची बाजू मांडण्याचा न्यायालयानें हुकूम दिला.

परंतु अभियोग्यांच्या अनुपस्थितींत बचावाचें काम करणें अत्यंत बिकट होतें. तेव्हां न्यायाधिशांनीं १ सप्टेंबर रोजीं आरोपींतर्फेंचा बचावाचा पुरावा संपल्याचें जाहीर केलें. कांहीं आरोपींनीं ( विजयकुमार व अजयकुमार घोष ) वकील दिले होते. परंतु तयारीसाठीं कोर्टानें एक आठवड्याची मुदत देण्याचें नाकारल्यानें त्यांचे वकील श्री. अमोलिक राम कपूर यांनीं आपलें अंग काढून घेतलें.

ता. १ सप्टेंबर रोजीं सरकारपक्षातर्फे पब्लिक प्रॉसिक्यूटरनीं आपलें भाषण सुरू केलें तें १० सप्टेंबरला संपलें, व ७ ऑक्टोबर १९३० ला खटल्याचा

निकाल जाहीर करण्यांत आला. सरकारी अधिकाऱ्यांचे खून करणें; राजकीय दरोडे घालणें, बॉम्ब व पिस्तुलें तयार करणें, अत्याचाराकडे तरुणांचीं मनें वळविणें, बंदिस्त राजबंद्यांस सोडविण्याचे प्रयत्न करणें, राजद्रोह करणें यांसारखे एकापेक्षां एक गंभीर आरोप त्यांवर शाबीत झाल्याचें न्यायालयानें जाहीर केलें. हें निकालपत्र ४०० पानांचें असून त्याची किंमत प्रतीमागें २२५ रु. आहे. या कटांतील आरोपींस पुढील-प्रमाणें शिक्षा जाहीर करण्यांत आल्याः—

( १ ) सरदार भगतसिंग, ( २ ) शिवराम राजगुरु, व ( ३ ) सुखदेव यांस फांशीची शिक्षा.

( ४ ) किशोरीलाल, ( ५ ) महावीरसिंह, ( ६ ) विजयकुमारसिंह, ( ७ ) शिववर्मा, ( ८ ) डॉ. गयाप्रसाद, ( ९ ) जयदेव, ( १० ) कमलनाथ त्रिवेदी या आरोपींस आजन्म काळेंपाणी.

(११) कुंदनलाल–७ वर्षें सक्तमजुरी.

(१२) प्रेमदत्त ५ वर्षें सक्तमजुरी.

(१३) अजयकुमार घोष, (१४) जितेंद्रनाथ सन्यल, (१५) देशराज हे आरोपी निर्दोष सुटले.

कडेकोट पोलीस बंदोबस्तांत न्यायाधिशांनीं जाहीर केलेला हा निर्णय ऐकण्यासाठीं राजबंदींस उपस्थित राहण्याचा हुकूम झाला होता परंतु या प्रसंगींहि ते स्वाभिमानपूर्वक गैरहजरच राहिले. म्हणून एका खास दूताकडून तुरुंगांत आरोपींना शिक्षा कळविण्यांत आल्या.

### *शिक्षेविरुद्ध झालेली प्रतिक्रिया*

“ सरकार सूज्ञ असेल तर या थोर देशभक्तांच्या शिक्षा जरूर रद्द करील. ”

— **श्री. सुभाष**

सरदार व त्याच्या दोन सहकाऱ्यांस फांशीं व इतर अनेकांस दीर्घ मुदतीच्या शिक्षेची बातमी जाहीर होतांच साऱ्या देशभर संतापाची लाट उसळली. अशा स्थितींत त्यांच्या मुक्ततेची, निदान फांशीची शिक्षा तरी रद्द व्हावी म्हणून भारतांतील कानाकोपऱ्यांतून प्रयत्न सुरू झाले. देशांत अत्यंत

खळबळीचें वातावरण निर्माण झालें. लाहोर शहरांत सरकारनें ताबडतोब १४४ कलम जाहीर करून तंग वातावरणांत भर घातली. तरी कोठल्याहि प्रकारच्या जाहिरातींशिवाय वा प्रयत्नांशिवाय शहराबाहेरील नगरपालिका प्रवेशद्वाराजवळच एक प्रचंड सभा होऊन या एकतर्फी खटल्याचा धिक्कार करण्यांत आला. जबाबदार वृत्तपत्रांनीं मोठमोठे मथळे देऊन, राजबंदींचीं छायाचित्रें छापून हें वृत्त सर्वत्र पसरविलें.

दुसरे दिवशीं लाहोरच्या जनतेचा, विशेषतः विद्यार्थ्यांचा उत्साह पराकोटीस गेला. हिंदुस्थानांतील इतर शहरांतहि तीच परिस्थिति होती. लाहोर विद्यार्थी संघानें या बाबतींत पुढाकार घेऊन सर्व शाळा-कॉलेजांचा हरताळ पाडला. बहुतेक सर्व शिक्षणसंस्था बंद झाल्या, व उघड्या ठेवण्यांत आलेल्या संस्थांवर विद्यार्थ्यांनीं निरोधन केलें. या गडबडींत १७ स्त्रियांस पकडण्यांत आलें. त्यांत माताजी या नांवाच्या ९० वर्षांहून अधिक वयाच्या बाई होत्या. डी. ए व्ही. कॉलेजमध्येंहि गडबड होऊन पोलिसांना तेथें लाठीहल्ला करावा लागला. ८० विद्यार्थी आणि एका प्राध्यापकास अटक झाली. गव्हर्मेन्ट कॉलेजसमोर जमलेल्या लोकांवरहि लाठीहल्ला झाला. नंतर ब्रॅडलॉ हॉल येथें सर्व विद्यार्थीवर्गाची सभा झाली. या सभेंत सरदार व त्याच्या सहकाऱ्यांच्या असीम त्यागाबद्दल अभिनंदनाचा ठराव सम्मत झाला. लाहोरांतहि संध्याकाळीं जनतेनें एक मिरवणूक काढली. 'सरदार भगतसिंग झिंदाबाद !', 'राजगुरु झिंदाबाद !', 'सुखदेव झिंदाबाद !', 'इन्किलाब झिंदाबाद !' अशा तऱ्हेच्या चित्तथरारक घोषणांत ही मिरवणूक विसर्जित झाली. लाहोर कॉंग्रेस या वतीनेंहि शहराबाहेरील मोरीगेटजवळ एक प्रचंड सभा झाली. या सभेस १५ हजार लोक होते. लाला लजपतराय यांच्या कन्यका श्रीमती पार्वतीदेवी अध्यक्षस्थानीं होत्या.

पंजाबांतील, तसेंच हिंदुस्थानांतील सर्व लहानमोठ्या शहरांत हरताळ पाळण्यांत आला. अमृतसर, दिल्ली, मुंबई, कानपूर, अलाहाबाद, बनारस, कलकत्ता व इतर अनेक ठिकाणीं अशाच निषेधसभा होऊन, सरदार व त्याच्या सहकाऱ्यांविषयीं अखिल देशास वाटत असलेला आदर स्पष्ट झाला.

आतां भगतसिंग संरक्षक समिति, देशांतील इतर पुढारी व सरदाराचे

वडील स. किसनसिंह यांनीं प्रीव्ही कौन्सिलकडे अर्ज करण्याचें ठरविलें. आश्चर्य असें कीं असें करण्यास सरदारानेंहि अनुमती दिली इतकेंच नव्हे तर तसें घडवून आणण्याचें त्यानें ठरविलें होतें. तथापि यामुळें आपल्यासंबंधीं गैरसमज होऊं नये म्हणून त्यानें नोव्हेंबर १९३० च्या फ्रीप्रेसच्या अंकांत आपल्या एका मित्रास एक पत्र पाठविलें होतें. या पत्राप्रमाणें आपल्यास क्षमा होऊन आपली मुक्तता होणार नाहीं हें माहीत असूनहि केवळ देश-जागृतीच्या दृष्टीनेंच आपल्या विनशर्त मुक्ततेची चळवळ सर्वत्र सुरू व्हावी अशी त्याची इच्छा असल्याचें दिसतें. आपली शिक्षा कमी व्हावी अशी मात्र त्याची इच्छा नव्हती. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट यामुळें साध्य होणार होती. ती म्हणजे खटल्याचा परदेशांत प्रचार. व्हाईसरॉयसाहेबांनीं खटल्या-साठीं काढलेल्या वटहुकुमाच्या समर्थनार्थ वाटेल त्या गोष्टी सांगितल्या होत्या त्या खोडसाळ प्रचाराचें या अर्जामुळें बेंड फुटणार होतें. खटल्यांतील सर्व महत्त्वाच्या घटना, राजबंदींचें उपोषण, यतिंद्राचें बलिदान, राजबंदींस तुरुंगांत मिळणारी अमानुष वागणूक – या सर्व गोष्टी सुसंस्कृत जगाच्या निद-र्शनास येणार होत्या. तसेंच इंग्लंडच्या शत्रूसहि भारतांत सशस्त्र क्रांतिवादी तरुण वर्ग आहे याची जाणीव होणार होती.

हें अपील लंडनमध्यें प्रिव्हि कौन्सिलपुढें प्रीट यांनीं सादर केलें. परंतु तें ११ फेब्रुवारीला नामंजूर झालें.

प्रीव्ही कौन्सिलनें अपील रद्द केल्याची बातमी प्रसिद्ध होतांच सर्व सुबुद्ध जगास दुसरा धक्का बसला. आतां आरोपींच्या शिक्षा कमी करण्याच्या चळ-वळींचा प्रतिध्वनि इंग्लंडमध्येंहि उठूं लागला. भारताच्या हितचिंतक अशा पार्लमेंटच्या कांहीं सदस्यांनीं एक सभा भरवून या शिक्षा कमी करण्याचा ठराव केला. भारतमंत्रि श्री. बेन यांच्याकडे मि. मॅक्स्टन यांच्या नेतृत्वाखालीं एक शिष्टमंडळहि पाठविण्यांत आलें. हिंदुस्थान व इग्लंड यांच्यांत स्नेहसंबंध व शांततेचें वातावरण निर्माण करण्यासाठीं या आरोपींची फांशी रद्द होणें अत्या-वश्यक असल्याचा युक्तिवाद त्यांनीं मांडला. तेव्हां त्यांनीं व्हाइसरॉयकडे बोट दाखविलें. इकडे आरोपींचे वकील लाला अमोलिकराम कपूर यांनीं " या खटल्यासाठीं वटहुकूम काढण्यांत आला आहे. त्याची मुदत संपल्यानें त्यानें

नेमलेल्या स्पेशल ट्रिब्यूनलचें अस्तित्वच नष्ट झालें असल्यानें कोणत्याहि कोर्टाला भगतसिंगास फांशीं देण्याचा, फांशीची स्पे. ट्री. नें ठरविलेली तारीख केव्हांच निघून गेल्यानें पुन्हा फांशीची नवीन तारीख व जागा ठरविण्य चा हुकूम देतां येत नाहीं. अद्याप फांशीसाठीं त्यांस तुरुंगांत ठेवणेंच अनुचित आहे. तरी या आरोपींस एक तर मुक्त करावें, अगर नेहमींच्या कोर्टापुढें त्यांस ज्यूरी अगर असेसर देऊन त्यांची योग्य ती चौकशी तरी करावी; व या अर्जाचा निकाल लागेपर्यंत फांशीची अंमलबजावणी तहकूब करावी." असा एक अर्ज लाहोर हायकोर्टाचे एक न्यायमूर्ती श्री. भिडे यांजपुढें केला.

सरकारतर्फे श्री. नॉड व आरोपींचे वतीनें श्री. कपूर यांचेशिवाय लाला शामलाल व श्री. भगतराम पुरी हे काम चालवीत होते. ' जो सेशनजज्ज फांशीचें वॉरंट काढतो त्याचेकडेच तें फांशीच्या अंमलबजावणीनंतर परत जावें लागतें. तसेंच आतां अस्तित्वांत नसलेल्या स्पे. ट्रि. नें यासंबंधीं दुसऱ्या कोणत्याहि कोर्टास अंमलबजावणीचें अखत्यारपत्र दिलें नव्हतें. ' इत्यादि गोष्टी त्यांनीं न्यायमूर्तींच्या निदर्शनास आणल्या. तथापि या कशाचाहि उपयोग न होतां न्या. भिडे यांनीं हा अर्ज फेटाळून लावला. तथापि या सर्व प्रकरणाच्या कायदेशीरपणाबद्दल शंका व्यक्त करून सरकारनें या आरोपींस ४०२ कलमानुसार फांशीऐवजीं काळेपाण्याची शिक्षा द्यावी असें मात्र नमूद केलें !

हें प्रकरण चालू असतां १९ फेब्रुवारी रोजीं महात्मा गांधी व लॉर्ड आर्विन यांच्यांत राजकीय वाटाघाटींस सुरुवात होऊन ४ मार्च १९३१ ला उभय पक्षांत समेट घडून आला. कॉंग्रेसमध्यें या कराराबद्दल सर्वत्र असमाधानच व्यक्त करण्यांत येत होतें; व त्यामुळें कॉंग्रेसकडून त्यास सहजासहजीं मान्यताहि मिळण्यासारखी नव्हती. हा करार धुडकाविण्यांत येईल, निदान बहुसंख्य प्रतिनिधींकडून त्याला निकराचा विरोध तरी करण्यांत येईल अशी त्या वेळीं जहाल पुढाऱ्यांस आशा होती. या खटल्यांत निर्दोषी सुटलेला अजयकुमार घोष कॉंग्रेसच्या कराची अधिवेशनास जात असतां त्याची व सुभाषचंद्रांची भेट झाली. तेथें झालेल्या जहालांच्या सभेंत

श्री. सुभाषचंद्रांनीं " रक्तानें वाहिलेल्या पाटांमुळें आणि प्रेतांच्या पडलेल्या ढिगामुळें ब्रिटिश सरकारची व आमची कायमची फारकत झाली आहे." असे उद्गार काढले होते. महात्माजींनीं वाटाघाटी चालू असतां इतर राजबंदींबरोबर या आरोपींची फांशी कमी करण्याची खटपट केली. तथापि त्यांनीं पंजाब सरकारला सांगून बघतों अशी पळवाट काढली.

अशा रीतीनें जनतेचे, पुढाऱ्यांचे, भगतसिंग संरक्षक समितीचे, त्यांच्या वडिलांचे, महात्माजींचे, व इंग्लंडमधील त्यांच्या चहात्यांचे-या आरोपींची फांशी रद्द करण्याचे सर्व प्रयत्न फुकट जाऊन आतां सरदार फांशीं जाणार या दुःखद विचारानें सारी जनता शोकसागरांत बुडून गेली; तर तिकडे तुरुंगांत सरदाराला मात्र आपली एक मनीषा पूर्ण होण्याची सुवर्णसंधि आल्याचा हर्ष झाला !

इतरांनीं केलेला दयेचा अर्ज नामंजूर करूनच पंजाब सरकारचें समाधान झालें नाहीं; सरदाराचा व त्याच्या सहकाऱ्यांचा अपमान करण्यासाठीं त्यांनीं या आरोपींस " तुम्ही दयेचा अर्ज करा " असें कळविलें. त्यास सरदारानें पुढीलप्रमाणें अतिशय बाणेदार उत्तर पाठविलें.

" आम्हांस सरकार म्हणतें कीं, तुम्हीच दयेचा अर्ज करा ! पण दयेचा अर्ज करायला आम्हीं काय चोर आहोंत, डाकू आहोंत-कीं मवाली ? आम्ही स्वातंत्र्ययुद्धांतील राजकीय कैदी आहोंत. आमच्या नसानसांत स्वातंत्र्याचें-पूर्ण स्वातंत्र्याचें रक्त खेळत आहे आम्हीं जी साहसांत उडी घेतली ती स्वातंत्र्यासाठींच. आम्ही अहिंसेचे उपासक नसूं, आमचा मार्ग अनत्याचाराचा नसेल, पण आम्ही राजकीय कैदी आहोंत हें तर खरें ना ? सरकारच्या अंगांत न्यायाचा तिळमात्र अंश असेल तर आम्हांस राजकीय कैदी या नात्यानेंच सरकारनें वागवलें पाहिजे. दया मागावयास आम्ही कोणी चोर, डाकू, मवाली नाहीं ! आम्ही दयेची भीक कधींही मागणार नाहीं.

"कसें तरी करा व आमची फांशी चुकवा असें म्हणून काळ्या पाण्यावर जाण्याची इच्छा आम्ही धरीत नाहीं. फांसाच्या घडवंचीवर चढणेंहि आम्हांस पसंत नाहीं ! आम्ही मर्द आहोंत. म्हणून आम्हांस मर्दांप्रमाणें

गोळ्या घालून अगर तोफेच्या तोंडीं देऊन मारा ! फांशीसारखी फुसकी शिक्षा कोण मागतो ? आणि म्हणून आमच्या या शेवटच्या इच्छेस सरकारनें मान द्यावा अशी आमची विनंती आहे ! ”

सरदाराच्या नाट्यपूर्ण जीवनाच्या शोकांतिकेचा अखेरचा प्रवेश आतां सुरू होत आहे. भारतांतील राजकीय वातावरणांत निराशेचे, दुःखाचे घनदाट कृष्णमेघ पसरले होते सर्वत्र स्मशानशांतता पसरली होती. पुढाल दुःखद घटनेची ती अशुभ नांदीच होती.

दि. २३ मार्च ! सरदाराचे तुरुंगांतील सर्व व्यवहार नेहमींप्रमाणें सुरू झाले...सकाळ गेली. दुपार गेली...आणि आतां सूर्य अस्तास जाऊं लागला होता . आज तुरुंगाबाहेर अधिक कडक बंदोबस्त होता...सर्व बंदींस रोजच्यापेक्षां अगोदरच कोठडींत नेण्यांत आलें...इन्स्पेक्टर जनरल-साहेबांची स्वारी हजर झाली...आतां संध्याकाळचे ७ वाजले...आणि...

...आणि तो पहा. तुरुंगाचा मागचा दरवाजा उघडण्यांत येत आहे .. मॅजिस्ट्रेटसाहेब, इन्स्पेक्टर-जनरल आदि सरदाराच्या कोठडीकडे...त्या पवित्र, पुनीत झालेल्या जागेकडे वळत आहेत ...सरदार कसलें तरी गाणें म्हणण्यांत रंगला आहे...

मेरा रंग दे बसंति चोला ।
इसी रंग में रंग के शिवा ने ।
माँ का बंधन खोला !

...तें एक स्वातंत्र्यगीत होतें. आणि सरदारहि तें आळवून आळवून म्हणत होता. त्यास वधस्तंभाकडे नेण्याचा हुकूम झाला...भारतमातेचा लाल तिच्यापासून दूर...दूर स्वर्गारोहणास निघाला होता...आणि तेवढ्यांत राज-बंदींस ही गोष्ट समजली... “ इन्किलाब झिंदाबाद ! ” अशा गगनभेदी गर्जनांनीं त्यांनीं सरदारास प्रेमभरानें निरोप दिला...सरदारानेंहि “इन्किलाब झिंदाबाद ! ” असा प्रतिसाद देऊन त्यांचा निरोप घेतला.

...सरदार आतां वधस्तंभाकडे येऊन पोहोंचला. स्वर्गनगरीचें तें शेवटचें स्टेशन होतें ! ...त्यानें बाजूच्या लोकांकडे पाहून स्मितहास्य केलें. नंतर तो मॅजिस्ट्रेटसाहेबांस म्हणतो, Well Mr Magistrate, you are fortun-

nate to be able to see today how indian revolutioaries can embrace death with pleasure for the sake of their supreme ideal " इतक्यांत सुखदेव, राजगुरुही तेथें येऊन पोहोंचले. त्या तिघांनींहि फांशीच्या तक्तावर उत्सुकतेनें उड्या मारल्या... !

......आणि आतां त्यांच्यांतच कलह सुरू झाला ! प्रेमकलह ! अगोदर फांशीं कुणीं जावें !!! " थांब सरदारा, मी अगोदर जाणार. " राजगुरु म्हणाला " नको प्रिय शिवरामा; मींच अगोदर जातों. " सरदार उत्तरला. आणि अखेर हा प्रियकलह मिटला. प्रथम सुखदेव, नंतर सरदार, व शेवटीं राजगुरू असा निर्णय त्यांनीं घेतला......

......तिघांच्याहि गळ्यांत फांसाची तांत आवळली जाऊं लागली;

......सर्पांनो उद्दाम आंवळा कसोनिया पाश ।

तुझ्या यशाचे पवाडे गातां गळ्यांत येतात...... चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार !

देतां जीवनअर्घ्य तुला ठरलों वेडेपीर ॥......तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार । कधींही तारांचा संभार ।

......गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ॥

त्यांनीं परस्परांस दृढालिंगनें दिलीं !

" आतां आपण क्षणार्धांत तिघेहि आपल्या पक्षाच्या मध्यवर्ती समितीची बैठक भरविण्यास स्वर्गांत जाऊं. तेथें आपल्यास शेखर, यतिंद्र, भगवती-सारे जण भेटतील. " सुखदेव म्हणतो.

......श्वासांनों जा वायूसंगें ओलांडुनि भिंत ।

अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत ॥

सांगा वेडीं मुलें तुझीं हीं या तक्तावरती ।

......आनंदें करिती तुज हा अखेरचा प्रणिपात ॥

फांशीं देण्याची घटका..... क्षण भरत आला. ७॥ वाजले, आणि फांशीच्या तक्ताखालच्या फळ्या क्षणार्धांत सरकल्या,—व केवळ तीन सेकंदांतच ते वीर हा जड देह सोडून गेले.. ...!!! वासांसि जीर्णानि यथा विहाय, या गीतोक्तीप्रमाणें आपले जुने देह टाकून नवे देह धारण करण्यासाठीं ते तिघेहि

निजधामास गेले! आणि एखाद्या शर्विलकाप्रमाणें पुनः त्याच मागच्या दारानें त्या हुतात्म्यांस दहनासाठीं तुरुंगाबाहेर नेण्यांत आलें......

......सरदार अनंतांत विलीन झाला!

सरदार हुतात्मा झाला!!

सरदार शहीद झाला!!!

राजकारणाच्या नभोमंडलावर तुटलेल्या ताऱ्याप्रमाणें अत्यंत तेजानें सरदार अल्पकाल चमकून गेला......साक्षात् मृत्यूलाहि कांपरें भरविणारा साम्राज्यशाहीचा विध्वंस करून तिच्या दग्ध अवशेषांवर स्वतंत्र जनतेची सत्ता आपल्या या महान् देशांत निर्माण करण्यासाठीं प्रतिज्ञाबद्ध झालेला सरदार, इहलोक सोडण्यापूर्वीं आपल्या कोट्यवधि देशबांधवांच्या नेत्रांतील ज्योत, नव्या हिंदुस्थानच्या आकांक्षांचें एक प्रतीक व स्फूर्तिस्थान झालेला सरदार आतां......अमर शहीद सरदार झाला...... !

......सरदार-भगतसिंग झिंदाबाद!!!

♠

## : १८ : भारतमातेचे अश्रु

इकडे सरदारास फांशीं देण्यांत येत होतें आणि त्याच वेळीं त्याचे वडील सरदार किसनसिंह लाहोरांतच तरुणांच्या एका जाहीर सभेंत या खटल्या-संबंधींचें करुणरसानें ओथंबलेलें भाषण करीत होते......त्यांचीच काय, साऱ्या भारतीयांची तशीच करुण अवस्था झाली होती; आणि या वीरांच्या देहांताची त्यांस काडीमात्रहि कल्पना नव्हती.

आणि दुसरे दिवशीं सकाळीं दि २४ मार्चला सर्व देशभर खळबळ माजली! सरकारनें या दिवशीं सकाळीं एक पत्रक काढून ही बातमी प्रसिद्ध केली. वृत्तपत्रांनीं त्यास किती प्रसिद्धि दिली असेल तें सांगण्याची आवश्यकता नाहीं. वीर यतींद्राचें शव सरकारनें जनतेच्या स्वाधीन केल्या-नंतर त्याचें जें अभूतपूर्व स्वागत व प्रचंड शवयात्रा निघाली होती ती पाहून

सरकार आतां शहाणें, तसेंच सावधहि झालें होतें. म्हणून पंजाब सरकारनें जेल मॅन्युअलचे नियम व डॉ. गोपीचंद भार्गव यांसारख्या पुढाऱ्यांची विनंती झिडकारून शांतताभंगाच्या नेहमींच्या सबबीखालीं त्या हुतात्म्यांचे पार्थिव देहसुद्धां त्यांच्या नातलगांच्या स्वाधीन न करतां स्वतःच त्यांचा दहनविधि कसाबसा उरकला विलक्षण योगायोग असा कीं, ज्या लाला लजपतरायांच्या निधनामुळें भारतीय स्वातंत्र्य लढ्यांत हें महान् भगतसिंग पर्व निर्माण झालें व जगभर गाजलें, त्या लालाजींच्या निधनस्थानींच फिरोजपूरच्या सतलज नदीच्या किनारीं, बेडरपणें हंसत हंसत स्वर्लोकांत गेलेल्या या वीरांचा लष्करी पहाऱ्यांत अंत्यविधि करण्यांत आला. त्यांच्या अस्थीहि नातलगांस न देतां सतलज नदींतच बुडविण्यांत आल्या. या दिवशीं लाहोरांत अभूतपूर्व हरताळ पुकारण्यांत आला. मुंबई, पुणें, मद्रास आदि शहरांतहि हरताळ संपूर्णपणें यशस्वी झाला कानपुरांत हरताळ पाडण्याच्या प्रयत्नांतच हिंदु-मुस्लीम दंगा उद्भवला. त्या वेळीं कॉंग्रेसच्या स्वयंसेवकांनीं उघडीं राहिलेलीं मुसलमानांचीं दुकानें बंद करण्याचा प्रयत्न केला, व दंगा पेटला;— आणि हा दंगा शमविण्याच्या प्रयत्नांतच गणेश शंकर विद्यार्थी यांचा अमानुष खून झाला !

या वेळीं कॉंग्रेसचें अधिवेशन कराचीस भरलें होतें. फांशीची वार्ता तेथें जातांच अध्यक्षांची टोलेजंग मिरवणूक काढण्याचा कार्यक्रम रद्द झाला. अधिवेशनावर दुःखद छाया पसरली. पंडित जवाहरलाल नेहरूंनीं सरदारावर ठराव मांडला, व पं. मदन मोहन मालवीय यांनीं आपल्या हृदयस्पर्शी भाषेंत त्यास अनुमोदन दिलें. तो ठराव असा.—

" कोणत्याहि राजकीय स्वरूपाच्या अत्याचारांपासून राष्ट्रीय सभा अलिप्त असली तरी तिला सरदार भगतसिंग, त्याचे सहकारी राजगुरु, व सुखदेव यांचें शौर्य व स्वार्थत्याग याविषयीं कौतुक वाटत असून त्यांच्या वधामुळें त्यांच्या कौटुंबिकांप्रमाणेंच दुःख होत आहे. या तिघांना फांशीं देण्यांत आलें हा केवळ सूड होय, व त्यांची शिक्षा कमी करण्याची राष्ट्रानें एकमुखानें केलेली मागणी धुडकावून लावून सरकारनें त्याजबरोबर राष्ट्राचाहि उपमर्द केला आहे, असें या सभेचें मत आहे. या वेळीं या दोन

राष्ट्रांत भलेपणा उत्पन्न होणें, व जे लोक निराशेनें राजकीय अत्याचाराच्या मार्गास लागले आहेत त्यांना शांततेच्या मार्गावर आणण्यासाठीं त्यांचें मन वळविणें अत्यंत जरूर होतें. ही सोन्याची संधि सरकारनें वाया दवडली असेंहि या सभेचें मत आहे. ''

काँग्रेसच्या नव्या कार्यकारी समितीनेंही यावर एक ठराव सम्मत केला. तसेंच हुतात्म्यांच्या दहनविधीसंबंधीं सरकारनें जी अमानुषता दाखविली त्यासंबंधींहि एक ठराव सम्मत झाला. तो असा:--

" सरदार भगतसिंग, राजगुरु, व सुखदेव यांच्या मृत शरीरांचा अनेक प्रकारें अपमान केला गेला, व त्यांचे अंत्यविधि ज्या योग्य धार्मिक आचारांनीं व्हावयास पाहिजे होते त्याप्रमाणें ते झाले नाहींत. तसेंच त्यांचीं शरीरें मरणानंतर छिन्नविछिन्न केलीं गेलीं असें वर्तमानपत्रांतून स्पष्टपणें जाहीर केलें गेलें असल्यानें जनतेचीं मनें अत्यंत प्रक्षुब्ध झालीं आहेत. या साठीं या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं व योग्य तो साक्षीपुरावा घेऊन अहवाल तयार करण्यासाठीं पंडित संतानम्, मौलाना कासुरी, मलिक बरकत अल्ली, जीवनलाल कपूर, रायजादा हंसराज, व डॉ. सत्यपाल यांची एक समिति नेमण्यांत येत आहे. ''

या समितीनें पंजाब सरकारला चौकशींत सहकार्य देण्यास सुचविलें. परंतु " या बाबतींत जो कांहीं खुलासा करावयाचा होता तो आम्हीं केला आहे; सबब या कामांत भाग घेण्याची आम्हांस जरूरी भासत नाहीं.'' असें उत्तर देऊन सरकारनें या समितीच्या कामकाजावर बहिष्कार घातला.

अशा रीतीनें ब्रिटिश सरकारनें आपल्या साम्राज्यास उखडून टाकण्यास निघालेल्या भारतांतील सशस्त्र क्रांतिवादी गटास गारद करण्यासाठीं; तसेंच भावी काळांत या मार्गाकडे कुणी वळूं नये, तरुणवर्गास सरकारी दमन-चक्राची दहशत बसावी म्हणून या महान् पर्वाच्या अगदीं प्रारंभापासून अखेरीपर्यंत अत्यंत अमानुष व अन्याय्य वर्तन केलें. तरीहि क्रांतिवादी विचारसरणी मेली नाहीं, तर ती मारण्यास उद्युक्त झालेल्या ब्रिटिश सर-कारच्या छाताडावर आझाद हिंद फौजेच्या रूपानें अवतरली! आणि अखेरीस त्या साम्राज्यशाहीचें निर्दालन झालें !!

या वेळीं कॉंग्रेसमधील बहुतेक सर्व पुढारी अहिंसक मार्गानें देशास स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या प्रयत्नांत होते. क्रांतीवर, हिंसात्मक मार्गावर त्यांचा विश्वास नव्हता तरीहि त्यांनीं कोठल्याहि परिणामांचा विचार न करतां सरदाराचा जाहीरपणें गौरव केला.

महात्माजी म्हणाले, " वीर भगतसिंगास जगण्याची इच्छा नव्हती. त्यानें माफी मागण्याचें व दयेचा अर्ज करण्याचें नाकारलें. इतरांसाठीं जगण्यास तो कदाचित् तयार झाला असता, किंवा आपल्या मृत्यूनें आवेश चढून कोणीं विनाकारण खून करूं नये या हेतूनें तो जगला असता. भगतसिंग अहिंसेचा उपासक नव्हता, परंतु हिंसा हा धर्म मानण्यास तो तयार नव्हता. मार्ग दिसेना म्हणून तो या मार्गानें गेला. या वीरानें मरणाचें भय जिंकलें होतें. त्याच्या वीरतेबद्दल त्यास सहस्रशः प्रणाम असोत ! या प्रसंगीं तरुणांना मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, भगतसिंग प्रभृतींनीं जो अतुल त्याग केला व असीम धैर्य दाखविलें त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. परंतु त्यांनीं अवलंबिलेला मार्ग अनुकरणीय म्हणून स्वीकारूं नका. आमचा समेट लक्षांत घेतां सरकारनेंहि आपल्या पाशवी शक्तीचें प्रदर्शन करावयास नको होतें. परंतु या कृत्यानें आपली अधिकारलालसा कायमच असल्याचें सरकारनें सिद्ध केलें आहे. राष्ट्रीय सभेनें मात्र आपल्या मार्गापासून च्युत होतां कामा नये. या हुतात्म्याचें देशभर स्मारक करावयाचें तें देशकार्याला वाहून घेण्याची प्रत्येकानें शपथ घेऊन करावें."

स्व. सरदार पटेल म्हणाले, " भगतसिंग आणि त्याचे सहकारी यांची देशभक्ति, धैर्य आणि स्वार्थत्याग हे सद्गुण कोणासहि आदरणीय आहेत. फांशीची शिक्षा बदलण्याची सार्वत्रिक मागणी असतांहि सरकारनें बेपर्वाईनें फांशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करून आपल्या निष्ठुरपणाचें पूर्वीं कधींहि झालें नव्हतें इतक्या स्पष्ट स्वरूपांत प्रदर्शन केलें आहे ! "

स्व. मदन मोहन मालवीय—" तरुणांना भगतसिंग आदर्शवत् वाटतो याचें कारण त्याच्या देशभक्तीला, त्याच्या शौर्याला तुलनाच नाहीं. भगतसिंगाची चौकशी व शिक्षा पाहिली म्हणजे देशासाठीं हातावर शिर घेऊन मृत्यूस कवटाळण्यास तरुण कसे सज्ज आहेत हें दिसून येतें."

नेताजी सुभाषचंद्र बोस यांस सरदाराविषयीं विशेष प्रेम होतें. ते म्हणाले, “ भगतसिंग म्हणजे भावी राज्यक्रांतीचा अरुणोदय होय. त्यानें पेटविलेली क्रांतीची ज्योत त्याच्या मृत्यूनें विझणार नाहीं. स्वातंत्र्यासाठीं असे किती तरी बळी द्यावे लागणार आहेत. भगतसिंगादिकांच्या फांशीमुळें सरकारचें हृदय पालटलें आहे असें कोणालाच वाटणार नाहीं.

आज अखिल भारतालाच नव्हे तर सर्व जगास ललामभूत झालेले, आणि ज्यांच्या जीवापाड श्रमांनीं भारतवर्ष प्रगतीचीं पावलें टाकीत आहे, जागतिक शांततेसाठीं आयसेनहॉवर, चर्चिल, मालेन्कोव्ह, चौ एन् लाय आदि पुढारी ज्यांच्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करीत आहेत—ते भारताचे आजचे पंतप्रधान त्या वेळीं असें म्हणाले—“ ···But there will also be pride in him who is no more. And when England speaks to us and talks of settlement there will be the coride of Sardar Bhagat Singh. Lest we forget!- Lest we forget!! ”

**स्व. शहीद सरदार भगतसिंग झिंदाबाद ! ! !**

# १९ उपसंहार

सरदार आपलें ऐतिहासिक कार्य करून अनंतांत विलीन झाला. तदनंतर स्वातंत्र्यासाठीं चाललेले प्रयत्न अखेरीस १५ ऑगस्ट १९४७ ला फलद्रूप झाले. हें स्वातंत्र्य कसें मिळालें? १८५७ पासून तों मुंबईतील नाविक बंडापर्यंत झालेल्या सर्व तऱ्हेच्या सशस्त्र-निःशस्त्र, हिंसक—अहिंसक चळवळींचा तो परिपाक होय. देशांतील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं-तरुणांनीं तें साध्य केलें आहे. देश स्वतंत्र व्हावा, देशांत समाजवादी सरकार यावें, येथें किसान—कामगारांचें राज्य व्हावें, ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत व्हावा—यासाठींच सरदारानें व त्यांच्या असंख्य ज्ञात—अज्ञात सहकाऱ्यांनीं व इतर क्रांतिकारकांनीं आत्मबलिदान केलें !

आणि आज आपण स्वातंत्र्याचें दर्शन घेत आहोंत. ही या साऱ्या हुतात्म्यांची पुण्याई आहे. १८५७ सालीं भारताचें स्वत्व जागृत करण्यासाठीं ज्यानें आत्मबलिदान केलें त्या मंगल पांडेपासून हुतात्म्यांचीं तेजस्वी आकाशगंगा भारतीय नभांगणांत पसरलेली सांपडेल. या साऱ्या क्रांतिवीरांनीं एकाकी लढत देऊन स्वातंत्र्याचा निदिध्यास प्रकट केला. आपले प्रयत्न निष्फल आहेत, ते सद्यःफलदायी नाहींत याची त्यांना जाणीव होती पण आत्मविस्मृतीच्या घोर निद्रेंत पडलेल्या राष्ट्राला जागृति आणण्यासाठीं स्फोटक प्रयत्नांचीच आवश्यकता आहे,—असा त्यांचा दृढ विश्वास होता. या सशस्त्र प्रयत्नांनींच राष्ट्राला वारंवार संजीवनी दिली. महात्माजींच्या सामुदायिक अहिंसक लढ्यांनीं राष्ट्रांत जें चैतन्य निर्माण झालें त्याच चैतन्याचें काम हुतात्म्यांनीं वेळोवेळीं देशांत उधळून दिलें. प्रत्येक क्रांतिकारक हा भारतीय असंतोषाचा स्फोट होय. या पुण्यपुरुषांनीं फांशीच्या बोहल्यावर लग्न लावून मायदेशाचा संसार केला. त्यांनीं पिछाडीच्या सैनिकांत स्वातंत्र्याच्या समराचा जोष निर्माण केला.

आईवरी विपत्ति आम्हीं मुलें कशाला ?
 त्रंदींत मायभूमी आम्ही खुले कशाला ?

असा प्रत्ययभेदक जीवनप्रश्न विचारीत त्यांनीं
 रक्ताळलें शरीर भडका जिवांत झाला
 आईस सोडवाया येणार कोण, बोला ?

असें आव्हान त्यांनीं तरुण पिढीस दिलें. हे हुतात्मे फांसावर लटकले या नुसत्या कल्पनेनेंहि आपण अत्यंत विचलित होतों. परंतु या क्रांतिकारकांचा निर्धार किती वज्रासारखा कठोर होता त्याचें वर्णन करतांना कवि कुंजविहारी म्हणतात,—क्रांतिकारक कसे होते ? तर—

‘ अमर ’पुराचे रहिवासी अम्हि
 काळाचें भय कोणाला ॥
जन्मापूर्वींच अम्ही मरणाला
 करारनामा करुनि दिला ॥

देवाजीचे अम्हि लाडके
मृत्यु आमुचा खेळगडी
देशासाठीं मरूं दहादां
करूं शेवटीं कुरघोडी !

दामोदरपंत चाफेकर फांसावर गेले त्याचें वर्णनहि स्वातंत्र्यवीर सावरकरांनीं असेंच हृदयस्पर्शी केलें आहे; ते—

'न्यायाधीश हा जोशी उत्तम
उदय मुहूर्ता योग्य गणी ॥
सत्य, देशहित वऱ्हाड जमलें
कीर्ति, नीति या वऱ्हाडणी
टिळक गजानन नमस्कारिला
फांस ओहलें मग पुरलें
स्मरले गीता–मंत्र दामुनें
मुक्ती-नवरीला वरिलें

काकोरीच्या कटांतील अशफाकउल्ला यास आपणांस फांशीची शिक्षा झाल्याचें कळतांच तो अगदीं निर्विकार राहिला. इतकेंच नव्हे तर त्यानें इतरांनाच असा सवाल केला कीं —

मौत इकबार जब आती है
तो डरना क्या है ॥
हम सदा खेलही समझा
कि ये मरना क्या है ! ॥
वतन हमेशा रहे और आझाद
अगर हम रहे या न रहे ॥

हुतात्म्यांचें जीवन-तत्त्वज्ञान असें होतें ! भारतीय स्वातंत्र्यमंदिराचा मार्ग त्यांनीं आपल्या प्राणांची पखरण करून सिद्ध केला. त्यांची स्मृति आपण ठेवली नाहीं तर ती पराकाष्ठेची कृतघ्नता ठरेल, अत्यावश्यक राष्ट्रीय कर्तव्याची ती अक्षम्य हेळसांड होईल.

परंतु हुतात्म्यांचें पुण्यस्मरण करावयाचें तें काय केवळ त्यांच्यासंबंधींचा

प्रेमादर व्यक्त करण्यासाठींच ? देशाला वाटणारी कृतज्ञता प्रकट करण्यासाठींच ? भारताच्या सद्यःपरिस्थितीला धरून हुतात्म्यांसंबंधीं आपण विचार केला पाहिजे. परंतु आज प्रत्यक्षांत काय दिसतें ? आज हौतात्म्याची अपेक्षा नाहीं; तथापि ज्या गुणांच्या बलावर स्वातंत्र्य मिळालें ते गुण अनावश्यक झाले काय ? दुर्दैवानें अशा सद्गुणांचा त्याग कराण्याचीच जणूं अहमहमिका आज तरुणांत लागल्याचें खेदजनक दृश्य सर्वत्र दिसत नाहीं काय ? हुतात्म्यांचें स्मरण करतांना हंसत हंसत मृत्यूला कवटाळणाऱ्या क्रांतिकारकांना कोणती प्रेरणा लाभली होती याहि गोष्टींचें स्मरण आपण करावयास नको काय ? ज्यासाठीं प्राणहि ओंवाळून टाकावे, जीवनांतील साऱ्या भोगलालसा, आशा-आकांक्षांवर खुशाल लाथ मारावी, अनंत यातनांचें हंसत हंसत स्वागत करावें अशींहि कांहीं मूल्यें जीवनांत असतात. त्या मूल्यांचें पूजन हुतात्म्यांनीं केलें. हुतात्म्यांचें पुण्यस्मरण करतांना या महान् आदर्शांचें स्मरणहि आवश्यक नाहीं काय ?

हें स्मरण आणि चिंतन आज तरुणांनीं केलें पाहिजे. एवढेंच नव्हे तर त्या प्रेरणांचा स्वीकारहि केला पाहिजे. ज्या गुणांनीं स्वातंत्र्यासाठीं जीवनाचा होम करण्याचें बळ येतें ते गुण क्षीण झाल्यास, लोपल्यास स्वातंत्र्याचाहि असा लोप होईल. स्वदेशभक्ति, मातृभूमीवरील अव्यभिचारी प्रेम, हा या साऱ्या गुणांचा मेरुमणि आहे. त्याअभावीं सारे गुण मातीमोल ठरतात. या गुणांमुळें राष्ट्रहितकारक जीवन वेंचण्याची आकांक्षा निर्माण होते. क्रांतिकारकांत हेच गुण अत्यंत प्रकर्षानें दिसतात. याच गुणांस्तव त्यांनीं जीवनसर्वस्व वेंचलें.

पण आजचे तरुण काय करतांना आढळतात ? कोणत्याहि आदर्शांची कदर न करतां कोडगेपणानें वैयक्तिक स्वार्थाकडे धावतांना दिसतात. शारीरिक सुखाच्या विकृत कल्पनांचा अंमल त्यांच्या जीवनावर चढलेला दिसतो. कर्तव्यासाठीं शारीरिक भोग दूर सारण्याची धमक दिवसेंदिवस लोप पावत चालल्याचें विदारक दृश्य आज आपण पहात आहोंत. अशा रीतीनें स्वार्थाच्या खोल गर्तेंत कुजत पडून का हुतात्म्यांचें पुण्यस्मरण आपण करणार आहोंत ? कारण त्याग, तेजस्विता, धडाडी, कठोर कर्तव्यनिष्ठा व स्वदेशप्रीति या साऱ्या गुणांना तिलांजली देऊन हुतात्म्यांचें स्मरण करण

म्हणजे ती स्वतःची घोर आत्मवंचनाच नव्हे–तर त्या स्वर्गीय हुतात्म्यांचीहि अक्षम्य वंचनाच ठरेल. त्यांनीं जें वरदान प्राणांचें मोल देऊन प्राप्त करून दिलें त्याची मस्ती करण्याचें व अंधकारमय भवितव्याचे धनी होण्याचें करंटेपण मात्र आपल्या कपाळीं येईल.

हुतात्म्यांप्रमाणें आज हौतात्म्य पत्करण्याची आवश्यकता नाहीं. आज परिस्थिति निराळी आहे. भिन्न परिस्थितीनुसार भिन्न कर्तव्यें पार पाडावीं लागतात. स्वदेशासाठीं देहदंड स्वीकारण्याची आवश्यकता असेल त्या वेळीं देहदंड स्वीकारला पाहिजे, व कणखरपणें जगण्याची गरज असेल तेव्हां जगलें पाहिजे. स्वतंत्र मातृभूमीच्या संपन्न वैभवाच्या स्वप्नांत क्रांतिकारकांनीं आत्माहुति दिली तर आज तें स्वप्न साकार करण्यासाठीं प्रभावीपणें जगण्याची गरज आहे. आज कोणी निष्कारण मरण्याची आवश्यकता नाहीं, तर आमच्या समाजाचा, राष्ट्राचा अभ्युदय ज्यायोगें साध्य होईल अशा प्रत्येक क्षेत्रांत धडाडीनें भाग घेण्याची आजची गरज आहे. आपलें सारें बळ एकवटून देश समर्थ व समृद्ध करण्याची आज वेळ आहे. यासाठीं आज अनंत क्षेत्रें मोकळीं आहेत. आळस, निष्क्रियता, उदासीनता, स्वार्थजन्य कलह किंवा देशाचें ऐक्य-सामर्थ्य खची करणाऱ्या चळवळी यांपासून कटाक्षानें दूर राहून आपापल्या प्रवृत्ति व गुणसंपदेनुसार विधायक मार्गानें हुतात्म्यांच्या बलिदानाची खरी सांगता करण्याचें महान् सर्वश्रेष्ठ कार्य आपणांस आवाहन करीत आहे. मरण हें जसें उदास व प्रेरक ठरूं शकतें तसें कर्तव्य जीवनहि देशाला संजीवक व स्फूर्तिदायी ठरूं शकतें. या श्रद्धेनें आपण हुतात्म्यांचें पुण्यस्मरण केलें पाहिजे. !

आज तरुण पिढीच्या अंतःकरणांत या निरामय प्रेरणेचा उदय व्हावा, आणि स्वातंत्र्याच्या चिरंतनत्वासाठीं निर्लेप देशभक्तीचें अधिष्ठान त्यांस लाभावें–याशिवाय दुसरी कोणती इच्छा त्या स्वर्गीय हुतात्म्यांची असेल? आणि म्हणून—*'आप्त विस्तारांत ज्यांच्या देशही सामावती। गाऊं त्यांना आरती ॥' वंदे मातरम्।*

# राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें

राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें हीं आपल्या राष्ट्रीय जीवनांतील एक अमूल्य असा ठेवा आहे. तो तरुण पिढीच्या योग्य तऱ्हेनें हातांत पडून त्यापासून त्यांना सतत स्फूर्ति मिळत राहावी म्हणून आम्हीं खालील चरित्रें प्रकाशित केलीं आहेत.

- राष्ट्रजनक टिळक
- मालाकार चिपळूणकर
- भारतसेवक गोखले
- न्यायमूर्ति रानडे
- सुधारकाचार्य आगरकर
- राष्ट्रपिता म. गांधी
- भारतभूषण मालवीय
- राष्ट्रभूषण राजेंद्रप्रसाद
- भारतभाग्यविधाता नेहरू
- देशबंधू दास
- नेताजी सुभाषचंद्र
- सरोजिनी नायडू
- विनोबाजी भावे ( मराठी )

# राष्ट्रपुरुषांचीं चरित्रें

- *विनोबाजी भावे ( गुजराथी )*
- *विनोबाजी भावे ( हिंदी )*
- *जयप्रकाश नारायण*
- *साने गुरुजी*
- *रवींद्रनाथ टागोर*
- *वल्लभभाई पटेल*
- *कस्तुरबा*

चरित्र वाङ्मयासाठीं आमचें संपूर्ण सूचिपत्र मागवा.

## चित्रशाळा प्रकाशन, पुणें २


२९२


प्रथमावृत्ति : ता. १५ ऑगस्ट १९५५.

मुद्रक व प्रकाशक : **दामोदर त्र्यंबक जोशी** बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें २.



IRBK-0105292

IRBK-0105292

किंमत बासष्ट नये पैसे

चित्रशाळा प्रकाशन पुणे २